महाराष्ट्राचे

# शिल्पकार

## नाना पाटील



22

भारत पाटणकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

क्रांतिसिंह नाना पाटील : एक अखंड क्रांतिकारक

# क्रांतिसिंह नाना पाटील

## एक अखंड क्रांतिकारक

प्रा० रतनलाल सोनग्रा
उपाध्यक्ष
~~अध्यक्ष~~
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ
दादर, मुंबई ४०००१४

डॉ. भारत पाटणकर

महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २००२
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ४

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ३५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच, असे नाही.

"नाना पाटील नाही एकला । त्याच्या दिमतीला
आज उभा ठेला ।
पोलादी संघटना लोकात ।
शेकड्याने शस्त्रसिद्धी हातात ॥ जी...

पकडील कोण नानाला । आमच्या नेत्याला
बातमी जो देईल नीच इंग्रजास ।
दिवा नाही ठेवणार त्याच्या वंशास ॥ जी...

लाथेने उडवा पाटीलकी । झेलु नका थुकी । सोडून लायकी ।
तुम्ही राजे देशाचे ।
हक्क मिळताच स्वराज्याचे । तुम्ही आमचे नि आम्ही तुमचे ॥ जी...

हाकलून देऊ गोऱ्याला । हरामखोराला । नीच राज्याला ।
घेऊया परत राज्य आपुले ।
कायद्याचे भय आता कसले । प्रतिसरकार सुरू झाले ॥ जी...

कोण पकडील क्रांतिवीराला । नाना पाटलाला । आमच्या नेत्याला ।
पकडील कोण पळत्या वाऱ्याला ।
धरील कोण जळत्या अग्नीला। गवसणी कोण घालील आभाळाला ॥ जी"...

भूमिगत (!) शाहीर शंकरराव निकम यांनी १९४२ पासून
पुढे गावोगावी गाजवलेल्या शाहिरीतले एक कवन

**रचना : ग. दि. माडगूळकर**

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे, अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे मंडळाने योजिले आहे. या चरित्र ग्रंथमालेतील "क्रांतिसिंह नाना पाटील : एक अखंड क्रांतिकारक" हे चौथे पुस्तक आहे.

"क्रांतीसिंह" म्हणताच, नाना पाटलांचे नाव आपणांस चटकन आठवते, इतकेच नव्हे तर क्रांतिसिंह हा शब्द हा जणू काही त्यांच्यासाठीच निर्माण झालेला आहे, असे वाटावे इतपत त्याचे नाते अभेद्य आहे.

साधारणत: १९२८ ते १९७६ या काळातील महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय जीवन समजून घ्यायचे असेल तर क्रांतिसिंह नाना पाटलांचे जीवनचरित्र समजून घ्यायला हवे. त्यांचे जीवनचरित्र म्हणजेच मराठी माणसाचं प्रेरणास्त्रोत आहे.

महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात क्रांतिसिंह नाना पाटील हे एक ऐतिहासिक आक्रीत घडलेलं आहे. "महाराष्ट्राच्या इतिहासाने त्यांना घडविले आणि त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास घडविला", असे या चरित्र ग्रंथाचे लेखक डॉ. भारत पाटणकर यांनी आपल्या या चरित्र ग्रंथात सार्थ शब्दात नमूद केले आहे.

इतिहास घडविणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटलांचा हा चरित्र ग्रंथ मराठी माणसाला निश्चित आवडेल, असा मला विश्वास आहे.

मुंबई
८ फेब्रुवारी २००२

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## अनुक्रम


१. क्रांतिसिंहांच्या ऐन तारुण्यापर्यंतचा महाराष्ट्र आणि सातारा जिल्हा १

२. १९३० ते १९४२ मधली मशागत १४

३. १९४२च्या सातारा प्रतिसरकारचे नेते २८

४. उष:काल होता होता... काळरात्र झाली! ६०

५. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि लोकसभेत प्रवेश ७१

६. भूमिहीनांचा लढा, दुसऱ्यांदा लोकसभेत आणि निर्वाण ८४

संदर्भ सूची ९४

# क्रांतिसिंहांच्या ऐन तारुण्यापर्यंतचा महाराष्ट्र आणि सातारा जिल्हा

१९२८-१९३० ते १९७६ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्राला गवसणी घालणारे एक वादळ मराठी माणसांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनामध्ये घोंघावत राहिले. क्रांतिसिंह नाना पाटील हे या वादळाचे नाव. साधी सुती लुंगी, सुती नेहरू शर्ट आणि धिप्पाड शरीरयष्टी या वैशिष्ट्यांना घेऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व मराठी माणसांच्या समुद्रात माशासारखे विहार करीत राहिले. शड्डू ठोकल्याशिवाय त्यांनी कधीच भाषणाला सुरुवात केली नाही. भाषण सुरू झाल्यावर ऐकणाऱ्याला भोवतालच्या वास्तवाचे भानच राहू नये इतके सततच मंत्रमुग्ध केले. त्यांच्याच भाषणाला स्त्रिया, पुरुष, तरुण-तरुणी, मुली-मुले ५-१० गावांमधून बैलगाड्या जुंपून आलेले उभ्या महाराष्ट्राने अनुभवले. तीन-तीन तास चाललेले भाषण संपले तरी अजून चालूच राहावे अशी आस जनतेला त्यांच्या भाषणाविषयी नेहमीच लागायची.

महाराष्ट्रातल्या गावागावाने नाना पाटलांना अंगाखांद्यावर वागवले. त्यांना वाद्य-संगीताच्या, लेझिमाच्या, बैलांच्या घुंगरांच्या तालात मिरवणुकींमधून मिरवले. हजारो कुटुंबांनी त्यांना भाजी-भाकरी-पिठलं जेवायला घातले. शेकडो कुटुंबांनी त्यांना घरच्याप्रमाणे आपल्या घरांमध्ये सामावून घेतले. त्यांचे विचार हजारो बाल मनांवर, तरुण मनांवर संस्कार करीत गेले. या संस्कारातूनच शेकडो कार्यकर्ते तयार झाले. जीवावर उदार होऊन स्वातंत्र्यासाठी लढणारे अनेक तरुण क्रांतिवीर त्यांच्या विचारांच्या प्रभावाने घडत गेले. राबणाऱ्या जनतेच्या कुशीतून निपजलेले शेकडो अर्धशिक्षित शेतकरी-मजूर कार्यकर्ते त्यांच्या संस्कारांना उराशी कवटाळून गावागावांना घडवीत गेले. चळवळीची केंद्रे असलेली गावे उभारत गेले.

पुस्तके वाचण्याबरोबर जीवन कसे वाचायचे याची शाळा क्रांतिसिंह नाना पाटलांनी ४७-४८ वर्षे सलगपणे चालवली. अनेक चढउतार त्यांच्या जीवनात

आले. व्यक्तिगत जीवनातही अनेक आघात झेलावे लागले. आपले म्हणवणाऱ्या माणसांकडून जखमा सहन कराव्या लागल्या. क्रांतिसिंहाच्या चेहऱ्यावर दु:ख कधी दिसले नाही. स्वत:च्या दु:खांवरही विनोद करीत, जनतेच्या दु:खांची उकलही विनोदाने घडवत त्यांनी क्रांतिकारी विचारच पेरला. आशा पेरली. निराशा कधीच पेरली नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये हे एक आगळे ऐतिहासिक अक्रित घडले. महाराष्ट्राच्या इतिहासाने त्यांना घडवले आणि त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास घडवला.

महात्मा जोतीबा फुले यांनी आपली बहुतांश काव्यरचना 'अखंड' या स्वरूपात केली. विद्रोही संत तुकारामांच्या 'अभंग' काव्यरचनेचा महान वारसा सांगत जोतीबांनी 'अखंड' लिहिले. ३ ऑगष्ट १९०० रोजी वाळवे तालुक्यातील यडे मच्छिंद्र या खेड्यात जन्माला आलेल्या नाना पाटलांनी 'अखंड' क्रांतिकारी जीवन जगून विद्रोही संत तुकाराम आणि महात्मा फुले यांची परंपरा आधुनिक काळात पुढे नेली. तत्कालीन सातारा जिल्ह्याची क्रांतिकारी परंपरा उज्ज्वल केली. १५ ऑगष्ट १९४७ नंतर 'शेतकरी कामगार पक्ष', 'कामगार किसान पक्ष' आणि 'कम्युनिस्ट पक्ष' असा प्रवास करून आंतरराष्ट्रीय क्रांतिकारी परंपरेशी नाते जोडले. देशी क्रांतिकारकत्वाला धक्का न लावता आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक विचारांचा स्विकार केला. अशा क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म ज्या काळात झाला त्या काळात त्यांच्यावर संस्कार करणारा महाराष्ट्र आणि सातारा जिल्हा कोणत्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अवस्थेत होता हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

महात्मा फुलेंच्या मृत्युनंतर दहा वर्षांनी नाना पाटलांचा जन्म झाला. राजर्षी शाहुमहाराजांनी ब्राह्मण, प्रभु, पारशी, शेणवी अशा पुढारलेल्या जात-धर्म विभागांच्या लोकांना वगळून इतर सर्वांसाठी राखीव जागा ठेवण्याचा जगाच्या पातळीवर महत्त्वाचा ठरणारा ऐतिहासिक निर्णय घेतला तो क्रांतिसिंहाच्या जन्मानंतर दोनच वर्षांनी म्हणजे १९०२ साली. नाना पाटील ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना, १९१९ ते १९२१ या काळात, सातारा जिल्ह्यातील कूळ शेतकरी आणि बलुतेदारांचा संयुक्त संप आणि संघर्ष ग्रामीण भागातील परिवर्तनाची वाट उजळून गेला. १९१० सालापासून पुढे सातारा जिल्ह्यात सत्यशोधक तमाशांचे कसदार पीक उभारून येऊ लागले. लहान-थोरांवर संस्कार करू लागले. मुकुंदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर अशा सत्यशोधक ब्राह्मणेतर म्होरक्यांनी काढलेली नियतकालिके याच काळात प्रसारित

होत होती. त्याचबरोबर महात्मा गांधींसारखे बहुजन स्त्री-पुरुषांपर्यंत पोहोचणारे धोरणी नेतृत्व राष्ट्रीय काँग्रेसमध्ये उगम पावण्याच्या काळात क्रांतिसिंह २०-३० वर्षांचे होते.

समजायला लागल्यापासून नानांच्या मनावर कोणते संस्कार झाले हे फार महत्त्वाचे आहे. कारण त्यातूनच त्यांची मनोभूमिका प्रामुख्याने ठरत गेली. हे संस्कार वेगवेगळ्या अंगानी घडतात. भोवतालची सामाजिक-आर्थिक परिस्थिती आपोआपच परिणाम करीत असते. समाजातल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संघटना जाणीवपूर्वक परिणाम घडवीत असतात. परिसराच्या आणि घराच्या ऐतिहासिक परंपरासुद्धा मने घडवीत असतात. क्रांतिसिंहांचे चरित्र आणि चारित्र्य याच प्रक्रियेतून घडत गेले.

## त्यावेळच्या महाराष्ट्राची सामाजिक-आर्थिक रचना

त्या वेळचा महाराष्ट्र जातीय उतरंडीतून होणाऱ्या पिळणुकीने गांजलेला होता. मुंबईसारखे शहर विकसित होत होते. कारखानदारी नावाची नवीनच भांडवली गोष्ट उदयाला आली होती. देशाला गुलाम करणाऱ्या इंग्रजांनी इथे कारखानदारी आणि भांडवलशाही आयात करून लादली होती. तरीसुद्धा महाराष्ट्रातील नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त जनता ग्रामीण भागातच राहत होती. ब्राह्मण, स्वत:ला उच्चकुलीन समजणारे मराठे, शेतकरी मराठे किंवा कुणबी-कुरवाडी, माळी, धनगर, सुतार, लोहार, शिंपी, कोष्टी, भोई, सोनार, कुंभार, परीट, न्हावी, घिसाडी, कोळी अशा स्पृश्य बलुतेदार जाती आणि तळाला महार, मांग, चांभार, ढोर अशा अस्पृश्य जाती या शोषणाच्या उतरंडीत समाज बांधलेला होता. ब्राह्मण्यवादी धर्माने घालून दिलेले नीतिनियम पाळण्याची सक्ती सार्वत्रिक होती. जातिव्यवस्थेचे नियम मोडले तर वाळीत टाकले जात होते. म्हणजेच सामाजिक व्यवहारापासून तोडून एकटे पाडले जात होते. जगणे कठीण केले जात होते. मुंबईला जाऊन गिरण्या-कारखान्यात, रेल्वेत कामगार होणे हा या पिळणुकीतून काही प्रमाणात बाहेर जाऊन जगण्याचा एक नवा मार्ग होता.

येडे मच्छिंद्र हे क्रांतिसिंहांचे जन्मगाव. या गावाचे शिवार कृष्णा नदीच्या काठावर असले तरी हे गाव डोंगराजवळ वसलेले आहे. या गावा शेजारीच 'मच्छिंद्र गड' नावाचा किल्ला आहे. नाथ पंथातील मच्छिंद्रनाथांचे ठाणेसुद्धा या किल्ल्यावर आहे. महाराष्ट्रात जातिव्यवस्थेविरोधी जे प्रवाह झाले त्यातलाच नाथ पंथ होता हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. गावाचे नावसुद्धा मच्छिंद्रनाथांचा समावेश करणारे आहे. क्रांतिसिंह अनेक वेळा 'येडे' या

नावावरून स्वत:च्या भाषणात विनोद करीत असत. "मी येड्याचा" एवढे म्हणण्यातूनही संपूर्ण समुदायाला हसू फुटत असे. इतर गावांप्रमाणेच याही गावाची माणसे, त्या काळी शेतातून, येणाऱ्या उत्पन्नावर संसार चालत नाही म्हणून मुंबईला मजुरी करायला जात असत. कृष्णा नदी जरी जवळ असली तरी तिचे पाणी शेती बागायतीखाली आणायला उपयोगी पडत नव्हते. १९६७-१९७१ पासून पुढेच उपसासिंचन योजनांमुळे या परिसरातील शेतीला बारमाही पाणी मिळू लागले. क्रांतिसिंहांच्या आडनावात 'पाटील' असले तरी त्यांचा जन्म कष्टकरी शेतकरी कुटुंबात झाला होता. सर्व कुटुंब शेतावर राबून शेती करते अशी स्थिती होती. ब्राह्मणी व्यवस्था अशा सर्व आडनाव-पाटलांना कुणबी-कुरवाडीच म्हणत होती. १८८१च्या बॉम्बे प्रेसिडेंसीच्या गॅझेटियरमध्ये सातारा जिल्ह्याची लोकसंख्या १०,६२,३५० होती आणि कुणबी समाजाची संख्या ५,८३,५६९ होती असे नमूद केले आहे. म्हणजेच हा समाज ५४.९ टक्के एवढा होता. १८८१ च्या गॅझेटमधे 'मराठा' म्हणून वेगळी जात नमूद नाही. आज सातारा जिल्ह्यात स्वत:ला कुणबी म्हणवणारे कुणीच सापडणार नाही! इनामदार घरातील विद्रोही संत तुकारामापासून ते छत्रपती शिवाजीमहाराज आणि राजर्षी शाहूमहाराजांपर्यंत सर्वांना शूद्र आणि कुणबी संबोधण्याचा इतिहास आहेच!! थोडक्यात क्रांतिसिंह राबणाऱ्या वर्ग-जातीत जन्मले होते आणि त्या काळात या जातीला शूद्रच समजले जात होते.

त्या वेळच्या दक्षिण महाराष्ट्राच्या कोणत्याही गावामध्ये तीन प्रकारच्या शेतकरी जाती होत्या. कुणबी (मराठा), कुणबी (माळी) आणि धनगर. उतरंडीच्या क्रमाने पुढे सर्व स्पृश्य बलुतेदार जाती होत्या. उतरंडीच्या तळाची अस्पृश्य बलुतेदार जाती होत्या. ब्राह्मण उतरंडीत सर्वांच्या वर आणि सर्वांच्या डोक्यावर बसलेले होते. उच्च कुलीन मराठा समजणारे देसाई, देशमुख असेच सर्वांच्या डोक्यावर बसून शोषण करीत होते. पण जातीय उतरंडीत ते ब्राह्मणांपेक्षा खालच्या स्थानावर होते. ब्राह्मण आणि संरजामदार मराठे सोडून सर्व जनता शारीरिक कष्ट केल्याशिवाय ज्यांना जगताच येणार नाही अशा परिस्थितीत होती. स्वत:ला उच्च कुलीन समजणाऱ्या मराठ्यांमध्येसुद्धा फक्त १.७ टक्के कुटुंबे खंड वसूल करणारी होती म्हणजेच सरंजामदार होती! त्यांच्यामध्ये ६३.८ कुटुंबे स्वत: शेती कसणारी आणि २२.७ कुटुंबे शेतमजूर होती. १९११ साली झालेल्या पाहणीत अशी नोंद आहे. कुणब्यांमध्ये अर्थातच एकही कुटुंब खंड घेणारे म्हणजेच सरंजमादार नव्हते. त्यांच्यात ६१.६ टक्के स्वत: शेती कसणारी आणि २९.३ टक्के शेतमजूर कुटुंबे होती. या उलट

चित्पावन (कोकणस्थ) ब्राह्मणांमध्ये २०.५ टक्के सरंजामदार, २५.६ टक्के स्वत: शेती कसणारे शेतकरी होते! देशस्थ ब्राह्मणांमध्ये हे प्रमाण २०.८ आणि २३.१ तर गौड सारस्वतांमध्ये २१.० आणि १७.१ टक्के असे होते! या तिन्ही जातींमधे शेतमजुरी करणारे कुटुंब एकही नव्हते!! उरलेली कुटुंबे शेती सोडून इतर व्यवसायात होती. इतर सर्व बलुतेदार जातींमधील अर्धी कुटुंबे स्वत:च्या कष्टाने शेती करणारी आणि अर्धी शेतमजुरी करणारी होती. जातींचा नेमलेला व्यवसाय तर ती करीतच होती. जातीय उतरंडीबाहेर असलेल्या भाट, चित्रकथी, गोंधळी, गोपाळ, गोसावी, जंगम, कोल्हाटी, जोशी, उचले, वैदू, वासुदेव या समाजगटांना तर १८८१-८४ च्या गॅझेटमधे 'भिकारी' असेच गणले आहे. त्यांना जमीन असण्याचा प्रश्नच नव्हता आणि ते भटके जीवन जगत होते त्यामुळे त्यांच्यापैकी कुणी शेतमजूर असण्याचा प्रश्न उद्‌भवतच नव्हता. आदिवासी जमातीही जातीय उतरंडीच्या बाहेर समजल्या जात असल्यामुळे त्यांचा प्रश्न वेगळाच होता. त्यांच्यावरच्या अन्यायांची तऱ्हा वेगळीच होती.

क्रांतिसिंहाचे जन्मगाव, अजोळ वगैरे परिसरातील गावांमध्ये आदिवासी सोडून इतर सर्व जाती-जमातींचे लोक होते. सरंजामदारी पिळणूक आणि ब्राह्मण्यवादी जातीय पिळणूक या दोन्हींचे अनुभव त्यांना या परिसरात येतच होते. त्यातच ते लहानाचे मोठे झाले. लहानपणापासून शेतावर जाऊन काम करण्याचा, गुरे चरायला नेण्याचा, शेण काढण्याचा असा सर्व अनुभव घेत ते शिकले. या सर्व अनुभवांमधून त्यांचे मन प्राथमिकरीत्या घडत गेले.

त्या काळात सातारा जिल्ह्यातील शेतीला कालव्याने पाणी पुरवठा करणारी सहा धरणे होती. रेवरी (कोरेगाव), नेर, गोंडोली, मायणी, चिखली आणि खोडशी अशी धरणे इंग्रजी राजवटीने बांधली होती. त्यापैकी एका धरणाची सुरुवात (रेवरी) पेशव्यांच्या एका अधिकाऱ्याने केली होती. या धरणांपैकी खोडशी हे कृष्णा नदीवरचे धरणच फक्त खात्रीच्या पाणीपुरवठ्याचे होते. इतर धरणे कमी पावसाच्या प्रदेशातील असल्यामुळे बारमाही आणि खात्रीचीही असू शकत नव्हती. महाराष्ट्रामध्ये अशी काही छोटी-मोठी धरणे इंग्रजी राजवटीच्या काळात बांधली गेली. त्याआधीपासून आडव्या पाटाची कच्ची आणि दरवर्षी नव्याने बांधावी लागणारी धरणे महाराष्ट्रभर होती. ती स्थानिक लोकच सामुदायिक प्रयत्नातून बांधीत आणि सर्व नियोजन करीत. खोडशी धरणाचा 'कृष्णा कालवा' क्रांतिसिंहाच्या येडे मच्छिंद्र गावाजवळून जातो. या कालव्याखाली त्याही काळात भिजणाऱ्या जमिनींमध्ये बारमाही शेती उत्पन्न घेता येत होते. असे खात्रीचे पाणी बारमाही रीतीने शेतीला मिळाल्यावर काय विकास होऊ

शकतो, समृद्धी येऊ शकते तेही बालवयापासून क्रांतिसिंहानी पहिले अनुभवले होते. आपल्याला गुलाम करायला आलेले इंग्रज जर अशी विकासाची साधने बांधू शकतात तर स्वातंत्र्य मिळाल्यावर किती मोठ्या प्रमाणात विकास होईल अशी कल्पना मनात येण्यासाठी हा अनुभव ठिणगी ठरणारा असू शकत होता.

मुंबई प्रांताच्या ज्या भागात सातारा जिल्हा होता त्या सर्व मराठी मुलखात १९३१च्या जनगणनेतील माहितीप्रमाणे सर्वात जास्त शेतमजूर होते. त्या खालोखाल विदर्भ आणि मराठवाड्यात होते. रयतवारी भागात हे शेतमजूर जरी जमीनदारांची जमीन कसून जगत असले तरी त्यांची तशी नोंद होऊ शकत नव्हती. असे लोक सातारा जिल्ह्यात ८२ टक्के होते! दुष्काळाचे भयंकर परिणाम या सर्वांवर आणि स्वत:ची शेती स्वत: कसणाऱ्यांवर होत होते. ब्राह्मण, ब्राह्मण जमीनदार आणि मराठा, माळी, धनगर जमीनदार या जात-वर्गांना सोडले तर एकंदर परिस्थिती विदारक होती.

## राजकीय आणि अन्य चळवळींचा परिसर

नाना पाटलांचा जन्म झाला त्या काळापासून ते त्यांच्या ऐन तारुण्यात पदार्पण करण्यापर्यंत महाराष्ट्रात आणि सातार जिल्ह्यात अत्यंत महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. सातारा जिल्ह्यातील कूळ-शेतकरी आणि बलुतेदारांचा ऐतिहासिक संघर्ष, सत्यशोधक जलशांचा उदय आणि भरभराट आणि सत्यशोधक ब्राह्मणेतर प्रवाहांचा म. गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षात प्रवेश अशा या घटना आहे.

'सार्वजनिक सत्य धर्म' या पुस्तकात महात्मा जोतीराव फुले म्हणतात :

"... यावरून या बळीस्थानातील एकंदर शूद्रादी अतिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईतोपावेतो ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय (Nation) होऊ शकत नाही. असे असता एकट्या उपऱ्या आर्यभट ब्राह्मण लोकांनी नॅशनल काँग्रेस स्थापिली, तर तिला कोण विचारतो?"

१९३० सालापर्यंत खरोखरच ब्राह्मणेतर बहुजन जाती-जमाती काँग्रेसपासून दूर राहिल्या होत्या. त्या आधी सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर पक्ष, डेक्कन रयत असोसिएशन, मराठा राष्ट्रीय संघ, मराठी लीग, डेक्कन ब्राह्मणेतर संघ अशा संघटना १९१७ ते १९२० या काळात संघटित झाल्या होत्या. सत्यशोधक, ब्राह्मणेतर प्रवाहाची राष्ट्रीय काँग्रेसपासूनची फारकत सुरुवातीपासूनच

होती. १८९५ साली झालेल्या काँग्रेस अधिवेशनावर कृष्णराव भालेकर आणि रामचंद्र वंदेकर यांसारख्या सत्यशोधकांच्या नेतृत्वाखाली निदर्शने झाली. अधिवेशनासमोर एक मांडव घालून त्याच्या पुढे २४ फूट उंचीचा शेतकऱ्याचा कापडी पुतळा आंदोलकांनी उभा केला. त्याच्या हातात लाल कापडावर सोनेरी अक्षरात लिहिलेल्या मजकुरात एक सवाल केला. इंग्रजीत लिहिलेल्या या मजकुरात प्रश्न होता, "आमच्या १९ कोटींपैकी निदान एकोणीस लोक तरी आमचे प्रश्न मांडण्यासाठी इथे आहेत का?" मद्रासमध्ये काँग्रेसअंतर्गत ब्राह्मणेतर विभाग ताकदीने संघटित झाला. त्यातूनच 'जस्टिस पार्टी' आणि मग 'द्रविड मुनेत्र कझगम' संघटित झाले. आंध्रमध्येसुद्धा 'जस्टिस पार्टी' संघटित झाली. महाराष्ट्रात काँग्रेसच्या बाहेरच ब्राह्मणेतर संघटित झाले. माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांमुळे या दबाव गटाला राजकारणात हालचाल वाढवण्यासाठी जास्त आधार तयार झाला.

मराठा लीगने मराठ्यांसाठी दहा, लिंगायतांसाठी चार, जैन समाजासाठी एक, अस्पृश्यांसाठी चार आणि इतर मागासवर्गीय जातींसाठी दहा जागांची मागणी केली होती. इतर ब्राह्मणेतर संघटनांच्या वतीने असाच दबाव आणला होता. १९२० साली मुंबई कौन्सिलच्या घटनेत सुधारणा करून राखीव जागा ठेवण्यात आल्या. यामधे 'मराठा' या सदरात मराठ्यांबरोबरच, कुणबी, माळी, कोळी, भंडारी, शिंपी, लोहार, कुंभार, धनगर, भोई, बारी, लोहार, भावीण इत्यादी जातींचा समावेश करण्यात आला! या काळात ब्राह्मणेतरांमध्ये अनेक वाद झाले. मराठा प्रभुत्वाचा प्रश्नही चर्चेत आला. पण शेवटी १२ डिसेंबर १९२० रोजी जेधे मॅन्शवर सर्व नेत्यांची बैठक होऊन 'डेक्कन ब्राह्मणेतर संघ' स्थापन केला. यात सर्व ब्राह्मणेतर जातींचा समावेश करण्यात आला. १४-१५ मे १९२१ रोजी बेळगावला मोठी परिषद होऊन घटनाही कायम करण्यात आली. डी. डी. घोलप यांच्या पुढाकाराने यात दलितांचा सहभागही होता. याच माध्यमातून पुढे कौन्सिलच्या आणि लोकलबोर्डाच्या निवडणुका लढवण्यात आल्या.

नाना पाटील १७ ते २० वर्षांचे होत असताना महाराष्ट्रात या घटना घडत होत्या. सातारा जिल्ह्यात त्याच प्रकारच्या हालचाली चालू होत्या. सातारा जिल्ह्यात विकसित झालेल्या सत्यशोधक-ब्राह्मणेतर विचारांच्या संस्कारात क्रांतिसिंह घडत होते. राजकीय क्षेत्रात होणाऱ्या बदलांचे परिणामही त्यांच्यावर होत होते. काँग्रेसपेक्षा किती तरी जास्त प्रमाणात कष्टकरी जाती-जमातींच्या बाजूची भूमिका ब्राह्मणेतर संघाचे प्रतिनिधी घेत होते. श्री. नवले यांनी १६

रुपये चावडी भरणाऱ्यांपर्यंत मतदानाचा हक्क आणून मतदान जास्त व्यापक होण्याची मागणी केली होती. १९२५ साली ब्राह्मणेतर सदस्याने कुळांच्या बाजूचे एक बिल आणले. खंड दिला नाही म्हणून कुळावर दंड लादण्याचा जमीनदाराचा अधिकार काढून घेण्याची मागणी करणारे हे बिल होते. त्याचबरोबर १९२३ साली कोकणातील खोत जमीनदारांकडून त्रास झाल्यामुळे कुळांच्या ज्या समस्या तयार झाल्या होत्या त्यावर उपाय काढणारा ठराव सुर्वे आणि बोले यांनी कौन्सिलमधे मांडला. १९२६ साली सी. के. बोले यांनी मांडलेले 'जोशी बिल' सर्वात जास्त वादग्रस्त ठरले. ब्राह्मण जोशांना ब्राह्मणेतरांचे विधी करण्याचे जे कायदेशीर हक्क होते. ते संपवण्याची मागणी यामधे होती. हे बिल शेवटी कौन्सिलात मंजूर झाले. पण 'केसरी'सारख्या ('मराठा', 'भाला') वर्तमानपत्रांनी या निर्णयावर टीका केली. जोशांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. साताऱ्याच्या काँग्रेसचे नेते श्री. आर. जी. सोमण यांनी या बिलाला कडाडून विरोध केला.

क्रांतिसिंह नाना पाटलांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण होत असताना स्पृश्य ब्राह्मणेतर आणि अस्पृश्य समाज यांची ब्राह्मण्यवाद आणि सनातनी ब्राह्मणांविरोधी आघाडीसुद्धा त्यांच्यावर संस्कार करणारी होती. 'महारवतन' हे तत्कालीन महार समाजाला गुलामीत ठेवण्याचे पारंपरिक ब्राह्मणी साधन होते. ते रद्द व्हावे आणि जमीन रयतावा व्हावी म्हणून श्री. डी. डी. घोलप यांनी बिल आणले. भास्करराव जाधव या प्रमुख ब्राह्मणेतर प्रतिनिधींनी या बिलाला पाठिंबा दिला. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे बिल आणले त्या वेळेही जमिनदारी पार्श्वभूमी असलेले नवले हे प्रतिनिधी वगळता सर्व ब्राह्मणेतर प्रतिनिधींनी बिलाला पाठिंबा दिला. ब्रिटिश सरकारने दोन्ही वेळा या प्रस्तावाला विरोध केला. या स्पृश्य-अस्पृश्य ब्राह्मणेतर आघाडीच्या दबावामुळेच १९२७ साली सर्व सरकारी खात्यांमधील कारकुनी जागांमध्ये मागासवर्गीयांसाठी (स्पृश्य आणि अस्पृश्य ब्राह्मणेतरांसाठी) ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा ठराव मंजूर झाला. पण त्याची अंमलबजावणी मात्र कधीच नीट झाली नाही.

या दोन्ही मागण्यांपाठीमागे राजर्षी शाहूमहाराजांच्या व्यवहाराची प्रेरणा होती. १९०२ साली राजर्षींनी ५० टक्के राखीव जागा ठेवल्या आणि त्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करून घेतली. महार वतने रयतावा केली. भास्करराव जाधव आणि इतर अनेक प्रतिनिधींवर महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचाराबरोबरच राजर्षी शाहूंच्या सामाजिक क्रांतिकारक व्यवहारांचाही प्रभाव होता. राजर्षींच्या हुकमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यामुळे घडलेला मोठा बदल या मंडळींच्या

अनुभवातला होता. कोल्हापूर संस्थानामध्ये इ.स. १८९४ साली जनरल डिपार्टमेंटमध्ये ६० ब्राह्मण आणि ११ ब्राह्मणेतर होते. याच विभागात १९२२ साली २६ ब्राह्मण आणि ५९ ब्राह्मणेतर होते! खाजगी विभागात ४६ ब्राह्मण आणि ७ ब्राह्मणेतर इ.स. १८९४ मध्ये होते तर १९२२ साली ४३ ब्राह्मण आणि १०९ ब्राह्मणेतर असा मोठाच बदल घडला!! शिक्षण क्षेत्रातसुद्धा असाच मोठा बदल घडला. इ.स. १८९४ मध्ये संस्थानातल्या सर्व शाळांमधे २,५२२ ब्राह्मण, ८,०८८ ब्राह्मणेतर आणि २३४ अस्पृश्य होते, तर १९२१-२२ मध्ये २,७२२ ब्राह्मण, २१,०२७ ब्राह्मणेतर आणि २,१६२ अस्पृश्य असा फरक घडून आला!!! सातारा जिल्ह्यात वाढणाऱ्या नाना पाटलांच्या प्रेरणा या परिसरातून जन्माला येत होत्या. कर्मवीर भाऊराव पाटीलसुद्धा महात्मा फुले आणि राजर्षी शाहूंची प्रेरणा घेऊन सातारा जिल्ह्यातच कार्य करू लागले होते. पुढे त्यांची आणि क्रांतिसिंहांची घनिष्ट मैत्री जमली. याची पार्श्वभूमी १९०२ ते १९२० या कालखंडात तयार झाली होती. १९२३ ते १९३० पर्यंतच्या काळात जिल्हा लोकलबोर्डांच्या थरापर्यंत ब्राह्मणेतरांचे आव्हान तयार झाले होते. १९३० पर्यंत सातारा, नाशिक आणि सोलापूर जिल्हा लोकलबोर्डांमध्ये ब्राह्मणेतरांनी मोठे बहुमत प्रस्थापित केले होते. याच काळात क्रांतिसिंह सामाजिक कार्यात पदार्पण करून हालचाल करीत होते. या हालचालींशी त्यांचा संबंध येत होता. किंबहुना त्यांचा सहभागही सुरू झाला होता.

१९१९ ते १९२१ या काळात झालेल्या असहकारितेच्या चळवळीतून म. गांधी हे राष्ट्रीय काँग्रेसचे देशपातळीवरील नवे पुढारी म्हणून प्रस्थापित झाले. बाळ गंगाधर टिळकांच्या प्रभावाखाली असलेल्या महाराष्ट्रातील काँग्रेस पुढाऱ्यांचा गांधींच्या नेतृत्वाला आणि एकंदर विचारसरणीला विरोध होता. त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील आणि राजकीय क्षेत्रातीलही काही प्रतिगामी भूमिकांमुळे ते गांधींना नेते मानायला तयार नव्हते. थोडक्यात, असे म्हणता येईल की टिळकांचे अनुयायी सनातनी ब्राह्मण्यवाद्यांबरोबर असलेली त्यांची नाळ तोडायला तयार नव्हते. ब्राह्मणेतर राबणाऱ्या जनतेने, अस्पृश्य जनतेने आपले प्रतिनिधी राज्य करण्यासाठी पाठवावेत हे या मंडळींच्या पचनी पडत नव्हते. महात्मा गांधींनी मात्र या जनतेपर्यंत पोहोचण्याची भूमिका घेतली होती. ब्राह्मणेतर धुरिणांना भेटायला सुरुवात केली होती. १९१८ साली विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'मराठ्यांचा इतिहास' या विषयावरील भाषणांना ते उपस्थित राहिले. १९२४ सालापासून ते अण्णासाहेब लठ्ठे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि केशवराव जेधे यांना त्या त्या ठिकाणी जाऊन भेटले. या सर्व प्रक्रियेतून १९३०

सालापर्यंत केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक-ब्राह्मणेतर चळवळीचा एक विभाग काँग्रेसमधे सामील झाला. म. गांधींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही चळवळीत भाग घेऊ लागला. क्रांतिसिंह नाना पाटील हे या विभागापैकीच एक सत्यशोधक-ब्राह्मणेतर होते. हजारो लोकांना खिळवून ठेवणारी भाषणे सुरू करताना ते छत्रपती शिवाजीमहाराज की जय! महात्मा गांधी की जय! अशा घोषणा देऊन शड्डू ठोकायचे. गांधींच्या, खेड्यापाड्यांतील 'सर्वसामान्य' स्त्री-पुरुष जनतेपर्यंत स्वातंत्र्याचा संदेश पोहोचवण्याच्या धोरणाची अंमलबजावणी क्रांतिसिंहांइतकी कुणीच केली नसेल. ब्राह्मणेतर-सत्यशोधक पुढारीपण जरी राष्ट्रीय काँग्रेसमधे सहभागी झाले तरी त्यांची राबणाऱ्या ब्राह्मणेतर जाती-जमातींबरोबर असलेली नाळ तुटली नाही. त्यामुळेच, 'आला छत्रपती मेळा। भटांनो पळा पळा रे पळा।।' किंवा 'कुठेही आडवा भट आला । राज्याचाही निकाल होईल । जाईल नाशाला' अशी गाणी म्हणणारा छत्रपती मेळा काढणारे जेधे काँग्रेसमध्ये गेले आणि स्वातंत्र्यानंतर पुन्हा 'शेतकरी कामगार पक्ष' काढून काँग्रेसमधून बाहेर पडले. क्रांतिसिंह नाना पाटील याच मार्गाने गेले. फरक इतकाच (आणि फारच मोठा) की केशवराव जेधे पुन्हा दुसऱ्यांदा काँग्रेसमधे गेले आणि नाना पाटील पुढे कम्युनिस्ट पक्षात प्रवेश करून अखेरपर्यंत कष्टकरी चळवळीच्या क्रांतिकारी प्रवाहात राहिले.

क्रांतिसिंहाच्या तरुण मनावर संस्कार करणाऱ्या आणखी दोन महत्त्वाच्या प्रक्रिया त्या काळात सातारा जिल्ह्यात चालू होत्या. त्यापैकी एक होती सत्यशोधक जलशांची सत्यशोधक तमाशांची. सातारा जिल्ह्याच्या कराड तालुक्यातील 'काळे' या गावचे मराठा शेतकरी रामचंद्र घाडगे हे सत्यशोधक तमाशा पहिल्यांदा सुरू करणारे पाईक होते. गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला येऊन केवळ चौथीपर्यंत शिकलेल्या घाडगेंच्या तमाशावर सातारा जिल्ह्यातील जनतेने त्या काळात खूपच प्रेम केले. १९१५ साली या तमाशाची सुरुवात झाली. १९२५ सालापर्यंत चांगल्या प्रकारे ओळखले जाणारे सुमारे एकोणतीस तमाशे महाराष्ट्रात होते. यांपैकी बारा सातारा जिल्ह्यात, पाच अहमदनगर, सहा नाशिक, दोन सोलापूर जिल्ह्यांमध्ये होते. पुणे आणि बेळगाव जिल्ह्यांमधे प्रत्येकी एक तमाशा होता. सातारा रोड, पाडळी गावचे जोतीराव फाळके आणि कवी तुकाराम भोसले यांचा तमाशा हा सर्वात जास्त प्रमाणात सत्यशोधकी विचारांच्या पायावर चालणारा होता. या तमाशांचा परिणाम चांगल्या प्रकारे होत असे. जमीनदार, सावकार आणि ब्राह्मण्यवादाच्या वर्चस्वाविरुद्ध संघर्ष करण्याची शिकवण या तमाशांमधून मिळत होती. १९१९ पासून पुढे दोन वर्षे झालेला

कूळ शेतकरी आणि बलुतेदारांचा उठाव या प्रबोधनातून स्फूर्ती घेऊनच झाला होता. सांस्कृतिक क्षेत्रात अंधश्रद्धा, बुरसटलेल्या रूढी, ब्राह्मण्यवादी धर्म थोतांड यांना विरोध करून नवी समतावादी मूल्ये मांडणारी तमाशांची चळवळ आर्थिक क्षेत्रात जातीय जमीनदारी, जातीय उतरंड यांना विरोध करणाऱ्या चळवळीची प्रेरणा ठरली. नाना पाटील याच संस्कारात वाढले. त्यामुळे त्यांनी आयुष्यभर राजकीय चळवळीबरोबरच सांस्कृतिक-धार्मिक क्षेत्रात पुरोगामी परिवर्तन आणण्याला महत्त्व दिले.

सातारा जिल्ह्यातील शेतकरी बलुतेदारांच्या उठावाचेही परिवर्तनवादी संस्कार क्रांतिसिंहाच्या जडणघडणीवर झाले. सातारा जिल्ह्यातील तासगाव, खानापूर, वाळवा, कोरेगाव आणि कराड या तालुक्यांमध्ये हा उठाव प्रामुख्याने झाला. सातारा तालुक्यातसुद्धा काही अंशी उठाव झाला. त्या काळातल्या ब्राह्मण जमीनदार आणि सनातन्यांच्या साक्षीप्रमाणे ३० खेड्यांमध्ये त्यांच्या विरोधी घटना घडल्या. पंढरपूर येथील ब्राह्मण्यसंरक्षक परिषदेने सातारा जिल्ह्यात ब्राह्मणांवर झालेल्या तथाकथित 'अत्याचारांची' चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमले. त्यांच्या अहवालात म्हटले आहे, "ब्राह्मणांना शिव्या देणे, बीभत्स तमाशे करणे, हिंदू दैवते आणि धर्मगुरू यांची निंदा करणे, धाक घालणे, मजूर कामावरून पळवणे, लागणीस आलेल्या जमिनी स्वत: न करणे व दुसऱ्यास करून न देणे, ग्रामजोशांच्या हक्कास हरकत करणे..." असे 'अत्याचार' केले.

याच घटनांच्या बाबतीत १९२३ साली एका ब्रिटिश अधिकाऱ्याने, कौन्सिलमध्ये विचारल्या गेलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, म्हटले आहे, 'सातारा जिल्ह्यात कूळ शेतकऱ्यांचा अंशत: संप १३६६ खेड्यांपैकी २४ गावांमधे झाला होता. काही ब्राह्मण जमीनदारांनी केलेल्या अव्वाच्या-सव्वा मागण्यांमुळे त्यांच्या जमिनी कुळांनी न कसता पाडून ठेवल्या. ही परिस्थिती आता बदलली आहे आणि आता काही तालुक्यांमध्ये अशा जमिनी कसायला सुरुवात झाली आहे." ब्राह्मण जमीनदारांनी जमिनींचा खंड दोनतृतीयांश किंवा तीनचतुर्थांश पर्यंत वाढवला होता. उरलेले उत्पन्न मोठ्या प्रमाणात सावकाराला जात होते. म्हणून हा उद्रेक झाला होता. या कूळ शेतकऱ्यांच्या संपात बलुतेदारांनीही भागिदारी केली होती. ब्राह्मणांची कामे करायला परीट, न्हावी, कुंभार, मांग, महार अशा स्पृश्य-अस्पृश्य बलुतेदारांनी नकार दिला. त्यामुळे ब्राह्मण जमीनदारांची सर्व बाजूंनी नाकेबंदी झाली. जमीनदारी आणि तिला पोटात घेणारी जातीय पिळणुकीची एकंदर बलुतेदारी चौकट यांच्यावर समग्र हल्ला करणारी

भारतातील ही एकमेव चळवळ आज इतिहासाला माहीत आहे. भारतातल्या खऱ्याखुऱ्या कृषी क्रांतीची, जातिव्यवस्था संपवणाऱ्या क्रांतीची झलक या उठावात दिसते. क्रांतिसिंह नाना पाटील नंतर कम्युनिस्ट पक्षात गेले. ते तरुणपणी या क्रांतीचा भाग होते. पण कम्युनिस्ट पक्ष मात्र त्यांच्या जिवंत अनुभवातून कधीच शिकला नाही. नाना पाटील पुढेच जात राहिले पक्ष त्यांच्याबरोबर जाऊ शकला नाही.

सातारा जिल्ह्याचा त्या वेळचा ब्रिटिश कलेक्टर इ. इ. मोयसे हा या उठावाविषयी म्हणतो, "ब्राह्मणांविरुद्ध गुन्हे केले गेले नाहीत असे मी म्हणणार नाही. पण अनेक चौकशांमधून आलेला अनुभव असे दाखवतो की हिंसाचाराच्या ज्या घटना त्यांच्याविरुद्ध घडल्या त्या 'ब्राह्मण' जात म्हणून घडल्या नाहीत. तर त्या अप्रिय जमीनदार, सावकार म्हणून घडल्या. ज्या ब्राह्मणांविरुद्ध तक्रारी नव्हत्या त्यांना शांततेत राहू दिले गेले. आता ही चळवळ आजपर्यंत घेतल्या जाणाऱ्या दोनतृतीयांश किंवा तीनचतुर्थांश खंडाऐवजी अर्ध्या उत्पन्नाएवढा खंडच फक्त देण्याकडे वाटचाल करीत आहे..."

एकंदर सातारा जिल्ह्यात दोन वर्षांत जमीनदाराच्या शेतावरचे पीक कापून नेण्याच्या ५ घटना; घरे लुटणे व जाळण्याच्या ६ घटना; मारहाणीच्या सहा आणि खेड्यातून संबंधित ब्राह्मणांना पळवून लावण्याच्या पाच घटना नोंद झाल्या होत्या. शेकडो वर्षांच्या शोषणाच्या पार्श्वभूमीवर आणि उठावाचा काळ व व्यापकता यांचा विचार केला तर या घटना फार नाहीत. चीन आणि रशिया या देशांमधे झालेल्या शेतकऱ्यांच्या उठावांशी तुलना करत हा 'हिंसाचार' नगण्य स्वरूपातला म्हणावा लागेल. पण सनातनी ब्राह्मणांनी आणि तत्कालीन काँग्रेसच्या ब्राह्मणी पुढाऱ्यांनी सामाजिक न्यायाचा विचार न करता अत्याचारांचा कांगावाच फार केला. क्रांतिसिंह नाना पाटील तरूण वयात या सर्व घटनांचे साक्षी आणि सहभागी होते. पुढील काळात झालेला त्यांचा चळवळीतला सहभाग या महत्त्वपूर्ण चळवळीच्या खांद्यावर उभे राहून झाला. सांस्कृतिक क्षेत्रात एकंदर सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळीचा भाग असणारे पण स्वतः जमीनदारी हितसंबंध असणाऱ्या ब्राह्मणेतरांनी या चळवळीला पाठिंबा दिला नव्हता. त्याच बरोबर काँग्रेसच्या ब्राह्मणी पुढाऱ्यांनीही दिला नव्हता. ब्रिटिश सरकारविरुद्ध साराबंदीसारखी चळवळ करायला काँग्रेस पुढारी पाठिंबा देत होते. पण जमीनदारी आणि जातिव्यवस्थेच्या विरुद्ध आवाज उठवणारी चळवळ त्यांना परवडत नव्हती. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ६ ऑगस्ट १९२१ चे नियतकालिक 'सोशॅलिस्ट' म्हणते, "ब्राह्मणेतर चळवळ ही अर्थहीन आहे. या चळवळीची

प्रेरणा एकदम संकुचित आहे. जातीय द्वेश हा तिचा मुख्य आधार आहे. या चळवळीला आर्थिक पाया नाही.'' क्रांतिसिंहाना हे दु:ख पुढच्या जीवनात राहिले. ब्राह्मणेतर चळवळीचे जातीय शोषणाविरुद्ध असलेले अंग कम्युनिस्ट पक्षाला कधी दिसलेच नाही. जातिव्यवस्थेकडे आर्थिक शोषणाचे हत्यार म्हणून पक्षाने पाहिलेच नाही. क्रांतिसिंहाच्या दृष्टीने जातिव्यवस्थेचा अंत झाल्याशिवाय भारतीय क्रांतीच अशक्य होती. त्यांच्या मृत्यूनंतर २५ वर्षांनी आज हे सत्य कुणी पुरोगामी छातीठोकपणे नाकारू शकणार नाही. कारण ब्राह्मण्यवादी जातिव्यवस्थेचे पुरस्कर्ते राज्य सत्तेवर बसू शकले आहेत.

# १९३० ते १९४२ मधली मशागत

“नाना पाटील बोलत होते, ‘बा मेला, त्याला जाळला वड्याच्या काठाला. त्याच्यासाठी पुन्हा भाताचं गोळं करून ठिवायचं. पिंडाला कावळा शिवला पायजे. याचा अन् कावळ्याचा काय संबंध ते एक मंतर सांगणाऱ्या बामनालाच ठावं.

‘पिंड पाडणाऱ्यानं हुभं ऱ्हायाचं. हात जोडायचं. कुणाला? झाडावरच्या कावळ्याला. त्याला आर्जव करायची, ये महाराजा, पिंडाला निसती टोच हान. तुझ्या मनातल्या सगळ्या इच्छा मी पुऱ्या करीन. ये, ये. कावळं कशाचं येतंय? मानसाच्या गर्दीत कशाला इल शाना कावळा. तो झाडावर बसूनच काव काव करीत ऱ्हातो. तास दोन तास मिन्त्या केल्या तरी कावळा काय पिंडाला शिवत न्हाई. मग भडजी काय करतो? दरभाचा कावळा. त्यो खोटा कावळा पिंडाला शिवला की मेलेला बा जेवला. थुः त्येचा.

‘बाचं दिस संपलं की पुन्ना हायच. आपलं रान, आपली जियाबं, आपली पिकं. पिकाची राखण तर डोळ्यांत त्याल घालून कराया होवी. ज्या हातानं पिंड पाडलं त्याच हातात मग गोफन. हातं काय कावळ्याला आवतान लागत न्हाई. झुंडीच्या झुंडी उतरत्यात वलां जुंदळा खायला. मग कावळ्याला हात कोन जोडतंय? मग भिरीरी धोंडं, शिव्या! हे काय याड म्हणावं का खुळ?’ सारा जमाव हसू लागला. हसता हसता थबकला. वक्त्याने त्यांना समजावून सांगितले, ‘आपूनच आपल्याला हसावं अशा या रूढी फेकून द्या, शानं व्हा...” ग. दि. माडगूळकरांनी ‘मी सिंह पाहिला होता’ या लेखात सांगितलेली क्रांतिसिंहाची ही आठवण. बहुजन कष्टकरी जनतेच्या मनाची मशागत नाना पाटील अशा भाषणांमधून करीत. ते समुदायांचे होते आणि समुदाय नेहमीच त्यांचा होता.

‘ग. दि. मा. याच लेखात क्रांतिसिंहांच्या भाषणातला आणखी एक चुटका सांगतात. “अरं म्हारं, मांगं, चांभारं, भंगी ह्यास्नी लांब का ठेवता? ती घान

काम करत्यात म्हनून? तुमचा सोताचा डावा हात सकाळी उठल्या उठल्या कसलं काम करतो? घानच नव्हं ते काम? त्येला तोडून वायलं ठिवता का? न्हाई.''

''डावा हात घाण काम करतो, त्येला तुमी राख लावून, शाप धून काढता, त्याच हातावर मिसरी ठेवता. उजव्या हाताच्या बोटानं ती मिसरी दाताला लावता. खरं का न्हाई?''

नाना पाटील (त्यांना सर्वजण 'अण्णा' म्हणायचे) अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्था यांना नामशेष करायला कटिबद्ध असणाऱ्या सेनापतींपैकी होते. अस्पृश्यांवर लादलेली घाण कामेसुद्धा त्यांना करायला लागू नयेत यासाठीही त्यांनी लढा दिला. ते त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रथम 'सत्यशोधक' होते आणि मग सर्व काही. १९३० सालापासून या इतर विचारांमध्ये महात्मा गांधींचा स्वातंत्र्याचा विचार येऊन मिसळला. १९४८ सालापासून मार्क्सवादाला त्यात स्थान मिळाले. पण मूळ गाभा सत्यशोधकीच राहिला. त्याला धक्का लावण्याची गरजच पडली नाही. उलट महात्मा जोतीराव फुल्यांच्या विचारांचा कस लावूनच अण्णांनी अन्य विचार स्विकारले. जेवढे पटले तेवढेच अंगीकारले. म्हणूनच प्रत्येक भाषणाच्या सुरूवातीला न विसरता 'महात्मा गांधी की जय' म्हणणाऱ्या अण्णांनी प्रतिसरकारच्या सशस्त्र चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. सत्याग्रही रीतीने जेलमधे जायला नकार दिला. जीवावर उदार होऊन आणि प्रचंड यातना सहन करून कंठावे लागणारे भूमिगत जीवन स्वीकारले.

क्रांतिसिहांच्या १९३० ते १९४२ या काळातल्या कार्याचे वर्णन त्यांचे एक प्रमुख शिष्य आणि वारसदार क्रांतिवीर नागनाथ नायकवडी फार चांगल्या प्रकारे करतात. ते म्हणतात, ''वडिलांनी जमीन चांगली उभी-आडवी खोल नांगरावी. उन्हाळ्यातल्या कुळवाच्या पाळ्या द्याव्या. जमीन चांगली गुलालागत करावी. चांगलं भरपूर शेणखत पसरावं, ताग गाडावा आणि एवढं सगळं रान तयार केल्यावर मुलांनी पेरणी करून आयतं पीक घ्यावं. तसंच १९४२ च्या प्रतिसरकारमधे पुढाकारानं काम करणाऱ्या, त्यावेळी तरुण असलेल्या, आम्हा मंडळींचं आहे. नाना पाटलांनी त्या काळातला सातारा जिल्हा असाच विचारांच्या नांगरानं उभा-आडवा नांगरला. गावागावापर्यंत पोहोचून कुणबी-कुरवाडी आणि बारा बलुतेदार अशा बहुजन जनतेच्या मनाची मशागत केली. स्वातंत्र्यासाठी मरायला तयार होणारी माणसं तयार केली आणि आम्ही तरुणांनी

४२ च्या प्रतिसरकारचं पीक घेतलं. पण तेही त्यांच्याच नेतृत्वाखाली घेतलं. सर्वच प्रतिसरकारवाल्यांना नाना पाटलांचंच नाव घ्याव लागेलं. कारण जनता नाना पाटलांची होती.''

१९४२चे एक प्रमुख क्रांतिवीर डी. जी. देशपांडे म्हणतात, ''...लढ्याचे एखमुखी नेते म्हणून नाना पाटील यांची निवड करण्यात आली. भूमिगत कार्यकर्ते व उघड कार्य करणारे पकडले गेल्यास सरकार जे जे आरोप ठेवेल त्या सर्वांबाबत नाना पाटलांचा आदेश म्हणून सांगावयाचे. ही जोखीम पार पाडण्याची जबाबदारी नाना पाटील यांनी प्रतिज्ञेवर स्विकारली. पाठोपाठ या संघटनेची जबाबदारी पार पाडण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आली. नाना पाटील यांची डिक्टेटर म्हणून नेमणूक करण्यात आली.'' अशा तऱ्हेची जबाबदारी फक्त क्रांतिसिंहांवरच टाकणे शक्य होते. कारण संपूर्ण सातारा जिल्ह्यात गावोगावची जनता सर्वात जास्त त्यांनाच ओळखत होती. 'नाना पाटलांची माणसे' म्हटले की जनता निर्धास्तपणे कार्यकर्त्यांना आसरा देत होती. कार्यकर्त्यांना कुटुंबाचा भाग बनवीत होती. त्याचबरोबर असे करण्यामुळे जी जोखीम स्वीकारावी लागत होती तीही स्वीकारायला अण्णांच्यासारख्या निधड्या छातीचा बुजुर्ग माणूसच योग्य होता.

क्रांतिसिंह खरे गाजले ते १९४२ च्या साताऱ्याच्या प्रतिसरकारचे नेते म्हणून. पण हे नेतृत्व त्यांना प्राप्त करून देणारा कष्टाचा काळ हा १९३० ते ४२चा होता. याच काळात नाना पाटलांनी जनतेला क्रांतीप्रवण केले आणि पुढच्या संघर्षासाठी घडवले आणि याच काळात जनतेने नाना पाटलांना क्रांतिसिंह बनवत नेले. क्रांतिसिंह म्हणून घडवले.

१९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सहभाग करून क्रांतिसिंहांनी स्वातंत्र्य चळवळीतले आपले कृतिशील सहभागाचे काम सुरू केले. सरकारचे वॉरंट झुगारून देऊन अण्णांनी दोन वर्षे पोलिसांना न सापडता गावोगावी धूमधडाक्याने प्रचार सभा घेण्याचा सपाटा चालवला. १९३२ सालीच पहिल्यांदा पोलीस त्यांना अटक करू शकले. पण ही शिक्षा साधी नव्हती. सक्तमजुरीची होती. येरवडा जेलमध्ये मोठ्या जात्यावर दळण दळण्यापासून अनेक हालअपेष्टा करणारे श्रम त्यांना करणे भाग पाडले गेले. १९३२ ते ४२ या दहा वर्षांत अण्णांना आठ वेळा तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली.

१९३० साली वॉरंट झुगारून क्रांतिसिंह सभांचे दौरे करू लागले. या सभा महाराष्ट्रभर झाल्या. सावंतवाडी, बेळगाव, चंदगड, पंढरपूर, मराठवाड्यातील

गावे असा या सभांचा पसारा होता. याच दौऱ्यात ते मुंबई येथे आले. त्यांचे मित्र यशवंत पुंदीकर त्यांच्याबरोबर होते. त्यांना दहा मिनिटांची वेळ देण्यात आली पण त्यांच्या भाषणाने लोक इतके रंगून गेले की दीड तास भाषण चालले हे लक्षातसुद्धा आले नाही! नाना पाटील एकदा भाषणाला उभे राहिले की ते आणि समोर बसलेली जनता यांच्यामध्ये असे घट्ट नाते तयार व्हायचे की सर्वजण भोवतालच्या जगाला विसरून जायचे. लोकांच्या भाषेतली मांडणी, लोकांच्या दररोजच्या जीवनातील अनुभवावर आधारलेली उदाहरणे. प्रत्येक उदाहरणाला प्रबोधनाबरोबरच विनोदाची किनार असायचीच. जीवनात दुःखे आणि समस्या निर्माण करणाऱ्या किचकट गोष्टींचा अत्यंत सोप्या भाषेत उलगडा करण्याची हातोटी. यामुळेच जनतेच्या मनाची तार त्यांच्या भाषणाशी जुळायची.

१९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत अण्णांना तुरुंगात टाकले गेले. त्यांना दोन महिन्यांनंतर पॅरोलवर सोडले आणि इस्लामपूर पोलीस स्टेशनला हाजरी देण्याची सक्ती केली. हा काळ क्रांतिसिंहांच्या जीवनातला सर्वात जास्त मानसिक आणि शारीरिक त्रासाचा ठरला. इस्लामपूरलाच रहावे लागले. तिथे कोणीही राहण्याची सोय करणारे मिळाले नाही. जेवण घालणारे तर सोडाच. ईस्लामपूरच्या काँग्रेस कमिटीकडे फंड होताच पण त्यातून अण्णांसाठी तरतूद करण्याची त्यांची तयारी नव्हती. या काँग्रेस कमिट्या शेटजी-भटजींच्याच होत्या. त्यांनी क्रांतिसिंहांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली. पण इस्लामपूर स्टँडवरचे हमाल मात्र अण्णांच्या मदतीला आले. इस्लामपूरच्या गाडगेमहाराजांच्या मठातील बुवांनी सरकारला घाबरून चोरून का होईना पण त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. या काळात अण्णांनी गोणपाटाच्या पोत्याचा सदरा आणि तसलीच अर्धी पँट असा पोषाख केला! या छळणुकीतून जात असतानासुद्धा क्रांतिसिंहांचा निर्धार ढळला नाही.

याच मशागतीच्या काळातली एक आठवण १९४२ च्या प्रतिसरकारचे एक क्रांतिवीर धोंडिराम माळी यांनी सांगितली आहे. १९३८-३९ साली जिल्हा काँग्रेस कमिटी रॉयवाद्यांच्या ताब्यात होती. ह. रा. महाजनी अध्यक्ष होते. जिल्ह्याच्या पातळीवरची परिषद महाजनींच्याच अध्यक्षतेखाली तासगाव येथे १९३९ साली भरवण्यात आली होती. प्रमुख वक्ते आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट नेते असलेल्या कॉम्रेड एम्. एन्. रॉय यांनी या परिषदेत म. गांधींवर टीका केली. दहा हजार श्रोते असलेल्या या सभेच्या स्टेजवर अण्णा धावले, माईकचा ताबा घेतला आणि महात्मा गांधींच्या नावाचा जयजयकार सुरू केला. नेहमीच्या पद्धतीने शड्डू मारून ते ठामपणे उभे राहिले. सभा उधळली गेली. जनतेशी

जिवंत नाते असल्यामुळेच क्रांतिसिंह असे धाडस आत्मविश्वासाने करू शकले. जनतेच खोलवर मुळे पसरलेले झाड म्हणजे नाना पाटील हेच सत्य या घटनेतून सिद्ध झाले असे निश्चितपणे म्हणता येईल. नाना पाटलांनीच जनतेच्या मनात रुजवलेले म. गांधींच्या जनवादी धोरणाचे प्रेम या प्रसंगी प्रत्यक्षात दिसून आले.

क्रांतिसिंह गावोगावी सभा घ्यायचे म्हणजे आजच्या पुढाऱ्यांसारखे आधी संघटित केलेले दौरे करायचे असे नाही. 'कार्यकर्ते पुढे गेले आहेत. गावातल्या कार्यकर्त्यांना भेटून सभेचे व्यासपीठ तयार केले आहे. संपूर्ण गावात सभेचा प्रचार केला आहे. लाऊडस्पीकर लावला आहे. लोक जमून वाट बघत आहेत. मग पुढारी सभेच्या ठिकाणी येत आहेत.' अशी अवस्था त्या काळात नव्हती. काँग्रेसमधली श्रीमंत मंडळी खादीचे कपडे घालून फिरण्यापलीकडे काही करीत नव्हती. खेड्यापाड्यांतल्या जनतेपर्यंत काँग्रेस पोहोचवण्याचे काम करणारी माणसे त्या काळच्या मोठ्या सातारा जिल्ह्यात एका हाताच्या बोटांवर मोजण्याएवढीसुद्धा नव्हती. अण्णा यात प्रमुख होते.

क्रांतिवीर नागनाथ नायकवाडी प्राथमिक शाळेत असताना, ८-१० वर्षांचे असताना, क्रांतिसिंह सभा घेण्यासाठी अनेक वेळा वाळवे गावात येत असत. त्या विषयीची त्यांची आठवणही या संदर्भात अत्यंत बोलकी आहे. "माळावरच्या मारुतीच्या देवळाजवळ नाना पाटील येत असत. 'भारत माता की जय', 'छत्रपती शिवाजीमहाराज की जय', 'महात्मा गांधीकी जय' अशा घोषणा देत असत. त्यांच्या हातात काँग्रेसचा एक झेंडा असे. घोषणा ऐकून आम्ही लहान मुले त्यांच्याकडे धावत जात असू. जो मुलगा पहिल्यांदा त्यांच्या जवळ जाई त्याच्या हाती ते झेंडा देत आणि फेरी सुरू करून त्याला सर्वात पुढे चालायला सांगत. मी जोरदार वेगाने उड्या मारत सर्वात आधी नेहमीच पोहोचत असे. नाना पाटील स्वत:च्या सभेचा प्रचार मुलांची फेरी गावभर फिरवून स्वत:च करीत असत. 'आज अमक्या वेळी, अमक्या ठिकाणी नाना पाटलाची सभा आहे, त्याला मोठ्या संख्येने हजर राहा' असा या घोषणांचा आशय असे. लोक बत्ती देऊन उजेडाची सोय करीत. एकदा सभा सुरू झाली की नाना पाटील यांचे अधिराज्यच लोकांच्या मनावर तयार होई देहभान हरपून स्त्रिया-पुरुष सभा ऐकत. खरे नाना पाटील भाषणाला तोंड उघडल्यावरच कळत." असे प्रत्येक गावात घडत असे. प्रत्येक गावात लहान मुलांना जमवून फेरी होत असे. १९३०-३२ साली जी मुले १०-१२ वर्षांची होती ती १९४२ साली २०-२२ वर्षांची झाली. वाळवे गावात झालेल्या संस्कारातून १९४२ पर्यंत नागनाथ नायकवडी, किसन अहिर, खंडू शेळके अशी क्रांतिकारक कार्यकर्ते मंडळी

तयार झाली. सर्वच गावात नागनाथ नायकवडी किंवा बाबुजी पाटणकर तयार झाले नसले तरी १९४२ साली शस्त्रे घेऊन लढणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांची भीती न बाळगता लपवून ठेवणारे, भूमिगत आल्यावर त्यांना जेवण पुरवणारे, गावात सेवादल चालवणारे, न्यायदान मंडळ चालवायला मदत करणारे असंख्य कार्यकर्ते तयार झाले. यापैकी प्रत्येक कार्यकर्ता लहानपणी क्रांतिसिंहांच्या सभा प्रचार फेरीत भाग घेणारा नक्कीच होता! सातारा जिल्ह्याच्या क्रांतिकारक मातीतून क्रांतीला आधार देणारे हजारो हात उगवायला लावण्याची किमया नाना पाटलांनी करून दाखवली. अत्यंत कठीण परिस्थितीत करून दाखवली. हेच त्यांचे मोठेपण आहे.

मोठ्या शहरातल्या सभांमध्येसुद्धा क्रांतिसिंह कसे प्रभावी असत याची एक आठवण स्वातंत्र्यसैनिक श्री. संभाजीराव थोरात यांनी सांगितली आहे. १९३७ साली इंग्रज सरकारच्या हुकमतीखाली संघटित होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांचा प्रचार चालू होता. काँग्रेसचे उमेदवार म्हणून बहे-बोरगावचे श्री. आत्माराम पाटील निवडणुकीला उभे होते. कृष्णा-कोयनेच्या संगमावर वाळवंटीच पं. जवाहरलाल नेहरूंची सभा आयोजित झाली होती. पंडित नेहरूंचे प्रभावी भाषण झाल्यावर आभार मानायला उभे राहिलेल्या नाना पाटलांनी पंडितजींची भूमिका जनतेला अशा अमोघ शेतकरी भाषेत सांगितली की त्यांनी जनतेच्या मनाचा ठाव घेतला. पंडितजींच्या नंतर लोकांना खिळवून ठेवणे हे दुसऱ्या कुणालाच जमले नसते!

आचार्य कॉ. शांताराम गरूड यांनी नाना पाटलांच्या एका सभेची १९३८ सालची आठवण सांगितली आहे. ही आठवण दुसऱ्या एका अर्थाने महत्त्वाची आहे म्हणून ती मुद्दाम नोंदवली पाहिजे. "...ती आठवण अजूनही अंगावर मूठभर मांस चढवते. तासगाव तालुक्यातील वसगडे या गावी मी त्या वेळी मराठी सातवीत शिकत होतो. सेवादल व युवक संघटनांत मी त्या आधीपासूनच काम करीत असल्याने गावात नाना पाटील आल्याचा निरोप मला आला. त्या वेळी कोणीच मोठे पुढारी गावात नव्हते. म्हणून आम्ही मुलांनीच त्यांना सांगितले, 'कोणी नसले तरी आम्ही सभा जमवतो'. आमचा उत्साह पाहून नाना पाटीलही 'ठीक आहे' म्हणाले. मग आम्ही मुला-मुलींनी वसगडे व नांद्रे या दोन गावात दवंडी पिटून सभा जाहीर केली. रात्री वसगड्याच्या चावडीसमोर तीन चारशे स्त्री-पुरुष जमा झाले. अजूनही मोठे पुढारी कोणी आले नव्हते. आम्ही सभा सुरू केली. नाना पाटील दोन तास बोलले. सारी सभा तल्लीन झाली होती. अशा या सभेचा अध्यक्ष होण्याची जबाबदारी माझ्यावर आली

होती. मीही ठसक्यात भाषण केले. लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. नाना पाटलांनी पाठीवर थाप मारली. जणू आपल्या पंथात मला सामील करून मीही आजतागायत माझे सारे आयुष्य राष्ट्रकार्यासाठीच वेचत आलो आहे. त्या वेळी पाठीवर पडलेल्या हाताचीच ही किमया असावी. हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. पण हा एकच असण्याची शक्यता बिलकूल नाही. कारण नाना पाटील अखंड बारा वर्षं पायाला भिंगरी बांधून सातारा जिल्ह्याच्या गाव खेड्यातून आणि शिवारातून फिरत होते. या फिरतीत त्यांनी कितीतरी जणांच्या पाठीवर असे हात फिरवले असतील. कितीतरी मने चेतवली असतील आणि कितीतरी माणसांना माणसे बनविले असेल. त्यामुळेच १९४२ च्या लोकलढ्याची प्रेरक शक्ती असे त्यांना मानण्यात येऊ लागले आणि त्यांचे नेतृत्व त्यांना बहाल करण्यात आले. सारे गावच्या गाव उभे करून इंग्रजाशी मुकाबला करायला सिद्ध करायची किमया केवळ त्यांच्या शब्दांत होती. तो काही कोणा दैवी शक्तीचा प्रताप नव्हता, तर या एक तपाच्या पायपिटीच्या तपश्चर्येतून मिळालेले ते सामर्थ्य होते.''

आयुष्यभर कष्टकरी जनतेच्या, कामगार, शेतमजूर, कष्टकरी-शेतकऱ्यांच्या शोषणमुक्तीच्या लढ्यात झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी, पूर्ववेळ कार्यकर्ते बनणाऱ्यांपैकी कॉ. शांताराम गरूड एक आहेत. घर असून गेली कित्येक वर्षे घराकडे न फिरकलेले क्रांतिवीर नागनाथ नायकवडी आहेत. शेख काका, बाबूजी पाटणकर, विष्णुभाऊ डोईफोडे, जी. डी. लाड, भगवानराव मोरे इत्यादीसुद्धा याच प्रकारचे कार्यकर्ते होते. नाना पाटलांच्या प्रेरणेने केवळ जनतेची उठावणी झाली असे नाही. केवळ स्वातंत्र्य चळवळीपुरते, १९४२ च्या प्रतिसरकारपुरते कार्यकर्ते घडले असे नाही. तर १५ ऑगस्ट १९४७ नंतरही राबणाऱ्या जनतेच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी पुन्हा चळवळीत गाडून घेऊन आयुष्य अर्पण करणारे कार्यकर्तेही घडले. अण्णा केवळ जनतेच्या तात्पुरत्या उठावाची प्रेरणा नव्हते तर क्रांतिकारी उठाव करणाऱ्या जनतेला संघटित करणारांची फळी निर्माण करणारे निर्माते होते. त्यांच्या पाठीवरून फिरणाऱ्या हाताचे महत्त्व इतके ऐतिहासिक आहे.

या संदर्भात क्रांतिसिंह जनतेला कोणत्या भाषेत सांगायचे, कसा संवाद साधायचे याची उदाहरणे सांगणे उद्बोधक आणि रंजकही ठरेल. क्रांतिसिंहांना समजून घेण्यासाठी त्यांच्या भाषेत ही उदाहरणे सांगणे गरजेचे आहे.

कष्टकरी जनताच परिस्थितीचे, व्यवस्थेचे सर्व तडाखे खाते पण व्यवस्थेतून

मिळणारे फायदे मग आयतोबांनाच मिळतात हे सांगताना अण्णा उदाहरण द्यायचे, "बायका रानसटवाया पुजतात! रानसटवाया पुजायच्या म्हंजे गावाच्या बाहीर जावं लागतं. तिथं जाऊन तान्ह्या मुलासंग ती बाई रानसटवाई उभा करती. कशी? एक म्हण हाय. टाकीचा घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत न्हाय. तसं चेपलीचा रट्टा मिळाल्याशिवाय रानसटवाई उभा रहात न्हाय! बाई समोरच्या एकेका दगडाला चेपलीचा एकेक रट्टा देती आणि दर रट्ट्याला आपल्या सोबतच्या मुलीला म्हणती, 'ही एक उचल, ती एक उचल.' असं पाच बारकं बारकं दगाड गोळा करती. अन् साव्वा नेटका हुडकायचा. नेटका कशा करता? पाचाला वळीनं मांडायचं. त्येना हळदकुंकू वाह्याचं. पाणी वाह्यांचं आणि जवा नारळ फोडायची येळ ईल तवा साव्वा हुडकायचा. का? त्यो नेटका हाय! दांडगा हाय! त्यो नारळाचा दणका सोशील! त्येला हातात घ्यायचा. आन् चलाखी त्या बाईची अशी, असा दणका देणार की, पाण्याचा एक थेंब त्या दगडावर पडणार न्हाय. ज्याच्या डोक्यावर नारळ फुटला त्याला पाण्याचा थेंब न्हाय तर खोबऱ्याचा तुकडा कुठला?

"आता आमचं म्हणणं हाय की, आता आमाला त्या पाचाच्या वळीत बशीव! आन् बायला सांगायचं आता लाव दणका कुणालाबी त्येची आयला! ज्यो सोशील त्यो खाईल! ह्यात काय गैर हाय सांगा की तुमी! जो दणका सोसत्याती त्येना पाण्याचा थेंब न्हाय आणि बाकीची हायती ती सगळं खात्याती. पयलंबी हाणत्याती आन् मागलंबी! सगळं निवादबी खात्याती!" हे उदाहरण सांगताना मिनिटा-मिनिटाला हशा पिकायचा. आणि सगळे 'नैवेद्य' आणि सगळी 'मलई' आयती खाणाऱ्यांना उत्स्फूर्तपणे शिव्याही बसायच्या. माणसांच्या मनात मुद्दा अगदी रुतून बसायचा.

दुसरे एक असेच उदाहरण, "मित्रहो! तुम्हाला मी एक उदाहरण सांगतो. एका बाईच्या बाळंतपणास तांदूळ पाहिजे होतं. उसनंपासनं करून तिला थोडं तांदूळ मिळालं. थोडं बाळंतपणात वापरून तिनं त्यातलं थोडं बाजूला काढून ठेवलं. काही दिवसांनी ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'तांदळात आळ्याजाळ्या झाल्याती. वाळत घालायला पायजे. तवा मी ही तांदूळ उन्हात घालती. कुनी तरी आजारी पडलं तर पुना लागतील. त्येला खायला घालू.' तिनं त्ये तांदूळ उन्हात पोत्यावर पसरलं. थोड्या वेळानं नवरा म्हणाला, 'तू जा, धुणं धून ये. तवर मी राखतो या तांदळाला.' नवरा तांदूळ राखत बसला. चिलिमबिलिम मग भरली. ती वडीत बसला. तवर गोठ्यात एक बकरं बांधलेलं होतं, त्या बकऱ्यानं तांदळाकडं बघितलं अन् त्येनं आपल्या दाव्याला दिलं दोन

हिसकं. त्या गरिबाचं दावं बी तसंच! ते तुटलं. बकऱ्यानं जाऊन तांदळात त्वांड खुपसलं ह्येनं बघितलं. म्हणला, आता जर ह्येला हाणावं, तर काय तांदूळ तोंडात, काय इस्काटत्याली! खाईना खाऊ देत! तंवर त्या रस्त्यानं त्येचा मित्र आला. त्यो म्हणाला, 'अरं हरिबा, अरं बकरं तांदूळ खातयं अन् तू तंबाकू वडीत बसलास?' 'ह्ये बघ'. हरिबा म्हणला. 'हिकडं ये, लांबनं बुजवू नकोस त्येला.' आणि त्येला जवळ बोलावला अन् म्हणला, 'वड तंबाकू.' त्यो म्हणाला, 'अरं, बकरं तांदूळ खातंय अन् तू तंबाकू वड म्हणतुयास?' तवा हरिबानं सांगितलं, 'अरं आनकी चार दिसांनी आमच्या देवाची जत्रा हाय. खाऊ दे काय तांदूळ खातंय ते! त्यानं जे वाडल रगात-मांस ते त्या दिवशी हाय आमालाच! आमीच त्याच्या मागं लागणार हाय! त्येची तू काय काळजी करू नगस.'

'तसं आपणाला मला सांगायचं आहे की, या काळाबाजार करणाऱ्यांची जत्रा आता हुयाची हाय! तुम्ही काय काळजी करू नगा! ही जत्रा झाल्याशिवाय रहात नाही तुम्हाला सांगतो.'

'आता आणीबाणी सुरू झाली! बरं झालं म्हटलं. वाटलं, आता ह्ये गडी काय तरी तांदूळ राखतील. पण ह्ये पोत्यासकट हाणायच्या बेतात हायती! जशी त्या बकऱ्याची कंदुरी तसं हे आलंय बेताला. मित्रहो! विचार केला पाहिजे आपण. आमचं काय म्हणणं आहे? कंदुरी करायची म्हणजे यांना ठार करायचं नाही. पण या गोरगरिबांकरता काय कराल की नाही?''

अशी जनजीवनातली उदाहरणे. अख्ख्या भांडवलशाहीलासुद्धा हे उदाहरण ते लावीत असत. आपले शोषण करून भांडवलशाहीचं हे बकरं आपल्या तांदळावर गुबगुबीत हुतंय. होऊ द्या. त्याला वेळ आल्यावर कापून आपणच खायचं आहे. समाजवाद आणायचा आहे.' अशा प्रकारे ते सांगत असत.

खादी आणि खाकीवरून त्यांनी विनोदी ढंगात काँग्रेस सत्ताधाऱ्यांवर धारदार टीका केली आहे. १५ ऑगस्ट १९४७ नंतरच्या काळात ही त्यांची एक खासियत होती. ''हे खादीधारी. लय हुशार. त्यांना खायाचं आसलं मजी त्ये पोलिसान्ला म्हणत्यात, 'खा की!' पण पोलीस त्येंच्या परासबी जादा हुशार. त्ये काँग्रेसवाल्यांना म्हणत्यात, 'खा आदी!' अशी ही खाकी-खादीची जोडी जनतेच्या उरावर बसली आहे.'' या मांडणीवर तर संपूर्ण सभेची हसूनहसून मुरकुंडी वळलेली माझ्या लहानपणी मी स्वतःच पाहिली आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. आपण आणखी एक असेच मासलेवाईक उदाहरण पाहूया.

"...मी आपणाला एक गोष्ट सांगतो... एक गरीब शेतकरी होता. त्याला एक दुभतं जनावर घ्यायचं हुतं. म्हस घ्यावी म्हणलं तर जादा पैसं पायजेत, तिला बांदायला जागा जास्त लागणार, वैरण जास्त लागणार. एवढी आपली परिस्थिती न्हाई. नवरा-बायकूनं इचार केला, आपन एक शेळी घेऊया. दुसऱ्या दिवसी बाजारात जाऊन चांगली दुदाची शेरडी इकत आनली. बाजारात दूद काडून बघून मग घेतली. शेळी घराफुडं बांदून तिला गवात-चारा घालून दोगजणं निवांत झोपली. सकाळी दूद काडायला गेली मालकीन तर शेरडीच्या कासंला दूदच न्हाय! निसत्या पिश्याच जनू. शेतकऱ्याला न् शेतकरनीला इपरितच वाटलं. काल एवडं दूद दिलं आन् आज आसं कायं झालं? का शेजारनीनं काडून घेतलं. त्यांनी इचार केला. आज शेरडीला घरात बांदायची. शेरडी घरात बांदून पुन्ना दोगं निवांत झोपली. दुसऱ्या दिसी बगितलं तर पुन्ना कासंत दूद न्हाई! मग त्येनी राच्चं जागून नजर ठेवायचं ठरविलं. जागता जागता जरा डोळा लागला तर चुरू चुरू आवाज याला लागला. काय वाजतंय म्हणून बगितलं तर काय—शेरडी आपलंच दूद आपूनच पेतिया!

"तसंच हाय ह्ये सरकार. सगळा विकासाचा पैसा आपूनच गट्टम करतंय. त्यासाठी त्येच्या कासंला शेणाचा बोळा फिरवला पायजे म्हंजे त्ये कासंला तोंड लावणार नाय! चळवळीच्या शेणाचा बोळा चांगला तयार करा."

क्रांतिसिंहांच्या पोतडीत अशी शेकडो उदाहरणं होती. ती इंग्रज सरकारला लागू होत तशीच जरा बदलून 'स्वातंत्र्याच्या' सरकारला लागू होत. हास्यविनोद करीत घणाघाती टीकाही होत होती. प्रबोधन होत होते. महाराष्ट्राने असा वक्ता त्यांच्यानंतर आजतागायत पाहिला नाही. एका खेड्यात सभा असली तर नाना पाटलांची सभा ऐकायला बैलगाड्या जुंपून बायका-मुलांसह शेजारच्या गावांची हजारो माणसं सभेला येत असत. अशा सभाही आता कुठे दिसत नाहीत. त्या मंतरलेल्या काळातल्या मंतरलेल्या सभा होत्या. नाना पाटील त्या काळाचे मांत्रिक होते.

## क्रांतिकारी फकिराचा जन्म

क्रांतिसिंह अण्णांचा जन्म जरी ३ ऑगस्ट १९०० रोजी झाला असला तरी त्यांचा क्रांतिकारी फकीर म्हणून राजकीय-सामाजिक कार्यकर्त्याच्या रूपात जन्म झाला तो १९३० साली.

१९१८-२० सालापासूनच अण्णा सत्यशोधक चळवळीत काम करीत होते.

त्याच काळात १९२० साली त्यांची तलाठ्याची नोकरी सुरू झाली. १९२६-२७ सालापासून ते काँग्रेसच्या, म. गांधींच्या नेतृत्वाखालील चळवळीत सहभागी होऊ लागले. १९२८ साली त्यांच्यावर गावाचा जमा झालेला शेतसारा वेळेत जमा केला नाही म्हणून सरकारने गुन्हा दाखल केला. चौकशी सुरू होण्याच्या काळातच ते नोकरी सोडून काँग्रेसच्या प्रचार कार्यासाठी गावोगाव फिरू लागले. १९३० सालचा जंगल सत्याग्रह, कायदेभंगाची चळवळ यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. १९३० ते १९३२ या काळात त्यांच्यावर असलेल्या पकड वॉरंटला धाब्यावर बसवून ते फरारी म्हणून राहिले. पण हा फरारी जगावेगळाच होता. त्यांनी डोंगरदऱ्यात लपून-झपून राहण्याऐवजी जनतेच्या उसळत्या सागरात सामावून जाण्याचा, त्या जनसागराच्या लाटांवर आरूढ होऊन पोलिसांच्या हाताला न लागण्याचा निर्णय घेतला. दोन वर्षे सातारा जिल्ह्यातले गाव न् गाव त्यांनी पिंजून काढले. एवढेच नाही तर बेळगाव-कोल्हापूरपासून मराठवाड्यापर्यंत, मुंबईपर्यंत ते सभा घेत फिरले.

१९३२ साली तुरुंगात जाताना त्यांच्यावर राजकीय केसेसबरोबरच शेतसारा वेळेत न भरण्याचा गुन्हा दाखल होताच. त्यांचे कराड येथील काँग्रेसमधले एक सहानुभूतीदार श्री. बटाणे त्यांना सांगत होते की 'तुम्ही गावकामगार पाटलाकडे शेतसारा दिला होता त्यामुळे तुम्ही ते सत्य सांगून मोकळे व्हा. या गुन्ह्यात अडकू नका.' पण नाना पाटलांनी ही भूमिका मान्य केली नाही. 'यामुळे पाटलाचे पिढ्या न् पिढ्यांचे वतन जाईल. त्याचे मोठेच नुकसान होईल. मी नोकरी करणारच नाही आणि जी शिक्षा होईल त्या शिक्षेमुळे माझे काही बिघडणार नाही. मी पाटलाला वाचवणार' असे त्यांनी ठामपणे सांगितले. एका बाजूला हा गुन्हा, दुसऱ्या बाजूला काँग्रेसच्या चळवळीतले दाखल झालेले गुन्हे आणि तिसऱ्या बाजूला दोन वर्षे फरारी होणे या सर्वांमुळे इंग्रजांच्या कोर्टाने त्यांना सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. चक्की पिसण्याची म्हणजेच मोठ्या जात्याने दळण्याची शिक्षा त्यांना मिळाली!

त्यांच्या एकुलत्या एका कन्येचा जन्म १९२६ साली झाला. फरारी असतानाच १९३० साली पत्नी आकुबाई यांचा मृत्यू झाला. त्या पाठोपाठ आजीही निवर्तल्या. वैयक्तिक जीवनात अशी संकटे एकामागून एक कोसळत गेली. अण्णा डगमगले तर नाहीतच पण त्यांनी या दुःखांच्या पार्श्वभूमीवरच 'घर' नावाची जीवनातली एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट पूर्णपणे सोडली. आई, वडील, भाऊ, बहीण आणि तीन-चार वर्षांची मुलगी यांच्याशी असलेले मायेचे पाश नजरेआड केले. त्यांनी गावोगावाच्या कार्यकर्त्यांची घरेच आपली मानायला

सुरुवात केली. अशी शेकडो घरे त्यांची होत गेली. अण्णा आपल्या घरी राहिले आणि जेवले याचा अभिमान बाळगणारी ही घरे त्यांच्या आवडीनिवडी समजून घेऊ लागली. केवळ भाजी-भाकरी, माडगं-पिठलं अशा गरिबा घरच्यांना त्रास न होता पुरवता येतील अशाच त्यांच्या आवडीनिवडी होत्या. शर्ट आणि पहिलवानी पांढरी लुंगी असा पोशाख अत्यंत साध्या राहणीमानात त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत स्वीकारला. अशा एकंदर प्रकियेतून एका क्रांतिकारी फकिराची देणगी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सामाजिक-राजकीय चळवळीला मिळाली.

त्यांच्या कन्या श्रीमती हौशाताई भगवानराव पाटील यांनी या काळातली जी आठवण सांगितली आहे ती फारच बोलकी आणि मनाला चटका लावून जाणारी आहे. त्या म्हणतात, "क्रांतिसिंह नाना पाटील हे माझे वडील. आम्ही त्यांना दादा म्हणत असू. दादांनी देशासाठी फकिरी स्वीकारल्यावर आमच्या कुटुंबावर अनेक अस्मानी व सुलतानी आपत्ती आल्या. दादांच्या जवळची नात्याची माणसे; माझी आई, आजोबा व पणजी एकामागून एक याप्रमाणे जगाचा निरोप घेऊन गेली. ही आठवण आहे माझ्या पणजीच्या म्हणजे दादांच्या आजीच्या मृत्यूसमयीची.

"माझ्या आजोबांना जाऊन महिना होतो न होतो तोच दादांच्या आजीने अंथरूण धरले. अगोदरच तिचे वय झाले होते. त्यातच आमच्या कुटुंबावर होणारे मृत्यूचे आघात त्या बिचारीला सहन झाले नाहीत. तिचे आपल्या नातवावर म्हणजे दादांवर खूप प्रेम होते. शेवटच्या दिवसांत तिने आपल्या लाडक्या नातवाच्या भेटीचा ध्यासच घेतला होता. नात्यातील सर्वांनाच वाटत होते की, मृत्यूपूर्वी दादांची व तिची भेट व्हावी, पण हे घडावे कसे? दादांच्यावर सरकारचे पकड वॉरंट होते व पोलीस अहोरात्र त्यांच्या पाळतीवर होते.

"भूमिगत अवस्थेत असणाऱ्या दादांच्या कानावर आजीचा आजार व तिने घेतलेल्या ध्यासाची वार्ता गेली. दादांच्या हृदयात कालवाकालव सुरू झाली. तिचा त्यांच्यावर विलक्षण जीव होता, या विचारांनी त्यांना बेचैन केले. शेवटी त्यांनी निर्णय घेतला की पोलिसांच्या हाती सापडलो तरी बेहत्तर, पण आजीची शेवटची भेट घ्यायची!

"आणि एक दिवस भल्या पहाटे निघून दिवस उजाडायच्या आत दादा घरात हजर झाले! बरोबर त्यांचे साथीदार पण होते. त्या सर्वांनी अत्यंत गुप्ततेने येण्याची योजना आखली होती. दादांना पाहताच घरादाराला आनंद झाला. ते धावतच आजीजवळ गेले व त्यांनी तिला हाक मारून आपण आल्याचे

सांगितले. लाडक्या नातवाला पाहून आजीच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. तिने त्यांच्या गालावरून आपले थरथरते हात फिरवले. दादांच्याही डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. त्यांनी आजीचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले. थोड्याच वेळात आजीने नातवाच्या मांडीवर प्राण सोडला. जणू याच क्षणाची ती वाट पाहात होती!

"घरात मृत्यूने आपले काम पुरे केले. त्याच वेळी गावात वेगळेच नाट्य सुरू झाले होते. कशी कोण जाणे पण दादा आपल्या साथीदारांसह आपल्या घरी आल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. ते गावात येऊन त्यांनी आमच्या वाड्यास वेढा दिला होता. पण घराजवळ येताच आतील रडारड ऐकून ते बाहेरच थबकले होते. अशा प्रसंगी दांडगावा करून आत शिरणे अप्रशस्त होईल अथवा त्यामुळे एखादा अनावस्था प्रसंग ओढवेल अशी पोलीस अधिकाऱ्याची भावना झाली असावी. कदाचित त्याच्यातली माणुसकीही जागी झाली असेल किंवा त्याने असाही विचार केला असेल की सावज तर आता हाती आले आहेच, उगीच गडबड कशाला? एवढेच नव्हे तर आजीची अंत्ययात्राही काढावयास त्याने परवानगी दिली!

"आजीच्या निधनाचे दु:ख आणि दादांच्या अटळ अटकेची चिंता अशा दुहेरी संकटाने सर्वांना घेरले होते. मृत्यू अटळ होता. पण पोलिसांकडून होणारी अटक टाळणे हे दादांच्या व त्यांच्या यशवंत पुणदीकरसारख्या साथीदारांच्या बुद्धिचातुर्यावर अवलंबून होते. बुद्धिचातुर्याने त्यांना दगा दिला नाही. त्यांनी एक क्लृप्ती योजली. आजीची तिरडी तयार झाली. त्यावर आता दादांनी झोपावे व आजीचे प्रेत शेणीच्या पोत्यात बांधून गाडीतून स्मशानापर्यंत न्यावे असे ठरले. पण दादांच्या आईला ही युक्ती पटेना. 'माझ्या लेकाला जिवंतपणी मी तिरडीवर बांधू देणार नाही' असा तिने पवित्रा घेतला. शेवटी तिच्याच लेकाच्या भल्यासाठी हे नाटक करावे लागणार आहे अशी समजूत घालण्यात दादांचे साथीदार यशस्वी झाले.

"थोड्याच वेळात घरातून आजीची अंत्ययात्रा निघाली. सोबतची शेणीची गाडीही होती. अंत्ययात्रा स्मशानापर्यंत पोहोचली असेल नसेल तोवर पोलीस घरात शिरले. दादांचा शोध घेऊ लागले. पण दादा त्यांना कुठेच दिसले नाहीत. सर्व बाजूंनी कडेकोट बंदोबस्त करूनही नाना पाटील कसे निसटले हे त्यांना फार उशिरा समजले!!!"

हा प्रसंग म्हणजे दु:ख, संयम, चित्तथरारक घटना यांचे जिवंत मिश्रण आहे. यातल्या सर्व यातना पचवून अण्णांनी आपली फकिरी जोपासली.

फकिरीला धक्का लागू दिला नाही. पुन्हा घराच्या 'मायापाशात' ते जराही गुंतले नाहीत. १९३६ साली त्यांनी आपली बहीण गंगूबाई हिचे लग्न कुंडलाचे एक कार्यकर्ते श्री. नाथाजी लाड यांच्याशी आयोजित केले. नाथाजी पुढे १९४२च्या प्रतिसरकारातले एक प्रमुख कार्यकर्ते बनले. हे लग्न गांधी पद्धतीने अवघ्या १५ रुपये खर्चात झाले. १९४० साली कन्या हौशाताईंचे लग्न खानापूर तालुक्यातील हणमंत वडियेचे श्री. भगवानराव पाटील यांच्याशी झाले. तेही गांधीपद्धतीने होऊन फक्त २० रुपये खर्चात पार पाडले गेले. भगवानराव पाटीलही पुढे प्रतिसरकारचे एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून पुढे आले. या घरच्या लग्नांच्या बाबतीतच सर्व रूढींना फाटा देऊन, स्वातंत्र्य चळवळीशी नाते जोडून आणि कमीत कमी खर्च करून 'गांधी लग्ने' लावण्याची रीत क्रांतिसिंहांनी स्वत: आचरणात आणून दाखवली. मग त्यांनी ती जगाला सांगितली. अशी लग्ने शेकडोंच्या संख्येने सातारा जिल्ह्यात लावली गेली. त्यामुळे माणसे स्वातंत्र्य चळवळीशी जोडली गेली, अंधश्रद्धा आणि ब्राहमण्यवादी रूढीपासून मुक्त झाली आणि कर्जबाजारी होण्यापासून वाचली. या लग्नात हुंडा, वाजंत्री, घोडा, बाशिंग या सर्व गोष्टींना फाटा दिला जाई. वधू-वरांना नवे खादीचे कपडे आणि एकमेकांना घालण्यासाठी सुताचे दोन हार यासाठी जेवढा लागेल तेवढाच खर्च या लग्नाला यायचा. जमलेल्यांनी स्वातंत्र्य चळवळीतली गाणी आणि मंगलाष्टका म्हटल्या की काम भागायचे. अशी लग्न पद्धती, जातिव्यवस्थेला विरोध करणारी, बिनखर्चाची, ब्राह्मण्याला सोडचिठ्ठी देणारी, स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा पुकारा करणारी, सर्वांना शिक्षण देण्याची शपथ घेणारी प्रथम महात्मा फुलेंनी सुरू केली. 'सत्यशोधक लग्न पद्धती' म्हणून पुढे आणली. क्रांतिसिंहांनी सुरुवातीच्या (१९२० पासून १९३०-३२पर्यंतच्या) काळात याच पद्धतीचा प्रसार केला. नंतर 'गांधी लग्न' म्हणून जास्त मोठ्या प्रमाणात प्रचारात आणले.

ही दोन लग्ने झाल्यावर तर अण्णा १०१ टक्के फकीर झाले. क्रांतिकारी परिवर्तनासाठी त्यांनी पायाला भिंगरी बांधून भ्रमण सुरू केले. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांनी ही क्रांतिकारी फकिरी अभिमानाने आणि निष्ठेने पाळली. म्हणूनच ते क्रांतिसिंह झाले. पण अशी फकिरी पत्करण्याच्या आधी त्यांनी ही महत्त्वाची ग्रहस्थी कर्तव्येही आपल्या सामाजिक तत्त्वांना बाधा न आणता पार पाडली. त्या आधी स्वत:चे लग्न झाल्यावर सत्यशोधक तत्त्वाप्रमाणे पत्नीला बरोबरीने वागवले. जुन्या वळणाच्या आजीचा विरोध प्रेमाने आणि ठामपणे मोडून काढून स्वत:च पत्नीला शिकविले. क्रांतिसिंहांच्या क्रांतिकारकत्वात याही आचरणाचा आणि त्या मागच्या तत्त्वांचा मोठा वाटा आहे.

●

# १९४२च्या सातारा प्रतिसरकारचे नेते

इंग्रजांच्या साम्राज्यशाही राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता असे म्हणतात. अशा इंग्रजी सत्तेला १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत जे प्रतिसरकार, जनतेचे समांतर सरकार, मोडता आले नाही त्या अजिंक्य प्रतिसरकारचे क्रांतिसिंह नाना पाटील हे प्रमुख नेते होते. आजच्या सांगली जिल्ह्याचा बहुतांश भाग आणि आजचा सातारा जिल्हा यांचा मिळून त्या वेळचा सातारा जिल्हा बनलेला होता. या ऐतिहासिक सातारा जिल्ह्यात जनतेचे सशस्त्र प्रतिसरकार उभे राहिले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी त्या वेळच्या गवालिया टँक मैदानावर आणि आजच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनात 'चले जाव'चा ठराव झाला. इंग्रजी साम्राज्यवादी भांडवलदारांना 'चले जाव' असा 'हुकूम' देण्याचा निर्णय क्रांतिकारक वृत्तीच्या तरुणांच्या अंगात वीज खेळवणारा होता. पण हे घडवण्यासाठी याच वेळी दुसरी घोषणा झाली होती, 'करेंगे या मरेंगे' ही भारतीय क्रांतिकारकांनी चळवळ्यांनी घ्यायची शपथ होती. 'एक तर इंग्रजांना घालवू नाही तर त्यासाठी प्राण अर्पण करू' असा निर्धार या घोषणेत होता. 'करेंगे या मरेंगे', 'करू किंवा मरू' या घोषणेतून काय करायचे हे मात्र स्पष्ट नव्हते. कोणत्याही नेत्याने याचे स्पष्टीकरण आपल्या भाषणात दिले नव्हते. काय करायचे ते कार्यकर्त्यांनी, जनतेने आपापल्या परीने ठरवावे, आपापल्या पद्धतीने ठरवावे असा त्याचा अर्थ होता. सर्वच  नेते या घोषणेनंतर पकडले गेले. त्यामुळे नंतरही कोणी राष्ट्रीय पातळीवर, राज्य पातळीवर मार्गदर्शन करीत नव्हते. या विशिष्ट परिस्थितीत प्रतिसरकारच्या जन्माची ताबडतोबीची बीजे आहेत.

प्रत्यक्षात सशस्त्र प्रतिसरकारची उभारणी होण्यासाठी सातारा जिल्ह्यात घडलेल्या आणखी दोन घटना कारणीभूत आहेत. त्या घटना म्हणजे इस्लामपूर आणि वडूज या दोन तहसील कचेऱ्यांवर गेलेल्या मोर्च्यांवर झालेले गोळीबार. हुतात्म्यांचे सांडलेले रक्त आणि आता गोळीचे उत्तर गोळीनेच दिले पाहिजे, अशी इंग्रज सत्ताधाऱ्यांनी तयार केलेली परिस्थिती. 'चले जाव घोषणे'नंतर

सातारा जिल्ह्यात झालेला पहिला मोर्चा २४ ऑगस्ट १९४२ रोजी कराड तहसील कचेरीवर निघाला. दुसरा त्याच दिवशी पाटण तहसील कचेरीवर झाला. ३ सप्टेंबर १९४२ रोजी तिसरा मोर्चा तासगाव तहसील कचेरीवर निघाला. या मोर्चात ८ ते १० हजार लोक सहभागी झाले होते. नाना पाटलांनी या मोर्च्याच्या प्रचाराची धुरा प्रामुख्याने सांभाळली होती. कृष्णराव कुऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा पहिल्यांदा मुनसफ कोर्टावर गेला. मुनसफांनी बाहेर येऊन श्री. कुऱ्हाडे यांना हार घातला आणि लोकांच्या मागणीप्रमाणे कोर्टास एका दिवसाची सुटी दिली! मामलेदारकचेरीवर मोर्चा गेल्यानंतर शंभर पोलिसांनी तो अडवला. आधी तसे ठरले नसतानाही लोक मोठ्या संख्येने हत्यारे घेऊन आले होते. भाले, कुऱ्हाडी, थोडीफार पिस्तुले आणि बंदुकासुद्धा होत्या. पोलीस आणि मामलेदार घाबरलेले होते. दहा-पंधरा प्रमुख कार्यकर्त्यांनी जाऊन मामलेदारांना सांगितले, 'आम्ही फक्त राष्ट्रीय निशाण लावणार आहोत. बाकी मोडतोड वगैरे काही करणार नाही. नंतर मामलेदारांना लोकांनी गांधी टोपी घातली. इंग्रजांचे 'युनियन जॅक' हे निशाण उतरवून राष्ट्रीय निशाण त्या जागी चढवण्यात आले. या मोर्चासाठी कामगारांनी किर्लोस्करवाडीचा कारखाना बंद ठेवला होता. सुमारे १,५०० ते २,००० कामगार मोर्च्यात सामील झाले होते. खेड्यांमध्ये सर्वत्र सभा झाल्या होत्या. क्रांतिसिंहांनी १,००० लोक बरोबर घेऊन एक प्रकारचा 'लाँग मार्च' काढतच सभा घेतल्या होत्या. गावचावड्यांवर तिरंगे फडकवले होते. सकाळी उठून सर्वांनी गाव-सफाई करायची, प्रभात फेरी काढायची, परेड करायची असा दररोजचा कार्यक्रम असायचा.

या सभांच्या वेळी क्रांतिसिंहांच्या भाषणाची जी आठवण सांगितली आहे. ती फार बोलकी आहे. "युद्धासाठी लोकांनी फार फार दिले. याची जाहिरात ब्रिटिश सरकारकडून केली जाते. सरकार म्हणते बायकांनी गळ्यातले दागिने दिले, पायातले दिले. इतकी मदत आम्हाला जनतेने केली. मग सरकार अजून मदत का मागते? गळ्यातले आणि पायातलेही दागिने दिले. मग पुन्हा आता मागितल्यावर काय द्यावे? आता आमचे सर्व दागिने संपले. आता पायात एकच दागिना राहिला आहे. आता मागितले तर तोच दागिना द्यायचा!" सरकारला आता जोडा हाणायचा हा संदेश अत्यंत नेमकेपणाने, राजकीय आशयासह आणि विनोदी शैलीत क्रांतिसिंह पोहोचवायचे. या त्यांच्या आगळ्या प्रचारामुळे तासगावचा मोर्चा सर्वात मोठा झाला. याही काळात ते भूमिगत असल्यामुळे प्रत्यक्ष मोर्च्यात गेले नाहीत हे विशेष.

९ सप्टेंबरला वडूज तहसील कचेरीवर मोर्चा निघाला. परशुराम घाटगे

यांच्या नेतृत्वाखाली वडगाव, पुसेसावळी, लाडेगाव, औंध इत्यादी गावातून लोक या मोर्च्यात सहभागी झाले होते. वडूज कचेरीपासून पन्नास यार्ड अंतरावर घाटगे, अशोक व अरविंद लोमटे, राम सुतार, किसन भोसले यांच्यासह सर्वांनाच पोलीस सबइन्स्पेक्टर बंडिगिरी व मामलेदार अंकली यांनी एक रेघ ओढून अडवले. आज्ञा मोडल्यास गोळीबाराची धमकी दिली. मोर्च्याचे पुढारी घाटगे यांनी आपला फक्त सभा घेऊन झेंडा वंदन करण्याचाच कार्यक्रम आहे असे सांगून रेघेच्या पुढे पाऊल टाकले आणि जोरदार गोळीबार झाला. वडूजच्या कचेरीसमोर सातारा जिल्ह्याचा 'जालियनवाला बाग' झाला!' परशुराम घाटगेंना ६, अशोक लोमटेला दोन आणि अरविंद लोमटेला ३ गोळ्या लागल्या. पैलवानांचा प्राण गेला तरी तिरंगा त्यांच्या हातात उंच धरलेलाच होता. या गोळीबारात जागचे जागी ५ आणि ७५ जखमींपैकी दोन, जखमा बऱ्या न झाल्यामुळे पुढे उशिरा एक असे एकूण आठ हुतात्मे झाले. परशुराम घाटगे, किसन भोसले, कुशाबा भोसले, शिदोबा पवार, राम सुतार, बलभीम खटावकर, बाळकृष्ण खटावकर आणि श्रीरंग शिंदे अशी या हुतात्म्यांची नावे आहेत.

या पार्श्वभूमीवर १० सप्टेंबर रोजी इस्लामपूर कचेरीवर मोर्चा निघाला. पांडू मास्तरांच्या पुढाकाराने दोन हजारांचा आणि वाळवे किर्लोस्करवाडी भागातून तीनएक हजारांचा अशा दोन तुकड्या झाल्या. पहिला आणि दुसरा मोर्चा यात एका तासाचे अंतर पडले. कुरळप, येडे, कामेरी भागांतून आलेल्या पहिल्या मोर्चाने गांधी चौकात सभा घेतली. पोलिसांनी लाठीमार करून पन्नास लोक जखमी केले आणि पांडू मास्तरांना पकडले. दुसरा मोर्चा कचेरीपासून सुमारे २०० यार्डावर अडवण्यात आला. तासगाव मोर्च्यात असलेला किर्लोस्करवाडीचा कामगार उमाशंकर पंड्याला पाहिल्याबरोबर डी.एस.पी. येट्स त्याच्यावर ओरडला, "तुम क्या मंगता है?" उत्तर आले, "स्वराज!" येट्सने पिस्तूल काढले आणि उमाशंकर पंड्या यांना गोळी घातली. ते जागीच संपले. हुतात्मा झाले. या पाठोपाठ झालेल्या गोळीबारात कळंत्रे, तुकाराम सुतार हे जखमी झाले. विष्णू बारबटे ठार झाले. वडूजचीच पुनरावृत्ती इथे थोड्या कमी तीव्रतेने झाली.

या दोन गोळीबारांमुळे भूमिगत राहून काम करण्याचे वळण चळवळीला लागू लागले. शांततेच्या मार्गाने गेल्यावरही जर गोळ्याच खाव्या लागत आहेत. जीव गमवावे लागत आहेत. मग आपणही शस्त्रे हातात घेऊन गुप्त रीतीने संघटना बांधून काम केले पाहिजे. असा विचार बहुतांश प्रमुख कार्यकर्त्यांच्या, तरुणांच्या मनात येऊ लागला. एका बाजूला 'करेंगे या मरेंगे' ही घोषणा,

'चले जाव'ची घोषणा आणि दुसऱ्या बाजूला हा अनुभव. यातून पुढे जाणारा मार्ग काढण्यासाठीच सशस्त्र भूमिगत चळवळ सुरू करण्याचा निर्णय जागोजागच्या कार्यकर्त्यांच्या गटांनी घेतला. शिराळा पेट्यात ८६ पोलीस पाटलांनी सप्टेंबर १९४२ मध्ये आपल्या वतनी कामाचे राजीनामे दिले आणि इंग्रज सरकारला मानत नसल्याचे स्वतःच्या कृतीतूनच दाखवून दिले. देशातली ही अभूतपूर्व घटना होती. यातून शिराळापेट्यातली गावेच्या गावे स्वातंत्र्याच्या चळवळीमागे उभी राहिली.

१९४२च्या अखेरीस खटल्यातून शिक्षा झालेले आणि स्थानबद्ध असे सातारा जिल्ह्यातले २००० लोक बंदीवासात होते. नोव्हेंबर १९४२ मध्ये किसन वीर आणि पांडू मास्तर येरवडा जेल फोडून पळून आले. त्यांना पकडण्यासाठी धरपकडी आणि झडत्या सुरू झाल्या. याच काळात क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली काम करणाऱ्या संचाने कुंडल येथील बँक लुटली. नागराळेहून किर्लोस्करवाडीस जाणाऱ्या लष्करी पोलिसांच्या बंदुका लांबवल्या. अमणापूरमध्ये पोलिसांनी लोकांना मारहाण करून आणि बंदुकीच्या फैरी झाडूनही भूमिगतांचा ठावठिकाणा लोकांनी सांगितला नाही. २९ जानेवारी १९४३ रोजी चरण येथे (तालुका शिराळा) वसूल संरक्षणासाठी आलेल्या पोलीस पार्टीला भूमिगतांनी बंदुका आणि पोशाखही काढून घेऊन नागवे केले. यामुळे पेटलोंडपर्यंत लष्करी दहशत बसवली गेली. बिळाशीला ४,५००, चरणला २,०००, आरळ्याला १,५०० रुपये दंडवसुली केली. तरीही चळवळे गप्प बसले नाहीत. त्यांनी अनेक बंदुका आणि रायफली हस्तगत करण्याची मोहीम चालूच ठेवली.

२७ नोव्हेंबर रोजी येळगाव ता. कराड येथे सरकारी गुदामातील ३५ धान्य पोती बंदुकीच्या जोरावर लुटून उपाशी गोरगरिबांना वाटण्यात आली. टंचाईच्या परिस्थितीत ही घटना घडल्यामुळे जनतेचा जोरदार पाठिंबा भूमिगतांना मिळू लागला. त्या काळात फरारी दरोडेखोरांचा सुळसुळाट विशेषतः सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागात होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भूमिगतांनी जीवावर उदार होऊन पुढाकार घेतला. या दरोडेखोरांना ब्रिटिश सरकार पाठिंबा देत होते. क्रांतिकारकांच्या विरुद्ध त्यांचा वापर करीत होते. हे दरोडेखोर जनतेला फारच त्रास देत असत. स्त्रियांवर अन्याय करीत असत. मेंढरे घेऊन फिरस्ती करणाऱ्या धनगर समाजातील लोकांना छळत असत. चळवळ चालवण्यासाठी, हत्यारे जमवण्यासाठी पैशांची गरज होतीच. हे पैसे सरकारी खजिन्यावर धाड टाकून जमवावेत असे विशेषतः क्रांतिसिंहांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली काम

करणाऱ्या संचाने ठरवले होते. ७ जून १९४३ रोजी रेल्वे कामगारांचा पगार घेऊन जाणारी पे स्पेशल ट्रेन सुमारे १४ लोकांच्या संचाने लुटली. क्रांतिवीर नागनाथ नायकवाडी, जी. डी (बापू) लाड अशी प्रमुख मंडळी यात होती. यातले पैसे गोव्याहून जास्त प्रमाणात हत्यारे विकत आणण्यासाठी वापरले गेले.

या सर्व घडामोडी प्रत्येक विभागात चालू होत्या. तो तो संच संघटित होता. पण सर्व संचांची एकत्र साखळी तयार झाली नव्हती. आखणी करून समान कार्यक्रम ठरला नव्हता. त्यामुळे सुमारे ७५ प्रमुख भूमिगत कार्यकर्ते ३ जून १९४३ रोजी कामेरी तालुका वाळवे येथे जमले. या बैठकीला आलेल्या शांताराम इनामदार यांनी यशवंतराव चव्हाणांचा निरोप आणला होता. फलटणमधून लिहिलेल्या यशवंतरावांच्या चिठीत लिहिले होते, 'संपूर्ण भारतातील चळवळ ओसरली आहे. अशा अवस्थेत आपल्या जिल्ह्यातील चळवळ पुढे चालू ठेवून फारसा उपयोग होणार नाही. याच्या परिणामी मात्र जिल्ह्यातील सर्व जनतेस पोलीस व मिलिटरीकडून होणाऱ्या अत्याचार व दडपशाहीस तोंड द्यावे लागेल. म्हणून ही चळवळ स्थगित करण्यात यावी. माझ्यापुरता मी हा निर्णय घेत आहे.'

पण जमलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी आपण 'करू किंवा मरू' या निर्णयाने चळवळीत आलो आहोत त्यामुळे आपण शेवटपर्यंत लढायचे असा निर्णय घेतला. साथी अच्युतराव पटवर्धनांचेसुद्धा हेच मत आहे, असेही शांताराम इनामदार यांनी यशवंतरावांचा निरोप म्हणून सांगितले. महाराष्ट्रातील एकंदर भूमिगत हालचालींची सुसूत्रता अच्युतराव करीत होते. त्यांनी असे मत व्यक्त केले असेल हे बहुसंख्य कार्यत्यांना पटलेच नाही. म्हणून बर्डे गुरुजी आणि जोशी काका यांनी अच्युतरावांना समक्ष भेटून त्यांचे पत्र आणण्याचा निर्णय बैठकीत झाला. पुन्हा भूमिगतांची व्यापक बैठक घ्यायचे ठरले.

या काळात चळवळ थांबवणे अत्यंत धोक्याचे होते कारण चळवळीच्या परिणामी आणि चळवळ पूर्ण दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने दडपशाही आणि धरपकडीची जोरदार मोहीम राबवली होती. प्रमुख कार्यकर्त्यांनी यशवंतराव चव्हाणांप्रमाणेच हजर होऊन तुरुंगात जाण्याचा निर्णय घेतला असता तर सरकारने जनतेला दडपशाहीच्या वरवंट्याखाली दडपून पूर्ण लाचार बनवण्याचा सपाटा चालवला असता. या काळात खटाव तालुक्यातील ४ गावे, तासगाव तालुक्यातील ५ गावे, कराड तालुक्यातील ६ गावे, पाटण तालुक्यातील ३

गावे, वाळवे तालुक्यातील ९ गावे आणि शिराळा पेट्यातील ५ गावे अशा एकूण ३२ गावांवर सामुदायिक दंडाची आकारणी करून त्याची वसुलीही केली होती.

अशा वेळी क्रांतिसिंह नाना पाटलांची भूमिका अत्यंत ठाम होती. ते १९४२ पूर्वीही अनेक वेळा भूमिगत राहून काम करीत होते. आता तर सशस्त्र प्रतिसरकार उभे राहिले होते. तरूणांची निधड्या छातीची फळी तयार झाली होती. क्रांतिसिंहांना हेच पाहिजे होते. कामेरीच्या बैठकीत 'हजर होण्याचा' सूर निघाल्यावर तरुण भूमिगतांना भयंकर राग आला. त्यांनी स्वातंत्र्य मिळेपर्यंत आता माघार नाही अशी ठाम भूमिका घेतली. पण क्रांतिसिंहांना विचारले, "अण्णा, आपण हजर होणार आहात का?" या प्रश्नाला अण्णांनी अगदी सडेतोड आणि स्पष्ट उत्तर दिले, "माझ्या तरुण मित्रांनो! मला मरण आले तरी पर्वा नाही. मी हजर होणार नाही. मी तुम्हा तरुणांबरोबरच राहणार." या उत्तरामुळे तरुण नेत्यांना जोम आला. जी. डी. लाड, नागनाथ नायकवडी, शेख काका, बाबूजी पाटणकर, दत्तू लोहार, अहमद भाई, बुवा म्हावशीकर, विष्णुभाऊ डोईफोडे, डी. जी. देशपांडे अशी तरुणांची पिढी पुढे आली होती. या पिढीला नाना पाटलांच्या, १९३० ते ४२ या काळातल्या, जनतेत खोलवर मुळे असलेल्या क्रांतिकारी 'पुण्याई'चा आधार मिळाला.

कामेरीच्या बैठकीत 'हजर होण्याचा' प्रस्ताव येण्याआधीच क्रांतिसिंह भूमिगत अवस्थेत राहण्याच्या यातना किती भयानक टोकाला जाऊ शकतात हे अनुभवणाऱ्या प्रसंगातून गेले होते. पण त्याही पार्श्वभूमीवर अण्णांनी आपला निश्चय ढळू दिला नाही. डिसेंबर १९४२ मधला हा प्रसंग सांगितलाच पाहिजे असा आहे.

डिसेंबर १९४२ च्या दुसऱ्या आठवड्यात संपूर्ण कुंडल गावाला १,००० ते १,२०० पोलिसांनी गराडा घातला. त्या वेळी अण्णा कुंडल गावात अप्पा मास्तर (लाड) यांच्या घरी होते. रानात काम करणाऱ्या एका शेतकऱ्याने पळत येऊन ही बातमी दिली. अशा वेळी ज्यांच्या घरांची तपासणी होणारच अशा कार्यकर्त्यांच्या घरातून त्यांना हालवणे भागच होते. त्यांना सावळाराम धनगर यांच्या छोट्याशा घरात हलवण्यात आले. छताचा पत्रा डोक्याला लागणारे, पडझड झालेले आणि माणसांची वस्ती नसलेले हे घर होते. पोलिसांनी गावभर दंगा केला. प्रमुख कार्यकर्त्यांची घरे आधी तपासली. तेही दुसऱ्या एका पडक्या वाड्यात लपून बसले होते. कुणीच सापडत नाही म्हणताना पोलिसांनी सर्व

पुरुष चावडीवर बोलावून त्यांची उलटतपासणी सुरू केली.

हे सर्व चालू असताना अण्णांना ठेवलेल्या घराचा पत्रा दुपारच्या उन्हाने तापू लागला. तसे सर्व घरच तापू लागले. या उकाड्यामुळे एका बिळात बसलेला भला मोठा नाग बाहेर आला आणि अण्णांच्याकडे तोंड करून फणा काढून उभा राहिला! घराला बाहेरून कुलूप लावले होते. घरात कुणी नाही हे दाखवण्यासाठी ही युक्ती लढवली होती. ओरडण्याची सोयच नव्हती कारण बाहेर पोलिसांची पावले वाजतच होती. तो नागही हलला नाही आणि अण्णाही जागचे हलले नाहीत. एक-दीड तासाने नागच कंटाळला आणि पुन्हा बिळात निघून गेला. दोन-अडीच वाजता पोलीस जाईपर्यंत अण्णांना कुणी भाकरी दिली नाही की कसली बातमी सांगितली नाही. अण्णांच्या जीवनात असे अनेक प्रकारचे दुर्धर प्रसंग पुढेही यायचे होते.

## ३ ऑगष्ट १९४३ : क्रांतिसिंह प्रतिसरकारचे डिक्टेटर

बर्डे गुरुजी आणि जोशी काका यांनी मुंबईला अच्युतरावांची गाठ घेतली. त्यांनी पत्र दिले की चळवळीस जनतेचा पाठिंबा मिळत असेल तर सातारा जिल्ह्यातला लढा पुढे चालू ठेवण्यास हरकत नाही. या पत्राच्या पार्श्वभूमीवर ३ ऑगस्ट १९४३ रोजी पणुंब्रे (शिराळा) येथे सुमारे शंभरावर प्रमुख भूमिगतांची बैठक झाली. जमलेल्या सर्वांनीच सांगितले की जरी दडपशाही वाढलेली असली तरी लोकांकडून मिळणारी सहानुभूती, सहकार्य आणि सहभाग या सर्व गोष्टी वाढतच चालल्या आहेत. सामुदायिक दंड वसूल केले, धरपकड केली, भूमिगतांना शोधण्यासाठी मारहाण केली तरी ते सर्व सहन करून जनता जास्तच ताकदीने उभी राहात होती. सर्वांना तसाच अनुभव जिल्हाभर येत होता. याच बैठकीत क्रांतिसिंह नाना पाटील यांना साताऱ्याच्या प्रतिसरकारचे डिक्टेटर नेमण्यात आले. जिल्ह्याचे १८ विभाग करण्यात आले. प्रत्येक विभागाकरता एक गटप्रमुख व एक उपप्रमुख निवडण्यात आला. तसेच या दोन प्रमुखांच्या संमतीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गटातील लोकांनी त्यांच्या विभागात घातपाती कार्य करू नये असा दंडक घालून देण्यात आला. दर दोन महिन्यांनी या गटप्रमुखांची बैठक होईल. त्या वेळी मागील कामाचा अहवाल देऊन पुढच्या दोन महिन्यांतील कामाची आखणी करण्यात येईल असेही ठरवण्यात आले. डी. जी. देशपांडे यांनी मुंबईहून सायक्लोस्टाईल मशीन आणले होते, त्याच्यावर 'स्वतंत्र भारत' नावाचे पत्रक काढण्याचे ठरले. ही बैठक जमवण्यासाठी सर्व जिल्ह्यात फिरून संपर्क साधण्याची जबाबदारी डी.

जी. देशपांडे आणि धन्वंतरी कासेगावकर वैद्य यांनी पार पाडली होती. पुढे सुसूत्रता ठेवण्यासाठी सर्व विभागांशी डी. जी. देशपांडे हे संबंध ठेवीत असत. हे मोठे जोखमीचे आणि कुशलतेचे काम होते.

यावेळी ठरवलेले गट आणि गटप्रमुख, उपप्रमुख पुढीलप्रमाणे होते :

## डिक्टेटर : क्रांतिसिंह नाना पाटील.

| क्रमांक | गटाचे नाव | गटप्रमुख | उपप्रमुख |
|---|---|---|---|
| १. | वाटेगाव, ता. वाळवे | बर्डे गुरुजी | अंतू काका बर्डे |
| २. | कासेगाव, ता. वाळवे | बाबूजी पाटणकर | शेख काका |
| ३. | कराड-इंदोली, ता. कराड | कासेगावकर वैद्य | महादेव जाधव |
| ४. | किवळ, ता. कराड | भिकोबा साळुंखे | दत्तोबा काटकर |
| ५. | म्हावशी, ता. पाटण | बुवा म्हावशीकर | म्होप्रेकर पाटील |
| ६. | बिळाशी, ता. शिराळा | गणपतराव पाटील | बाबुराव चरणकर |
| ७. | चरण, ता. शिराळा | जोशी काका | दत्तोबा लोहार |
| ८. | वाळवे, ता. वाळवे | नागनाथ नायकवडी | किसन अहीर |
| ९. | कुंडल, ता. तासगाव | जी. डी. लाड | ईश्वरा लाड |
| १०. | हणमंतवडिये, ता. खानापूर | भगवानराव पाटील | महादेव अप्पा मिरगे |
| ११. | कुमठे, ता. कोरेगाव | पांडुतात्या बोराटे | बाबू जंगम |
| १२. | रहिमतपूर, ता. कोरेगाव | सोपान घोरपडे | विठ्ठल भोसले |
| १३. | बूध-पाचेगाव, ता. खटाव | बाबुराव कचरे | लाला इंगळे |
| १४. | लिंब-गोवे, ता. सातारा | बाबुराव जगताप | विष्णू सोनमळे |
| १५. | कवठे, ता. वाई | किसन वीर | आबा ढेरे |
| १६. | खेड बुलढाणा, ता. खंडाळा | विष्णुभाऊ डोईफोडे | दादा पाटील |
| १७. | वाई, ता. वाई | द्वारकानाथ जोशी | अण्णा पंत |
| १८. | नांदगाव-तारगाव ता. सातारा | बाबुराव घोरपडे (मास्तर) | रामराव पाटील. |

सर्व जिल्ह्याचे संघटन संपूर्ण झाले आहे याची प्रचिती ब्रिटिश सरकारला यावी आणि त्याला धसका बसावा म्हणून २० ऑगस्ट १९४३ रोजी वारणा नदीच्या उत्तर काठापासून ते नीरा नदीच्या दक्षिण काठापर्यंत सर्व भागातील टेलिफोनच्या तारा एकदमच तोडण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. या

कार्यक्रमात खेड्याखेड्यांतल्या तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. हे तरुण काही भूमिगत संचाचे भाग नव्हते. ते पुन्हा खेड्यातल्या जीवनात उघडपणे राहायचे. २० ऑगस्टच्या रात्री ४० ठिकाणी टेलिफोनच्या सुमारे २,००० तारा तोडून आणि खांब पाडून याची अंमलबजावणी करण्यात आली. अशा प्रकारे काम सुरू झाल्यावर ऑक्टोबर १९४३ मध्ये केंद्रीय निरीक्षक म्हणून भाऊसाहेब नेवाळकर काम पाहण्यासाठी आले. अच्युतराव पटवर्धन यांच्या आदेशाप्रमाणे ते आले होते. धन्वंतरी यांनी त्यांना सुपने, तांबवे या कराड तालुक्यातील गावांपासून डोंगरदऱ्यांच्या मार्गे प्रामुख्याने शिराळा पेट्यातली स्थिती दाखवली. एकूण चढउतार, पल्ला त्यांना सहन झाला नाही. त्यांचे पाय सुजले. एकूण सर्व कार्यकर्ता-समूह त्यांनी हत्यारानिशी पहिला. जनतेचा पाठिंबा अनुभवला.

१९४३च्या जानेवारी पासून १९४४ च्या सप्टेंबरपर्यंतच्या काळात वारणा नदीच्या खोऱ्यातील सुमारे ६० गावांमध्ये सरकारी सत्ता नाममात्रच होती. आधीच ८६ पोलीस पाटलांनी राजीनामे देऊन देशातील एकमेव अभूतपूर्व घटना घडवून दाखवली होतीच. या पार्श्वभूमीवर नेवाळकरांच्या पाहणीनंतर जोशी काका, धन्वंतरी आणि क्रांतिसिंहांचे प्रतिनिधी म्हणून नाथाजी लाड या तिघांनी मुंबईला जाऊन अच्युतराव पटवर्धनांची भेट घेतली आणि प्रांतिकशी नेहमी संबंध यावा या हेतूने मुंबई येथे जिल्हा संघटनेचे ऑफिस सुरू केले. जोशी काका या ऑफिसचे प्रमुख म्हणून काम करू लागले.

३ ऑगस्ट १९४३ रोजी पणुंब्रे येथे जी बैठक झाली त्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुसंघटित प्रतिसरकार सुरू झाले. त्या आधीपासून कार्य चालूच होते. पण ते एका धोरणाने आणि सूत्रबद्ध पद्धतीने चालू झाले. प्रतिसरकारने ठरवलेल्या या धोरणात गुंड-दरोडेखोरांचा बंदोबस्त करणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. स्वातंत्र्याच्या सरकारमध्ये अशा गोष्टींचा पूर्ण बंदोबस्त होणार आहे. त्यामुळे लवकरात लवकर ब्रिटिश सत्ता घालवली पाहिजे. अशी जनतेची भावना झाली तर ती स्वातंत्र्यलढ्यात जास्त जोमाने भाग घेणार हे स्पष्ट होते. प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांचा नि:पात करण्यासाठी ब्रिटिश सरकार या दरोडेखोर गुंडांच्या टोळ्यांना वापरीत होते. हेसुद्धा दरोडेखोरांचा बिमोड करण्याचे एक महत्त्वाचे कारण होते.

२९ ऑगस्ट १९४३ रोजी दरोडेखोरांचा बंदोबस्त करणारी पहिलीच महत्त्वाची घटना घडली. वाटेगावचे दत्तू पाटील यांच्या घरातली बंदूक काढून

नेण्यासाठी महादू रामोशी पेटकर आणि मारुती शेणेकर यांनी त्यांच्या धरावर हल्ला केला. बंदूक हस्तगत करण्यासाठी ते लोक दत्तू पाटलांचे वडील शंकरराव यांना मारायला गेले आणि दत्तू पाटलांची आई आडवी आली. म्हणून त्यांनी तिला भोसकून मारले. ही बातमी लागताच २० ऑगस्टचा कार्यक्रम ठिकठिकाणी करून आलेल्या आणि वाटेगावात असणाऱ्या बाबूजी पाटणकरांना समजली. त्यांनी या दरोडेखोरांवर बाहेरून तुळशी वृंदावनाआडून गोळीबार सुरू केला. या चकमकीत त्यांच्या दंडात छर्रे घुसले पण एक दरोडेखोर ठार झाला. त्यामुळे सर्व दरोडेखोर पळून गेले. या प्रसंगी पार्श्वनाथ बर्डेसुद्धा पाटणकरांबरोबर गेले होते. या घटनेपासूनच संघर्ष सुरू झाला. बर्डे गुरुजी आणि पाटणकर यांच्यावर दरोडेखोरांचा दात बसला तरी गुन्हेगार, गुंड-दरोडेखोरांच्या नि:पाताची सुरुवात झाली. त्यांचा ऱ्हास सुरू झाला.

यानंतर शेण्याचा मारुती रामोशी यांचा ग्रुप आणि ब्रिटिश पोलीस यांच्याबरोबर कुरुंदवाड संस्थानचे पोलीस आणि वाटेगावच्या ४००-५०० लोकांसह क्रांतिकारक यांचे एक प्रकारे युद्धच झाले. त्यात जखमी झालेला मारुती रामोशी कासेगावच्या रानात एका कडब्याच्या बुडात लपल्याचे समजले. मग क्रांतिकारकांनी बुचाडास आग लावली आणि मारुती रामोशी बाहेर पडल्यावर शेख काकांच्या गोळीने त्याच्या मेंदूचा ठाव घेतला.

क्रांतिसिंहांची एक सभा ४ ऑक्टोबर १९४४ रोजी भूमिगतांसह ठरली होती. त्याची आठवण धन्वंतरी सांगतात, "दिवाळीच्या सणाचे दिवस होते. चळवळ ऐन रंगात आली होती. भूमिगतांची सभा पाचुंब्री (ता. शिराळा) येथे ठरली. होती. नाना पाटील विश्वास टाकून सहसा कुणाबरोबर बाहेर पडत नसत. पण या सभेला ते जाणार होते. मी व नाथाजी लाड त्यांना बरोबर घेऊन निघालो. वाटेत येवलेवाडीच्या रानात आमचा मुक्काम पडला. नाना पाटील आपल्या गावच्या मुक्कामाला आले आहेत हे कार्यकर्त्यांकडून लोकांना कळताच आपल्या घरी केलेली गोड धोड फराळाची सामग्री घेऊन ते धावतच मुक्कामाच्या जागी आले! थोड्याच वेळात नाना पाटलांसमोर कानोले, कुडबुळी, लाडू इत्यादी फराळांचा ढीग जमा झाला. जनतेचे आपल्यावरील अलोट प्रेम पाहून नाना पाटलांचे हृदय भरून आले. निरोप घेताना प्रत्येकाच्या डोळ्यांत पाणी भरे! आपल्या लाडक्या नेत्यास डोळाभर पाहून जड पावलाने ते परत जात.

"पुढे आम्ही पाचुंब्रीस गेलो. भूमिगत नेत्यांच्या या सभेला १० हजार लोक आले होते! सभास्थानाच्या आसमंतात इस्लामपूर, नांदगाव, कराड इत्यादी

अनेक ठिकाणी पोलीस ठाणी होती. पण एकाही ठाण्यास सभेचा पत्ता लागला नाही. नाना पाटलांचे तासभर भाषण होऊन सभा संपली. आम्ही सर्वजण नियोजित स्थळी निघून गेलो. नंतर पोलीसपार्ट्या आल्या. पण त्यांच्या हाती काहीच लागले नाही! नाना पाटलांच्या सभेची इतकी गुप्तता कार्यकर्ते व जनताही पाळत असे.''

यापेक्षाही जास्त चित्तथरारक आठवण धन्वंतरीनी सांगितली आहे, ''नाना पाटलांना आपली जन्मभूमी येडे मच्छिंद्र येथे जाण्याची इच्छा झाली. जर चुकून कोणी नीचपणा केला तर जवळच इस्लामपूरचे पोलीस ठाणे. मिलिटरीचा कॅम्प. त्याचबरोबर पोलिसांचे एवढे जाळे पडलेले असतानाही नाना पाटील आपल्या जन्मगावी सभा घेतात ही गोष्ट आव्हानात्मक ठरणार होती. सर्वांनीच ही कल्पना उचलून धरली. बाबूजी पाटणकर, शेख काका, श्रीपती बुवा, अहमदभाई, नाथाजी लाड, जी. डी. बापू, नागनाथ नायकवडी, किसन मास्तर गोंदीकर व मी असे आम्ही सर्वजण कामाला लागलो. आमच्यापैकी काहीजणांनी येडे मच्छिंद्रला जाऊन तेथील लोकांच्या भेटी घेतल्या व विश्वासाचे वातावरण निर्माण केले. लोकांनी विश्वासाने येण्याचे निमंत्रण दिले. आम्ही सुमारे ५० कार्यकर्ते नाना पाटलांसमवेत येडे मच्छिंद्रला गेलो. आमच्याजवळ १५-२० बंदुका होत्या. रात्र पडल्यावर रात्री ९ वाजता गावाच्या मध्य चौकात नाना पाटलांची जाहीर सभा झाली. सर्व गाव पोराबाळांसह सभेस हजर होता. गावात येणारे सर्व रस्ते रोखले गेले होते. तसेच सभेभोवती हत्यारी कार्यकर्त्यांचे कडे होते!

''त्या दिवशीची सभा अविस्मरणीय अशी झाली. नाना पाटलांचे भाषण हृदय हेलावणारे झाले. आपल्या जन्मगावी आल्याचे समाधान त्यांनी आपल्या भाषणात बोलून दाखवले, 'मी माझ्या गावास येऊ शकत नाही ही आजपर्यंत माझ्या मनात खंत होती. ती आता दूर झाली. आज मी पूर्ण समाधानी आहे. माझ्या बंधू भगिनींना भेटण्याचा मला अपूर्व आनंद होत आहे.' नानांच्या या उद्‌गारांनी जमलेल्या स्त्री-पुरुषांच्या डोळ्यांतही आनंदाश्रू उभे राहिले.''

सरकारने क्रांतिसिंहांच्या कामाची आणि सरकारला त्यांच्यापासून असलेल्या धोक्याची चांगलीच नोंद घेतली होती. गव्हर्नरच्या अहवालात केलेल्या नोंदीवरून या गोष्टीची चांगली कल्पना येऊ शकते. अहवालातील उताऱ्यांचे मराठी भाषांतर असे :

''नाना पाटील नावाचा एक सुप्रसिद्ध कॉंग्रेसवाला सातारा जिल्ह्यात आहे. चळवळीच्या सुरुवातीच्या काळामध्ये त्यानेच तालुक्याच्या खजिन्यावर आणि

पोलीस ठाण्यांवर हल्ले संघटित केले. जिल्ह्यात झालेल्या अनेक दरोड्यांपैकी काही दरोडे त्याच्याच टोळ्यांनी घातले आहेत असे दिसते. त्याला शोधण्यासाठी किंवा त्याच्या गुन्ह्यांचा शोध घेण्यासाठी चाललेल्या पोलिसांच्या प्रयत्नांना जनतेकडून अत्यंत अल्प मदत होते. ४ जानेवारी रोजी बहुतेक नाना पाटलाशी संबंधित अनेक सशस्त्र दरोडेखोर एका खेड्यात आले. खेडुतांनी त्यांना धरून ठेवले, शेजारच्या खेड्यांची मदत घेतली आणि शेजारच्या डोंगरात त्यांना घालवून देण्यात ते यशस्वी झाले...

"अलीकडच्या काही आठवड्यात घडलेल्या काही घटनांवरून हे स्पष्ट आहे की सातारा जिल्हा गंभीर उलथापालथीचे केंद्र राहिलेच आहे. अजून काही टोळ्या मोकाट फिरत आहेत. त्यांना ऑगस्ट १९४२ पासून भूमिगत असलेल्या नाना पाटील नावाच्या काँग्रेसवाल्याकडून राजकीय स्फूर्ती मिळाली आहे. त्याला पकडण्यासाठी आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यासाठी माहिती मिळण्याकरता मोठी बक्षिसे देऊ केली आहेत आणि सी. आय. डी. विभाग जिल्ह्यात पूर्ण ताकदीने काम करीत आहे."

जानेवारी आणि पुन्हा नोव्हेंबर १९४३च्या अहवालात खुद्द गव्हर्नरने लिहिलेल्या गोपनीय अहवालात जे लिहिले आहे त्यातून ब्रिटिश सरकारचा कमकुवतपणा आणि प्रतिसरकारचा त्यांनी घेतलेला धसका स्पष्ट दिसतो. प्रतिसरकारची सर्वांगीण ताकद सिद्ध होते.

चळवळीच्या या काळात जनतेवर दडपशाही करण्याचा कार्यक्रमच ब्रिटिश सरकारने घेतला होता. टेलिफोनच्या तारा तोडण्याचा कार्यक्रम. डाक बंगले जाळण्याचा कार्यक्रम. असे कार्यक्रम एकाच रात्री सगळ्या जिल्ह्यात कसे होतात असा प्रश्न सरकारला पडला होता. सर्व कार्यक्रमांमागे नाना पाटील आहेत असाच शोध सरकारला लागत होता. कारण निरेपासून वारणेपर्यंत कुठेही चौकशी केली तरी माणसे असेच सांगत की ही घटना नाना पाटलांनी घडवली. त्यामुळे ब्रिटिश सरकार चक्रावून गेले. हा माणूस आहे तरी कसला? हा एवढ्या प्रदेशात, वेगाने फिरतो तरी कसा? असे कोडे त्यांना पडले होते.

"पोलिसांच्या हाती सापडलेल्या भूमिगताचे सपाटून मार खाल्यावर 'हे पत्र अथवा हे रिव्हॉल्वर तुला कोणी दिले' या प्रश्नावर 'मला नाना पाटलांनी गावाच्या बाहेर झाडाखाली दिले' हेच उत्तर असायचे! त्यामुळे नाना पाटील म्हणजे फार भयंकर प्रकरण आहे असे सरकारला वाटू लागले. सरकारच्या पोलीस खात्याने त्यांना पकडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण लोकांच्या

पाठिंब्यामुळे नाना पाटील स्वातंत्र्य मिळेपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत.'' अशी माहिती डी. जी. देशपांडे देतात. याच भीतीमुळे सरकारने सातारा जिल्ह्यात मिलिटरी आणली. कुठले तरी 'बंड' मोडल्यामुळे प्रसिद्धीस आलेला गिल्बर्ट नावाचा डी. एस. पी. आणला. जवळ जवळ दर पाच मैलाला ठाणे टाकल्यासारखे केले. काही ठिकाणी पोलिस ठाणी तर काही ठिकाणी मिलटरीची ठाणी. थोडक्यात, सर्व जिल्ह्यालाच पोलीस-मिलिटरी कँम्पचे स्वरूप आले. त्याचबरोबर काँग्रेस फराऱ्यांना पकडून द्या नाहीतर सामुदायिक दंड घेतला जाईल असे जाहीर करण्यात आले.

एक तार तुटली तर ६,००० रुपये. पोस्ट लुटले गेले तर १०,००० रुपये असे दंड ज्या ज्या गावांमध्ये घटना घडतील त्या त्या गावांवर बसवण्यात आले. ३० ते ४० हजारांपर्यंत दंड केले गेले. सुपन्या-तांबव्यावर ४०,००० कार्व्यावर ३०,००० सामुदायिक दंड बसला. दंड वसूल करण्याची पद्धतसुद्धा अघोरी होती. लोकांना काही कळू द्यायचे नाही. २००० च्या दरम्यान पोलीस घेऊन गावाला वेढायचे. पहाटे पाचला सर्व घरांपुढे उभे करायचे. लोक उठून दार उघडतात तर समोर पोलीस दिसायचे. दंड भरायला पैसे नाहीत म्हटले तर बदडत असत. मग बायकांचे दागिने, शेरडे-कोकरे विकून पैसे भरावे लागायचे. पण सातारा जिल्ह्यातील बत्तीसच्यावर गावांच्या लोकांनी असा त्रास होऊनसुद्धा काँग्रेसी भूमिगतांचे ठाव-ठिकाणे सांगितले नाहीत. शिराळा पेट्यात तर एकही स्थानिक खबऱ्या तयार होऊन भूमिगतांना दगा देण्याची घटना घडली नाही असे संबंधित क्रांतिकारक सांगतात. क्रांतिसिंह नाना पाटलांनी १९३० ते ४२ या काळात जी मशागत केली आणि अस्सल विचारांच्या बेण्याची पेरणी केली त्याचेच पीक १९४२ साली हाती आले.

दुसऱ्या बाजूला दरोडेखोरांच्या विरुद्ध प्रतिसरकारचा जो संघर्ष चालू होता त्यातून दरोडेखोरांचा निःपात होत चालला. प्रतिसरकारचे लोक दरोडेखोर आणि गुंड आहेत असे दाखवून लोकांना क्रांतिकारकांविरुद्ध उभे करण्याचा डाव ब्रिटिश सरकार खेळत होते. पण या 'खेळात' सरकारचा सपशेल पराभव झाला. उलट प्रतिसरकारला असलेला लोकांचा पाठिंबा पूर्वीपेक्षाही जास्त वाढला. लोक उघडच पाठिंबा देऊ लागले. दरोडेखोरांना हाताशी धरून, त्यांना पोसून ब्रिटिश सरकार जी कुटिल कारस्थाने करीत होते त्या कारस्थानांमुळे जनमत सरकारच्या विरुद्ध गेले. याची जाणीव होऊन काही काळाने स्पेशल डी. एस. पी. गिल्बर्ट याने आपली भूमिका बदलून दरोडेखोरांवर हत्यार उगारले. एका बाजूला प्रतिसरकारचे क्रांतिकारक गुंड-दरोडेखोरांचा समाचार घेत होतेच. पण आता

ब्रिटिश सरकारनेही पलटी खाऊन त्यांच्यावर रोख धरल्यामुळे त्यांची पंचायत झाली. त्यातले सखाराम बारबट्यासारखे अस्सल आणि अव्वल गुंड-दरोडेखोर काही क्रांतिकारकांशीही संपर्क साधून कातडी वाचवण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांच्या कारवाया थांबल्या नाहीत.

## तथाकथित 'गांधीवाद्यांचे' आक्षेप आणि म. गांधींचे उत्तर

प्रतिसरकारचे काम हे हिंसक आहे. म. गांधींना हिंसा मान्य नाही. त्यामुळे हे प्रतिसरकार काँग्रेसच्या चळवळीचा भाग असू शकत नाही असा प्रचार शहरी काँग्रेसवाल्यांनी सुरू केला होता. त्यापैकी काहीजण आक्षेप घेऊन साताऱ्यालाही आले होते. धन्वंतरी त्या विषयीची आठवण सांगतात. "देवकीनंदन नारायण, डॉ. दातार व आचार्य लिमये मुद्दाम पुण्याहून भेटण्यासाठी सातारला आले. पुढे काय म्हणून विचारू लागले. आम्ही सांगितले आमच्यापुढे तीनच गोष्टी वा पर्याय आहेत. एक, आमच्या वर्किंग कमिटीने बाहेर येऊन लढा थांबवा म्हणणे, अगर स्वातंत्र्य मिळणे, अगर काम करीत करीत मरून जाणे. याशिवाय हे आम्हास बंद करता येणार नाही. हे काँग्रेसच्या मर्यादेत बसत नाही. अच्युतराव मार्गदर्शन करीत आहेत. त्यांचे ते बघून घेतील. आम्हास त्याची काळजी करण्याचे कारण नाही. ते म्हणाले, 'पत्र्या मारता, क्रूरपणे वागून दहशत निर्माण करता.' मी म्हटले, 'ही गोष्ट साफ खोटी आहे. आपण मजबरोबर चला. आपल्यास सर्व दाखवतो. उलट लोक अगदी तळहातावरील फोडाप्रमाणे आम्हाला सांभाळतात. नाहीतर आम्ही अवघे दीडशे लोक काय करणार? १०,००० मिलिटरी आहे. त्यांच्यापुढे आमचे काय चालते? पण लोकांचा आश्रय आहे म्हणूनच आम्ही त्यांना भारी पडलो आहोत. दिवसेंदिवस जनतेचा आमच्यावरील विश्वास वाढतच आहे.' आम्ही एक तास चर्चा करीत होतो. त्यानंतर ते निघून गेले."

या लोकांनी महाराष्ट्रात एक संघ स्थापन केला. प्रतिसरकार विरुद्ध प्रचाराचे व्यासपीठ म्हणून याचा वापर त्यांनी सुरू केला. काँग्रेसच्या नकाशातून सातारा जिल्हा काढून टाकण्याची चर्चा सुरू केली. प्रेमा कंटक यांनीही सातारा जिल्ह्यात येऊन काही समजून न घेता उलटा प्रचार केला. पण त्यांना सत्य खडसावून सांगितल्यावर हा प्रचार बंद पडला.

महात्मा गांधींची सुटका झाली. काँग्रेसवाल्यांमधील काही शहरी पांढरपेशा पुढारी मंडळींचा प्रचार कायमचा थांबवण्यासाठी प्रत्यक्ष गांधींनाच या संबंधात विचारण्याचा निर्णय झाला. मे १९४४ मध्ये म. गांधींची सुटका झाल्यावर

ते एकदा पाचगणीला आले. त्यावेळी क्रांतिसिंह आणि नाथाजी लाड इत्यादी प्रमुख कार्यकर्ते त्यांना भेटण्यासाठी गेले. नाना पाटलांनी म. गांधींना सांगितले, "मी व माझ्या सहकाऱ्यांनी सातारा जिल्ह्यात जे कार्य केले ते तुमच्या सत्य-अहिंसेच्या तत्त्वात कुठे बसते हे मला माहीत नाही. पण आम्ही काम करते वेळी तुमची तत्त्वे शक्य तेवढी अमलात आणण्याचा प्रयत्न केला. आम्ही रेल्वे गाड्या पाडल्या, पण माणसांची एकही गाडी पाडली नाही. पण जो हात खून, बलात्कार, दरोडे घालत होता तो हात आम्ही तोडला; जे पोलीस खबरे होते त्यांना पत्र्याही लावल्या. आम्ही हे जर केले नसते तर आम्हाला काही करता आले नसते. आम्ही चळवळ करू शकलो नसतो. तुम्ही ऑगस्ट १९४२ मध्ये 'करेंगे या मरेंगे' हा जो आदेश आम्हाला दिलात व राष्ट्रीय नेते तुरुंगात गेले तर प्रत्येक भारतीयाने स्वत:स स्वतंत्र समजून त्याच्या बुद्धीला पटेल त्यानुसार इंग्रजांना घालवून देण्याची चळवळ उभारावी हाही जो आदेश दिला त्यानुसार आम्ही आमच्या बुद्धीला पटेल त्याप्रमाणे चळवळ केली. शिवाजीमहाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्राने लढलो."

"यावर गांधीजी उद्‌गारले, "नाना पाटील, तुमची चळवळ माझ्या तत्त्वात बसते न बसते यापेक्षा तुम्ही ४२ ची स्वातंत्र्य चळवळ जिवंत ठेवली, साताऱ्याने या चळवळीचे नाव राखले हे महत्त्वाचे होय. नाना तुम्ही बहादूर आहात. भ्याडाच्या अहिंसेपेक्षा शूराची हिंसा परवडेल असं मानणारा मी आहे." नाथाजी लाड यांनी सांगितलेली ही आठवण प्रतिसरकारच्या आणि म. गांधींच्याही इतिहासातील एक महत्त्वाची घटना आहे.

त्याचबरोबर प्रतिसरकारच्या वतीने यासंबंधी विचारणा करणारे एक पत्रही महात्माजींना पाठवले होते. या पत्रात, "आम्ही काँग्रेसमधे राहू शकत नाही, नियमात बसू शकत नाही. असे काही महाराष्ट्रातले काँग्रेसलवाले म्हणतात. त्यासंबंधी आपले मत काय आहे? व आम्ही हजर व्हावे काय?" असे विचारले होते. त्यावर महात्माजींनी स्वत:च्या हातांनी लिहून उत्तर पाठवले, "तुम्हारा हृदय मंजूर करे तो सवाल है, हाजिर होने का । काँग्रेस नियमन का कोई सवाल नही उठता है इसमे । वर्किंग कमिटी जेल में है । बाहर आ जाय तो निर्णय देगी।" या धन्वंतरींनी सांगितलेल्या आठवणीतली लेखी पत्राची घटना घडल्यावर तर 'त्या' काँग्रेसवाल्यांची अवस्था सणसणीत थोबाडात मारल्यासारखी झाली असणार यात संशय नाही.

खरेच म. गांधींच्या जीवनातलीसुद्धा ही फारच महत्त्वाची घटना आहे.

गांधींच्या अहिंसा तत्त्वाचा खरा अर्थ या घटनेमधून पुढे येतो. जाणीवपूर्वक केलेली हिंसा, हिंसा करूनच चळवळ यशस्वी होईल असे धोरण घेऊन केलेली हिंसा वेगळी आणि स्वातंत्र्याच्या चळवळीचे काम करीत असता येणाऱ्या अडथळ्यांचा, संकटांचा सामना करताना घडलेले काही संरक्षणात्मक हिंसक प्रकार वेगळे. म. गांधी या दोन्हीमध्ये स्पष्ट फरक करीत होते. क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विचारांची नाळ, तथाकथित दिखावटी गांधीवाद्यांपेक्षा, गांधी विचारांशी जास्त जुळलेली होती हेच सत्य या प्रसंगातून सिद्ध होते.

१९४२ सालापासून सुरू झालेल्या प्रतिसरकारच्या सशस्त्र आणि भूमिगत चळवळीच्या काळात ब्रिटिशांचा सर्वात जास्त रोख क्रांतिसिंह अण्णांना पकडण्यावर होता. ते गावा-गावांतील जनतेला जिल्हाभर सर्वात जास्त माहितीचे होते. त्यामुळे त्यांना पकडण्यासाठी त्यांचा माग काढणेही सोपे होते. ब्रिटिश पार्लमेंटमध्येही या प्रतिसरकारची आणि नाना पाटलांची चर्चा झाली होती. त्यामुळे पकडण्याच्या यादीत अर्थातच क्रांतिसिंहांचा नंबर पहिला होता. अण्णांना त्यामुळे सततच कोणत्यातरी ठिकाणी लपून रहावे लागे. ही गोष्ट फिरत्या भूमिगतांपेक्षा कठीण होती. यातना देणारी होती. पण अण्णांनी या सर्व परिस्थितीला अत्यंत धाडसाने आणि धीराने तोंड दिले.

## पोलिसांच्या हाती न लागणारे क्रांतिसिंह

या संदर्भातल्या काही चित्तथरारक आठवणी मुद्दाम नोंदवण्यासारख्या आहेत.

"कुंडल गाव सी.आय.डी.चे जाळे बनले होते. रात्री-अपरात्री १०-२० लोक सारखे फिरत असायचेच. कऱ्हाड पोलीस ठाण्याला अण्णांची बातमी मिळाली. अधिकाऱ्यांत चर्चा सुरू झाली. १९४३ सालच्या जानेवारी महिन्याची सात तारीख असावी. पहाटे कुंडलवर मोठा छापा घालण्याची तयारी सुरू झाली. कैदेत ठेवलेल्या एका इसमाला तिचा सुगावा लागला आणि त्याने लाख भानगडी करून आमच्या बाजूच्या बहिर्जी पथकाचे काम करणाऱ्या माणसाला ६ तारखेच्या संध्याकाळी ५ ला बातमी दिली, की कुंडलला एका वडाराच्या घरी पाटील राहतात हे पोलिसांना समजले आहे. त्यांचा पहाटे ४ ला छापा येईल. त्या इसमाने २५ मैलांचे अंतर सायकलवरून दोन तासात तोडून ही बातमी नाथाजी लाड यांना दिली. सर्व आश्चर्यचकित झाले आणि अण्णांना तात्काळ येथून १० मैल अंतरावरील चिखलगोठण गावी पोहोचते करण्याची कामगिरी अप्पा मास्तरांच्यावर आली. रात्री १० वाजता जेवण करून

अण्णा निघाले. चिखलगोठणातील काँग्रसचे निष्ठावंत कार्यकर्ते गंगाधरराव चिटणीस यांच्या घरी अण्णांबरोबरच्या मंडळींसह पहाटे ४ला पोहोचले. तेथेच झोपले नि दुसरे दिवशी एका आडवळणी घरात मुक्काम केला. संध्याकाळी कुंडलला छापा पडल्याची बातमी आलीच. बरोबर त्याच वडाराच्या घरावर पोलिसांनी छापा घातला होता!''

प्रतिसरकारची संघटना जर एवढी कार्यक्षम आणि नेमकेपणाने काम करणारी नसती, नाना पाटलांवर प्रेम करणारे लोक ठायी ठायी तयार नसते तर असे छापे चुकवणे शक्यच नव्हते.

चिखलगोठणमधे ज्या घरात अण्णांना राहावे लागले ते एका गुरव कार्यकर्त्याचे घर होते. तो अत्यंत गरीब. त्यामानाने घरही लहान आणि पडझड झालेले. घरात बायका-पोरे कुणी नव्हती. दुपारी १२ वाजतासुद्धा रात्री १२ वाजता असतो तसा घनघोर अंधार असणारे हे घर होते. गुरव सच्चा सैनिक. घर सुरक्षित. म्हणून याच घरात राहायचे पक्के ठरले. दीड महिना रात्रंदिवस या अंधारकोठडीत रहावे लागले. दीड महिन्यानंतर अप्पासाहेब लाड अण्णांना तिथून हलवून दुसरीकडे नेण्यासाठी गेले. ओलाव्यामुळे त्या ठिकाणी अत्यंत कुबट असा घाण वास येत होता. पिसवांचे साम्राज्य होते. अप्पा लाडांना तिथे झोपच येईना! तेव्हा त्यांनी अण्णांना विचारले, ''अण्णा, तुम्ही राहता तरी कसे असल्या झोपड्यात?'' अण्णांनी उत्तर दिले, ''ही माझी तपश्चर्या आहे! कुठे बस म्हणाल तिथे बसणे हीच आजची माझी कामगिरी आहे!''

प्रतिसरकारच्या या आधारस्तंभाला अशा भयानक जीवनाचा सामना करावा लागत होता. असा सामना केला नसता तर प्रतिसरकारचा नैतिक आधार आणि जनमानसात क्रांतिकारकांना पाया करून देणारा इतिहासाचा स्रोत संपला असता. प्रतिसरकारला हादरा बसून ते खिळखिळे होऊ शकले असते.

आटपाडी तालुक्यात धुळे खजिना लुटीनंतर ब्रिटिश पोलिसांची कडक टेहेळणी सुरू झाली. औंध संस्थानच्या पाठिंब्यामुळे आटपाडी गाव हे सर्वात सुरक्षित ठिकाण होते. पण तेही आता धोकादायक बनले. क्रांतिसिंहांचे शिष्य नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड वगैरेंनी १४ एप्रिल १९४४ रोजी साडेपाच लाखांचा धुळे खजिना लुटला. या खजिना लुटीचा प्राथमिक बेत आणि आराखडा आटपाडी येथेच ठरवला गेला होता. तिथल्या खादी-ग्रामोद्योग केंद्रात काम करणारे धुडकू तानाजी ठाकरे हे सुरुवातीचे संपर्क व्यक्ती होते. या आखणीत, स्वत: शस्त्र हाती घेऊन आणि घोड्यावर आरूढ होऊन प्रत्यक्ष

भूमिगत चळवळीत सहभागी झालेल्या राजमतीताई पाटील सुद्धा होत्या. ५।। लाखांचा खजिना लुटून पसार झालेले कार्यकर्ते पोलिसांच्या हाती लागत नव्हते. त्यामुळे नाना पाटलांचा शोध घेण्याचे काम पोलीस जास्त तीव्रतेने करू लागले. त्यामुळे तेवढ्या काळात आटपाडीत राहणे असुरक्षित बनले. तिथून दुसरीकडे मुक्काम हलवण्याची आठवणसुद्धा क्रांतिसिंहांची परीक्षा पाहणारीच आहे.

"एका रात्री निघाले. पायी प्रवास. नानांची दृष्टी अधू झालेली. त्यात गेल्या दोन वर्षांत चालण्याची सवय कमी झाल्याने मांडीस मांडी घासून मांड्यांचे चामडे निघून गेले. खरसुंडीजवळ तांबडे फुटले. गावात राहावयाचे नाही, म्हणून घाट चढून गेल्यावर खानापूर-बलवडीच्या पूर्वेस एक-दीड मैलावर भुवनेश्वरीचे देवालय लागते, त्या देवळात मुक्काम ठोकला.

"भुवनेश्वरीच्या पूर्वेस एक लहानसा ओढा वाहतो. त्या ओढ्यावर सर्वजण हात, पाय, तोंड वगैरे धुऊन न्याहारी करीत बसले होते. इतक्यात एक बाई खरसुंडीहून बळवडीस निघाली होती. तिने यांच्याकडे थोडी भाकरी मागितली. तिला दोन चपात्या दिल्या. त्याबरोबर तिने आणखी दोन चपात्या मागितल्या. परंतु दोनच चपात्या प्रत्येकाच्या वाटणीस येत होत्या. त्यामुळे तिला आणखी चपात्या देता आल्या नाहीत. त्या चपात्या घेऊन ती बाई सरळ बलवडीस गेली. तिने चावडीवरील लोकांस सांगितले की, 'भुवनेश्वरीच्या देवालयात फरारी लोक आहेत; एक फार दांडगा आहे आणि ते सारे चपात्या खात बसले आहेत.' बलवडीपासून दोन-तीन मैलावर खानापूर गाव आहे. तेथे पोलीस पार्टी होती. गावकऱ्यांनी तिकडे एक महार पाठवून दिला व सर्व गावाने काठ्या, कुऱ्हाडी, भाले घेऊन भुनेश्वरीस वेढा टाकला. डॉ. उत्तमरावांनी हा सर्व प्रकार पाहाताच ते चटकन मेंढरे राखणाऱ्या धनगरात जाऊन मिसळले व पाहुण्यापहीचे नाते लावीत त्यांच्याशी समरस झाले.

"इकडे देवळात गोविंदराव मिरगे, नाथाजी, सावळाराम वगैरे मंडळी होती. त्यांना गावकऱ्यांनी बराच दम भरला. त्यांनी, 'आम्ही मद्रासकडचे पाहुणे आहोत. आत शेटजी झोपले आहे. आम्ही खुरसुंडीस देवाला आलो आहोत.' वगैरे थापा सांगण्यास सुरुवात केली. पण त्यावर कोणाचाच विश्वास बसेना. शेवटी गावकऱ्यांनी विचारले, 'तो दांडगा बुवा कोठे आहे?' 'ते आमचे शेटजी. आत झोपले आहेत.' तेव्हा दाराच्या तोंडाशी उभे राहून प्रत्येकजण पाटलांना हाक मारू लागला. परंतु आत जाण्याचे धैर्य कोणासच होईना. शेवटी नाना पाटलांनी आपल्या उशाखालचे रिव्हॉल्वर पिशवीत घालून, आपले अंग थर थर कापत

आहे असे भासवून ते बाहेर येऊन आपल्या सहकाऱ्यांना म्हणू लागले, 'मी नको म्हणत होतो यायला, तर उगीच मला आणले. मी शेटजी माणूस साताऱ्यात नाना पाटलांचे लोक त्रास देतात अशी मी बातमी ऐकली, तीच खरी ठरली शेवटी.'

"इतक्यात गावचा पोलीस पाटील पुढे आला. त्याने एकदम पाटलांच्या पायावर डोके ठेवले व सर्व गावकऱ्यांना रागावून 'चला, बाजूला व्हा' असे म्हणून सर्वांना त्याने बाजूला सारले. अण्णा व त्यांचे सहकारी यांना त्याने गावात घेऊन जाऊन दूध दिले नि गाडी करून पाऱ्यापर्यंत दिवसा पोहोचते केले!"

इथेही १९३० ते १९४२ ची नाना पाटलांची भ्रमंती आणि जनतेत मिसळून तिला प्रेरणा देण्याची क्रांतिकारी मोहीमच उपयोगी पडली. जनतेने क्रांतिसिंहांवर अलोट प्रेम केले. त्यांना हातावरच्या फोडाप्रमाणे जपले. याचा हा आणखी एक पुरावा होता. असे पुरावे ठाई ठाई मिळत होते.

डॉ. उत्तमराव पाटलांची अशीच एक चित्तथरारक आठवण आहे. ते म्हणतात, "आम्ही चिखलगोठणहून दुपारी एकच्या सुमारास निघालो होतो. माझ्यासोबत लढ्यातला एक सहकारी पांडू हा होता. गावे, नदी-नाले ओलांडत एका गावाजवळ पोहोचलो. पांडूने मला एका आंब्याच्या झाडाखाली बसवले व तो पुढे गेला. एक-दोन घंटे तसेच निघून गेले. एवढ्यात ३-४ बंदूकधारी तरुण येताना दिसले. जवळ येताच त्यांनी खुणावले, तसा त्यांच्यामागून मी चालू लागलो. अर्ध्या तासात गाव आले! त्यांनी मला एका वाड्यात नेले व तेथे एका ठिकाणी बसवले. वाड्यात सर्वत्र धामधूम चालू होती. मी आपला मुकाटपणे सर्व पाहात होतो. एवढ्यात मला नेण्यासाठी पांडू आला. मी पांडूला विचारले, 'अरे हे काय आहे? आपण कुठे आहोत? हे गाव कोणते?'

'मामा, अहो हे कुडल गाव, तुम्ही आता बसला होता ते जी. डी. लाडांचे घर, शेजारी नाथाजी लाडांचे.' पांडूने खुलासा केला.

'मग इथं पोलीस पार्टी नाही?' मी कुतूहलाने विचारले.

'आहे की, १०० पोलिसांची गॅट, व्हॅन, वायरलेससह जय्यत तयार आहे!' पांडू सहज आणि हसत सांगत होता.

'१०० पोलिसांची गॅट गावातच आहे!' हे ऐकून माझ्या पोटात मात्र धस्स झाल्याशिवाय राहिले नाही!

आम्ही एक नाला उतरून पलीकडे गेलो. पलीकडं अंबराई होती. झाडाला ८-१० बत्त्या टांगलेल्या होत्या. बाजूस एक खोपटे होते. त्यातही बत्तीचा उजेड होता. शेतात गुऱ्हाळाची घाई असते तशी सर्वत्र घाईगर्दी होती. उत्साह ओसंडून जात होता. त्या जागेस जत्रेचे स्वरूप आले होते.

'पांडू, अरे हे काय आहे?' मी काकुळतीला येऊन विचारत होतो. पण माझ्या या प्रश्नावर तो नुसता हसत होता.

'अरे, अरे आहे काय ही भानगड पांड्या?' मी चिडून गेलो. तेव्हा पांडूने माझा हात धरला अन् गर्दीतून वाट काढत पुढे नेत नेत मला त्या खोपटात रेटून घातले. खोपटाच्या आसपास बंदूकधारी तुफान सैनिक खडा पहारा देत होते. मी त्या खोपटात शिरलो. बत्तीच्या उजेडात एका बाजेवर क्रांतिसिंह नाना पाटील बसले होते. उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. मी दिङ्मूढ झालो होतो! मला पाहाताच नाना पाटील उठले, मला कडकडून मिठी मारली व आपल्या शेजारी बाजेवर त्यांनी बसवून घेतले!

"नाना पाटलांसमोर बेलभंडारा आणि एक तळपणारी तलवार ठेवली होती. त्या खोपटाच्या प्रवेशद्वारातून ते बंदूकधारी द्वारपाल एकेकाला आत सोडत होते. आत येणारा प्रत्येकजण बेलभंडारा उचली, तलवारीला हात लावी व नाना पाटलांना कडकडून मिठी मारी. कुणी त्यांच्या पायावर लोटांगण घेत. शेजारी उभे असलेले दोन तुफान सैनिक मग त्यास भंडारा लावीत व त्यांच्या अंगावरही तो उधळीत.

"एवढ्यात एक करारी पण तेजस्वी तरुण आत आला. त्याने प्रथम बेल-भंडाऱ्यास स्पर्श करून सरळ तलवारीसच हात घातला, अन् डोळ्याचे पाते लवते न लवते तोच ती तलवार त्याने आपल्या दणकट मनगटावरून सरकन् फिरवली. रक्ताची चिळकांडी उडाली. त्या रक्ताचा टिळा त्याने नाना पाटलांना आणि शेजारी उभ्या असणाऱ्या मलाही लावला! माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले!

"दरम्यान एक गाडी बाहेर उभी राहिली. त्यातून तीन स्त्रिया उतरल्या. त्या आत आल्या. त्या होत्या नाना पाटलांच्या कन्या, भगिनी आणि माता! नानांची कन्या हौशाताई त्यांना बिलगली, तर खाली मान घालून उभ्या असलेल्या आपल्या भगिनीला त्यांनी जवळ बोलावले, तिला प्रेमाने थोपटले. मग आपल्या वृद्ध मातेच्या पायावर त्यांनी डोके ठेवले. आईने आपल्या या क्रांतिपुत्राची इडापिडा टळो म्हणून कानशिलावर बोटे मोडली! पुन्हा भंडारा

उधळण्यात आला!

"बाहेर सर्व क्रांतिवीरांमध्ये उत्साह भरून वाहात होता. भाले, तलवारी, फरशा व बंदुका यांनी सज्ज असलेला स्वातंत्र्यवीरांचा तो समुदाय म्हणजे अजब दृश्य होते. मी तर अवाक् होऊन बघतच राहिलो! लवकरच प्रसाद वाटला गेला. भंडारा उधळला गेला आणि मग 'छत्रपती शिवाजीमहाराज की जय', महात्मा गांधी की जय' असा जयघोष सर्वत्र दुमदुमला! या घोषणांनी वातावरणाचा उत्कर्षबिंदू गाठला गेला अन्... घोषणांचा निनाद आसमंतात विरतो न विरतो तोच सर्व बत्त्या विझवल्या गेल्या! क्रांतीचे ते दूत पाच मिनिटांच्या आत सर्व दिशांनी जसे आले होते तसे निघून गेले. मागे उरला चिडीगूप अंधार अन् आम्ही पाच-सहाजण. नाना पाटील, नाथाजी, पांडू, मी व आमचे दोन वाटाडे!

"मग आम्हीही निघालो. पावसाची रिपरिप सुरू होती. आमची पावले पुढं पडत होती. पण माझ्या डोळ्यांसमोरुन काही क्षणापूर्वीचे ते तेजस्वी दृश्य काही बाजूला होत नव्हते. साताऱ्याचे हे अजब दर्शन मला प्रथमच घडले होते. ४२ची चळवळ सुरू होऊन दोन वर्षांचा काळ लोटला होता. भारतातील स्वातंत्र्याचा लढा मरगळून पडला होता. या पार्श्वभूमीवर हा बेल-भंडाऱ्याचा कार्यक्रम म्हणजे सर्वत्र पसरलेल्या काळ्याकुट्ट अंधारात लखकन कडाडणारी वीज वाटला! अंधाराचा छेद घेऊन वातावरण उजळून टाकणारा. सातारच्या जनतेचे हे दिव्य दर्शन होते!"

क्रांतिसिंहांच्या महानतेचेही हे दिव्य दर्शन होते.

## बहुजन-कष्टकरी जनतेचे प्रतिसरकार

सातारा जिल्ह्याचे प्रतिसरकार उभारणारी मंडळी क्रांतिसिंहांसह बहुजन शोषित जाति-जमातींमधून आलेली आणि राबणाऱ्या वर्गांमधली होती. उच्च जातीय आणि जमीनदार वर्गीय कार्यकर्ते अपवादालाच होते. गेल ऑम्व्हेट यांनी जी पाहणी केली आहे ती या संदर्भात फारच महत्वाची आहे. ४६ प्रमुख प्रतिसरकारी पुढारी कार्यकर्त्यांची माहिती पूर्णपणे मिळू शकली. त्यांच्या स्वरूपावरून एकंदर संघटनेची कल्पना यायला काही हरकत नाही.

या ४६ प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये ७ ब्राह्मण, ५ वाणी आणि जैन, २३ कुणबी-मराठा, ७ बलुतेदार (स्पृश्य), २ अस्पृश्य बलुतेदार, २ मुस्लिम असे कार्यकर्ते होते. सातवीपर्यंत शिकलेले ३५ तर सातवीपेक्षा जास्त शिकलेले

सात आणि तिसरीपर्यंतच शिकलेले किंवा न शिकलेले ४ कार्यकर्ते होते. न शिकलेले किंवा तिसरीपर्यंत शिकलेल्यांमध्ये ब्राह्मण कुणीच नव्हते. यामध्ये मराठा-कुणबी, बलुतेदार आणि मुस्लिम समाजातले कार्यकर्ते होते. सातवीपेक्षा जास्त शिकलेल्यांमध्ये ब्राम्हण आणि मराठा कुणबीच सर्व होते.

जमीनदार आणि व्यापारीवर्गातून येणाऱ्या कार्यकर्त्यांची एकूण संख्या ९ होती. यात ४ ब्राह्मण, २ वाणी आणि जैन, २ मराठा-कुणबी आणि १ स्पृश्य बलुतेदारांपैकी होते.

कष्टकरी-शेतकरीवर्गात मोडणाऱ्यांची संख्या २१ होती. यात १४ मराठा-कुणबी, १ ब्राम्हण, २ वाणी आणि जैन, २ स्पृश्य बलुतेदार आणि २ मुस्लिम होते.

पांढरपेशा पार्श्वभूमीचे ५ लोक होते. त्यात २ ब्राम्हण, १ वाणी आणि २ मराठा होते.

कामगार किंवा मजूर असलेल्या कार्यकर्त्यांची एकूण संख्या ११ होती. यात ५ मराठा-कुणबी, ४ स्पृश्य बलुतेदार आणि २ अस्पृश्य बलुतेदार होते.

एकंदरीने पाहता बहुजन, शोषित जातींमधून आलेल्यांची संख्या ४६ पैकी ३९ होती. म्हणजे ८४.७८ टक्के कार्यकर्ते अशा जातींमधून आले होते. शारीरिक कष्ट करून जगणाऱ्या वर्गामधून ४६ पैकी ३२ लोक आले होते. म्हणजेच या वर्गाचे ६९.५६ टक्के कार्यकर्ते होते. एकंदरीने प्रतिसरकार बहुजन कष्टकऱ्यांच्या नेतृत्वाखाली चालत होते.

त्या वेळच्या साताऱ्या जिल्ह्यात ५४.९ टक्के कुणबी होते. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांत त्यांची संख्या ५० टक्के होती. त्यांचे प्रतिनिधित्व समाजातील त्यांच्या एकूण टक्केवारीच्या जवळपास होते. ब्राह्मण कार्यकर्त्यांची संख्या त्या काळातील टक्केवारीपेक्षा जास्त होती. समाजातील टक्केवारी ४.७ होती आणि प्रतिसरकारच्या पुढारी कार्यकर्त्यांमध्ये त्यांची संख्या १५.२ टक्के होती. वाणी आणि जैनांची टक्केवारी प्रतिसरकारमध्ये १०.८६ टक्के होती. हीसुद्धा समाजातील त्यांच्या टक्केवारीपेक्षा जास्त होती. स्पृश्य बलुतेदारांची संख्या त्या वेळच्या समाजात ९.५५ टक्के होती आणि प्रतिसरकारमध्ये १५.२ टक्के. मुस्लिमांची समाजातील टक्केवारी ३.४ होती तर प्रतिसरकारमध्ये ४.३४ होती. अस्पृश्य बलुतेदारांची त्या वेळच्या समाजातील टक्केवारी १०.७६ होती आणि प्रतिसरकारमध्ये ४.३४ अस्पृश्य बलुतेदारांच्या प्रतिनिधित्व समाजातील त्यांच्या

टक्केवारीपेक्षा बरेच कमी होते.

वयाच्या दृष्टीने पाहिले तर प्रतिसरकारचे एकंदर नेतृत्व तरुण होते असेच म्हणावे लागेल. ४६ प्रमुख कार्यकर्त्यांपैकी ४२ कार्यकर्ते पस्तीस वर्षांपेक्षा कमी वय असलेले होते. यापैकी १९ कार्यकर्ते २५ पेक्षा कमी वय असलेले होते. फक्त ४ जणच ३५ पेक्षा जास्त वय असलेले होते. यामध्ये स्वत: क्रांतिसिंह नाना पाटील, बर्डे गुरुजी, पांडू मास्तर यांचा समावेश होता.

कोणत्याही कम्युनिस्ट पक्षापेक्षा शोषित वर्ग-जातींचे तुलनात्मकरीत्या चांगले प्रतिनिधित्व प्रतिसरकारच्या एकंदर नेतृत्वात झाले होते. याचे कारण, सत्यशोधक चळवळीने घडवलेली जागृती, सत्यशोधक विचारांच्या आधारावर १९१९ ते २१ पर्यंत झालेला कूळ शेतकरी आणि बलुतेदारांचा उठाव हे होते. म. गांधींनी सत्यशोधक भूमिकेविषयी जवळकीची धोरणे घेतली. स्वत: होऊन सत्यशोधक पुढाऱ्यांना भेटण्याची कृती केली. त्यामुळे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासारखा नेता साताऱ्याच्या काँग्रेसला मिळाला. ही कारणेसुद्धा महत्त्वाची आहेत. नाना पाटलांच्या पाठोपाठ, जवळपास त्याच काळात पांडू मास्तर, बर्डे गुरुजींसारखे पुढारीसुद्धा बहुजन समाजातून पुढे आले.

प्रतिसरकारच्या पुढाऱ्यांच्या फळीत शोषित जातींची आणि कष्टकरीवर्गांची टक्केवारी आपण बघितली. स्त्रियांच्या टक्केवारीचासुद्धा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या काळात कुणबी-मराठा समाजातल्या स्त्रिया जरी शेतावर काम करणाऱ्याच होत्या, दररोजचा खर्च चालवण्यासाठी कोंबड्या, अंडी, कोकरे विकायला बाजारात जाणाऱ्या होत्या. फक्त चूल आणि मूल करणाऱ्या नव्हत्या. हे जरी खरे असले तरी त्यांनी चळवळीत काम करण्यासाठी पुरुषांप्रमाणे बाहेर पडणे, भूमिगत राहणे, शस्त्रे हातात घेऊन पुरुषांच्या बरोबरीने काम करणे फारच अवघड होते. आजही ग्रामीण भागात बहुजन जाति-जमातींमधल्या स्त्रियांनी पूर्णवेळ घराबाहेर राहून चळवळीत काम करणे सामाजिकदृष्ट्या अवघड आहे. भांडवली निवडणुकांच्या राजकारणात आता स्त्रिया भाग घेऊ लागल्या आहेत. पण चळवळीत पूर्णवेळ कार्यकर्ती म्हणून फिरणे आणि निवडणुकीत निवडून येऊन लोकप्रतिनिधी म्हणून काम करणे यात जमीनअस्मानाचा फरक आहे. आजही चळवळीची कार्यकर्ती म्हणून स्त्रीने पूर्णवेळ काम करणे, फिरती करणे, बाहेर राहणे हे समाजाला .फारसे मंजूर नाही. तेवढे परिवर्तन झालेले नाही.

या पार्श्वभूमीवर, त्याकाळात स्त्रियांनी प्रतिसरकारच्या सशस्त्र चळवळीत पुरुष

कार्यकर्त्यांच्या बरोबरीने पूर्ण वेळ बाहेर राहून, भूमिगत अवस्थेत फिरणे किती अवघड असेल याची आपण कल्पना करू शकतो. तरीही अशा काही स्त्रिया होत्या. प्रतिसरकारच्या संघटनेला ही गोष्ट नक्कीच अभिमानास्पद आहे. यात पहिला क्रमांक आहे तो कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या भावकीत जन्माला आलेल्या ऐतवडे गावच्या राजमतीताई पाटील यांचा (आताच्या राजमतीताई बिरनाळे). त्यानंतर इंदूताई दिनकरराव निकम, (आताच्या इंदूताई पाटणकर) यांचा घराबाहेर पडून पूर्ण सहभाग करण्यात नंबर लागतो. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या आई लक्ष्मीबाई नायकवडी यांनीसुद्धा अत्यंत धाडसाने आणि जोखीम पत्करून वाळवे येथे कार्य केले. त्यांना जेलमध्येही जावे लागले. पांडू मास्तरांच्या पत्नीही काही काळ चळवळीत सहभागी झाल्या होत्या. बिळाशीच्या मुक्ताबाई साठे या १९३०च्या जंगल सत्याग्रहापासूनच चळवळीत सहभागी झाल्या. अस्पृश्य बलुतेदार समाजातल्या असूनसुद्धा त्यांनी त्यांच्या परिसरात पुढेही चळवळीचे काम केले. यापैकी राजमतीबाईंचा नंबर पहिला लागतो याचे कारण त्यांनी केवळ घर सोडून पूर्णवेळ कामच केले असे नाही तर हाती शस्त्र घेऊन गुंडांचा आणि पोलिसांचा मुकाबला करण्यात आणि गुंडांचा बंदोबस्त करण्यात त्या प्रत्यक्ष सहभागी झाल्या होत्या हे आहे. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या आझाद हिंद फौजेच्या शाखेत त्या प्रत्यक्ष कार्यरत होत्या. फौजी ट्रेनिंगमध्ये त्या थावड्याच्या जंगलात सहभागी होत्या. १९४६ साली वॉरंट्स मागे घेतली जाईपर्यंत त्या भूमिगत राहून पुरुषांनाही मागे टाकण्याच्या रीतीने सशस्त्र कृतींमध्ये पुढाकार घेत होत्या. इंदूताई निकम यांनीही भूमिगत राहून काम केले. पण स्त्रियांना संघटित करणे, त्यांची सेवादले सुरू करणे. भूमिगतांना हत्यारे, गोळ्या, काडतुसे पोहोचवणे. अशा प्रकारची कामे त्या जास्त करीत होत्या. पुरुषांच्या बरोबर सशस्त्र संचात राहून भूमिगत भ्रमंती फक्त राजूताईंनीच केली.

या प्रमुख स्त्रियांव्यतिरिक्त सातारा जिल्ह्यातील शेकडो स्त्रिया जोखीम पत्करून प्रतिसरकारच्या कामाला मदत करीत होत्या. कार्यकर्त्यांना लपवून ठेवणे आणि ब्रिटिश पोलिसांच्या चौकशांना न घाबरता त्यांना कसलाच पत्ता लागू न देणे, भूमिगतांना गावांच्या शिवारात जेवण पोहोचवणे अशी कामे करणाऱ्या स्त्रिया गावोगावी होत्या. खरे म्हणजे अशा स्त्रिया नसत्या तर प्रतिसरकारच्या संघटनेला सातारा जिल्ह्यात एक दिवससुद्धा काम करता आले नसते. स्त्रियांनी केलेल्या या सहभागाची आणि धाडसाची म्हणूनच खास नोंद घेतली गेली पाहिजे.

स्त्रियांच्या अशा सहभागाविषयीची एक आठवण या ठिकाणी सांगणे योग्य

ठरेल. एकदा एका गावात नाना पाटलांना पकडण्यासाठी पोलीस घरोघर तपास करीत होते. प्रसंग मोठा बाका होता. बाहेर पडणे केवळ अशक्य होते. अशा वेळी एका ओल्या बाळंतिणीने आपली बाजल्यावरची जागा अण्णांना दिली. ते पांघरून ओढून नवजात अर्भकाशेजारी 'झोपून' राहिले. त्या खोलीत बाळंतिणीच्या खोलीचे वातावरण नैसर्गिकरीत्याच होते. बाजेखालची शेगडी वगैरे सर्व! खरी बाळंतीण चुलीसमोर काम करीत बसली. पोलिसांच्या तपासात नाना पाटील दिसलेच नाहीत. बाळंतीण दिसली. त्या बाजेवरची 'बाळंतीण' पोलीस निघून गेल्यावर उठून गेली! फरारी झाली!! क्रांतिसिंहांच्या बाबतीत जसा हा प्रसंग घडला तशाच प्रकारचे अनेक प्रसंग इतर भूमिगतांना वाचवण्यासाठी घडले. स्वत: दडपलेल्या अवस्थेत असणाऱ्या, दुय्यम स्थानावर ठेवल्या गेलेल्या स्त्रियांनीसुद्धा आपली जबाबदारी पार पाडली.

## प्रतिसरकारचे बांधीव संगठण आणि कार्यक्रम

प्रतिसरकारने १९४२-१९४३ या काळात ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. ब्रिटिश सत्ता प्रतिसरकारला चिरडू शकत नाही हे सिद्ध केले. गुंड-दरोडेखोरांचा बंदोबस्त केला. त्याचबरोबर स्वातंत्र्य मिळाल्यावर आपले राज्य कसे चालेल याची झलक, प्रात्यक्षिक दाखवायला सुरुवात केली. त्यासाठी कार्यक्रम आखला. १९४४ साली या पर्यायी सरकारच्या कारभारावर जास्त लक्ष केंद्रित करणे जरुरीचे झाले. तेवढे प्रतिसरकार आता स्वत:ला सिद्ध करून प्रस्थापितही झाले होते. म्हणून प्रतिसरकारचे संगठण जास्त सूत्रबद्ध करण्याचा निर्णय झाला. २० मार्च १९४४ रोजी मजदूर गावावरच्या मिरुख्याच्या वाडीला यासाठी सर्व प्रमुख भूमिगत कार्यकर्त्यांची बैठक झाली. सुमारे ९० कार्यकर्ते जमले होते. प्रतिसरकारचे सर्वसाधारण सेनापती आणि नेते क्रांतिसिंह नाना पाटील हेच कायम राहिले. प्रत्यक्ष हालचाली करून कृती करण्यासाठी जी कार्यकारिणी निवडण्यात आली तिचे प्रमुखत्व किसन वीर यांना देण्यात आले. उरलेली कार्यकारिणी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली : धन्वंतरी, अंतुकाका बर्डे, बुवा म्हावशीकर, नागनाथ नायकवडी, बाबूजी पाटणकर, शेख काका, नाथाजी लाड, महादू जाधव, एस. पी. जाधव, किसन मास्तर गोंदिकर. याचवेळी तीन सुपरवायझर्स निवडण्यात आले. १) पश्चिम भाग : पांडू मास्तर २) पूर्वभाग : जी. डी. लाड ३) उत्तर भाग : पांडुरंग बोराटे. जिल्ह्याच्या कामाच्या सोयीकरता २० भाग पाडण्यात आले. त्यासाठी भूमिगत कार्यकर्त्यांचे चाळीस गट पाडून त्या त्या भागाचा कारभार सांभाळण्याची यंत्रणा उभी केली गेली.

कार्यकारी मंडळाच्या निर्णयाप्रमाणे सेवादले, लायब्ऱ्या, न्यायदान मंडळे प्रत्येक गावी स्थापन करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. यापैकी न्यायदान मंडळांचा कार्यक्रम सर्वात महत्त्वाचा होता. प्रतिसरकारच्या ज्या एका कार्यामुळे सातारा जिल्ह्यात ब्रिटिश सत्ता चालतच नाही असे चित्र उभे केले गेले तो कार्यक्रम न्यायदान मंडळांचा होता. यामुळेच देशाला 'स्वातंत्र्य' मिळण्याआधीच सातारा जिल्ह्यातील जनतेला स्वातंत्र्याचा अनुभव यायला सुरुवात झाली होती.

गावामध्ये अन्यायाची घटना घडली असेल तर त्याचे 'निवारण' करणारी ब्रिटिश सरकारची साम्राज्यवादी यंत्रणा होती. मुलकी पाटील, पोलीस पाटील, फौजदार मामलेदार ते डी. एस्. पी. आणि कलेक्टरपर्यंतची एक यंत्रणा आणि दिवाणी व फौजदारी न्यायालयांची उच्च न्यायालय-सर्वोच्च न्यायालयापर्यंतची दुसरी यंत्रणा. दोन्ही बाजूंनी वकील देऊन आज चालते तशीच ही यंत्रणा चालू होती. शिराळा पेट्यात तर ८६ पोलीस पाटलांनी राजीनामेच दिले होते. त्यामुळे गुन्ह्यांच्या बाबत पहिली नोंद घेणारी सरकारी यंत्रणा मोडूनच पडली होती. या सर्व गावांमधून मुलकी किंवा पोलिसी क्षेत्रामध्ये सरकारी हस्तक्षेप बंदच पडला होता. पोलीस यायला घाबरत होते. तलाठ्यांनी राजीनामे दिले होते. त्यामुळे मुलकी दफ्तरे बांधून पडली होती. त्यामुळे जी ब्रिटिश यंत्रणा न्याय देत नव्हतीच ती बंद होती. प्रतिसरकारने गावसभेलाच न्यायाधीश बनवले. या गावसभारुपी न्यायालयात सर्व तंटे, वाद मांडले जायला सुरुवात झाली. सभेचे सूत्रसंचालन करायला भूमिगत प्रमुख कार्यकर्ते हजर असत. पण अंतिम निर्णय गावसभाच घेत असे.

गावसभेसमोर दोन्ही बाजू आपले म्हणणे मांडत. गावातील लोकांना प्रत्यक्ष अनेक गोष्टी माहीत असल्यामुळे सहसा खोटे सांगण्याचा प्रयत्न होत नसे. आणि झाला तरी तो टिकत नसे. प्रतिसरकारची ताकद पाठिशी असल्यामुळे लोक पूर्ण निर्भय बनले होते. ते कुणालाही न घाबरता ज्यांच्या चुका त्यांच्या पदरात टाकत असत. सामुदायिक चर्चेच्या शेवटी न्यायदान मंडळ निकाल देत असे. आणि विशेष म्हणजे या निर्णयाची अंमलबजावणी लगेचच, जागेवरच केली जात असे. प्रतिसरकारचे पाठबळ घेऊन तातडीने जो काही दंड, शिक्षा किंवा मार्ग काढला गेला असेल तो प्रत्यक्षात राबवला जात असे.

स्त्रियांना न नांदवणे, चोऱ्या-दरोडे, जबरदस्तीने एखाद्याची जमीन हडप करणे, कर्जात बुडवून घरदार उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करणे, मारहाण करणे,

स्त्रियांना पळवून नेऊन त्यांचा बाजार करणे, ब्रिटिश सरकारला भूमिगतांची खबर देणे. दरोडेखोरांना मदत करणे अशा प्रकारच्या तंट्यांच्या बाबतीत न्याय दिला जात असे. या पद्धतीमुळे वेळ आणि पैशांचा मोठाच अपव्यय बंद बंद केला गेला. गरीब लोकांना, कष्टकरी स्त्री-पुरुषांना, शेतकरी-मजुरांना न्याय मिळू लागला. अन्यायाचा पुरता बंदोबस्त होणारे मार्ग निघू लागले. या परिणामी लोकांनी शहरांमध्ये वकील आणि कोर्टाकडे जाणे बंद केले. या जिल्ह्यातील कोर्टांची अवस्था दयनीय झाली. त्यांना कोणी विचारीनासे झाले.

जिल्ह्यातील सुमारे ३०० गावांमध्ये न्यायदान मंडळे सुरू झाली. त्याचबरोबर सेवादले आणि वाचनालयेसुद्धा सुरू करण्यात आली. एक नवे भारलेले वातावरण या सर्व गावांमध्ये पसरले. आपण नवा समाज घडवतो आहोत अशा उमेदीने गावोगावाचे तरुण कामाला लागले. स्त्रियांची खास सेवादलेसुद्धा सुरू करण्यात आली. बहुजन समाजातल्या स्त्रियासुद्धा शिकू शकतात, सामाजिक काम करण्यासाठी घराबाहेर पडू शकतात असे वातावरण बळ धरू लागले. काही ठिकाणी, अखेरीच्या काळामध्ये हायस्कूले आणि बोर्डिंगेसुद्धा सुरू केली गेली. हे सर्व करण्यामध्ये गावा-गावांत ज्यांचा पुढाकार होता अशी मंडळी त्या काळात अगदी तरुण होती. गरीब, कष्टकरी शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार अशा थरांतली होती. त्यामुळे गावातील जमीनदार, पाटील, कुलकर्णी इत्यादी बडी मंडळी बाजूला पडली. कारण त्यांनी बहुतांश ठिकाणी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग केलाच नव्हता. जे काही थोडे काँग्रेसमध्ये काम करणारे धनवान लोक काही गावांमध्ये होते ते १९४२च्या रणसंग्रामाच्या काळात क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या प्रतिसरकारविरुद्धच भूमिका घेत होते.

प्रतिसरकारला नैतिक पुढारीपण देणारी जी मंडळी राज्य पातळीवर होती त्यांच्यासह ठरलेल्या कार्यक्रमात जमीनदारी आणि एकंदरीने खाजगी मालमत्तेशी संबंधित प्रश्न न्यायदान मंडळांमध्ये घेऊ नयेत असे धोरण होते. पण प्रतिसरकारची ९० टक्क्यांपेक्षाही जास्त कार्यकर्ते मंडळी राबणाऱ्या शेतकऱ्यांमधून, कूळ म्हणून दुसऱ्याची शेती कसणाऱ्या शेतमजुरांमधून आणि बलुतेदारांमधून आली होती. त्यामुळे या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी होणे अशक्यच होते. शक्य तेवढ्या प्रमाणात कूळ शेतकऱ्यांचे, सावकारांच्या जाचात असलेल्या कष्टकऱ्यांचे प्रश्न घेतले गेलेच. ब्रिटिशविरोधी जास्तीतजास्त व्यापक फळी उभी राहण्याची काळजी घेण्यासाठी म्हणूनच जमीनदारी आणि मालमत्तेसंबंधी मुद्दे न घेण्याचे धोरण मध्यवर्ती पुढारीपणाने मांडले होते. पण प्रतिसरकारच्या प्रत्यक्ष पुढारीपणाची घडण आणि त्यांच्या स्वत:च्या जीवनात भोगावी लागणारी

दुःखे वेगळीच होती. क्रांतिसिंह स्वत:च सातारा जिल्ह्यातील १९१९ ते १९२१ या काळात झालेल्या कूळ-शेतकऱ्यांच्या आणि बलुतेदारांच्या संयुक्त उठावाचे साक्षीदार आणि सहभागी तरुण होते. प्रतिसरकारची जी तरुण पुढारी मंडळी होती त्यांच्या गावागावांत सत्यशोधक समाजाच्या नेतृत्वाखाली झालेली ही चळवळ होऊन गेली होती. तिचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. सर्व बहुजन समाज या चळवळीतून गेला होता. त्यामुळे जमीनदारीविरुद्ध सर्वसाधारण उठाव करण्याचा कार्यक्रम जरी प्रतिसरकारी क्रांतिकारकांनी घेतला नाही तरी न्यायदान मंडळासमोर या बाबतीत आलेले तंटे स्वीकारले. एकदा तंटे स्वीकारल्यावर होणारे निकाल जमीनदार आणि सावकारांच्या विरुद्ध लागणार हे उघडच होते! कारण या दोन्ही वर्गांकडून कष्टकरी जनतेवर अन्यायच होत होते. या जनतेची पिळणूक होत होती आणि न्यायदान मंडळ हे गावसभेचेच बनलेले असल्याने कूळ-शेतकऱ्यांना आणि कर्जदार माणसांना योग्य न्यायच मिळत होता. बांध रेटणे, जमीन हडप करणे, सावकारी स्वरूपाची खरेदीपत्रे (जमीन गिळण्यासाठी केलेली), जमीन वाटपातील अन्याय, वहिवाट हक्क, दत्तक प्रकरणे, दारू पिऊन भानगडी करणे अशा स्वरूपाच्या तक्रारी असत.

यामुळे या परिसरात प्रामुख्याने असणारे मराठा आणि ब्राह्मण जमीनदार प्रतिसरकारच्या विरुद्ध वागू-बोलू लागले. त्या पैकी काही काँग्रेसचे सभासदच होते. त्यांना स्वातंत्र्यापेक्षा त्यांचे खाजगी मालमत्तेचे हितसंबंध महत्त्वाचे वाटत होते. जमीनदारी आणि सावकारी महत्त्वाची वाटत होती. प्रतिसरकारची न्यायदानमंडळे ही अशा लोकांना अन्यायकारक वाटत होती. त्यामुळे यांपैकी काहींनी प्रतिसरकारच्या काही पुढारी कार्यकर्त्यांना पकडून देण्याचाही देशद्रोही व्यवहार केला. नाना पाटलांचे अव्वल शिष्य आणि वारसदार नागनाथ नायकवडी यांना पकडून देण्यासाठी वाळवे येथील दोन जमीनदारांनी पोलिसांना संपूर्ण सहकार्य केले. पोलीसांनी नागनाथ नायकवडींना पकडल्यानंतर वाळवे, पडवळवाडी येथील जनतेला या देशद्रोह्यांची नेमकी माहिती मिळाली. जनतेतील कार्यकर्त्यांनी शेतावर कामाला जाताना घेतलेली टिकाव, खोरं, कुदळ, खुरपं, विळा यासारखी 'हत्यारे' घरी टाकली आणि कुऱ्हाडीसारखी हत्यारे घेऊन या दोन्ही गावांच्या शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे देशद्रोह्यांना शिक्षा दिल्या. मुख्य खबऱ्या जमीनदार सदाशिव वामन देशपांडे याचा उजवा हात आणि डावा पाय शेतकऱ्यांनी तोडून टाकले आणि पोलिसांना मदत करणारा दुसरा जमीनदारसुद्धा अशाच शिक्षेला लागोपाठ दुसऱ्या दिवशी पात्र ठरला. **न्यायदान मंडळाच्या चळवळीमुळे तयार झालेली जनता अशा प्रकारे न्याय देण्याचे**

**काम कोणत्याही नेत्याच्या उपस्थितीशिवाय उत्स्फूर्तपणे करू लागली. क्रांतिसिहांनी १५ ऑगस्ट १९४७ नंतर जनतेची बाजू ज्या रीतीने घेतली त्या भूमिकेची मुळे अशा जनतेच्या, न्याय मिळवण्याच्या, हितसंबंधांत खोलवर रुजलेली होती. यापैकी हिंसेचा भाग सोडून देऊन जमीनदारी आणि सावकारीविरुद्ध महाराष्ट्रव्यापी जनचळवळ पुढच्या काळात नाना पाटलांनी उभी केली.**

१९४६ साली महाराष्ट्रात, म्हणजे त्या वेळच्या मुंबई राज्यात बाळासाहेब खेरांच्या मुख्यमंत्रीपदाखाली काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले. या सरकारचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारवर दडपशाही करण्याचा शक्य तेवढा प्रयत्न केला. स्वातंत्र्यासाठी केलेल्या चळवळीमधले तथाकथित 'गुन्हे' स्वत:ला स्वातंत्र्याची शक्ती म्हणणाऱ्यांच्या सरकारने पुन्हा उकरून काढण्याचा निंद्य उपद्व्याप केला. स्वातंत्र्यवीरानवर खटले भरून त्यांना गुन्हेगार ठरवण्यासाठी जंग जंग पछाडायला सुरुवात केली. क्रांतिसिंह नाना पाटलांना गुंडांचे पुढारी म्हणून संबोधण्याचे कृत्यही केले! याच काळात न्यायदान मंडळे बेकायदा ठरवण्यात आली. लोकांची न्यायालये चालवणे म्हणजे 'कायदा हातात घेणे' असे म्हणण्यात आले. ब्रिटिशांनी केलेले कायदे हेच स्वातंत्र्याच्याही सरकारचे कायदे राहतील असा व्यवहार सरकारने स्पष्टपणेच सुरू केला. १५ ऑगस्ट १९४७ नंतरही चालू ठेवला.

दारुबंदी हासुद्धा प्रतिसरकारच्या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. प्रतिसरकारचे प्रमुख कार्यकर्ते आणि सेवादलाचे कार्यकर्ते हा कार्यक्रम गावोगावी पार पाडीत असत. यामधे प्रामुख्याने दारू गाळणारी केंद्रेच बंद करण्याचा, त्यांची यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचा कार्यक्रम असे. दारू साठवलेल्या मातीच्या घागरी, माल कुजवत ठेवलेल्या घागरी, डबे या गोष्टी फोडून टाकण्यात येत असत. हा कार्यक्रम स्त्रियांना सर्वात जास्त आवडत असे. त्यांचा एकशेएक टक्के पाठिंबा असे. सुनांना छळणे आणि 'टाकणे' किंवा 'सोडणे' या प्रकारालाही आळा घालण्याचे मोठे कार्य प्रतिसरकारने सातत्याने केले. यामुळे एकंदरीने स्त्रियांमध्ये प्रतिसरकारला मोठा पाठिंबा तयार झाला.

सत्यशोधक पार्श्वभूमीमुळे आणि म. गांधींच्या धोरणामुळे प्रतिसरकारच्या बहुतांश भागात मंदिर प्रवेश आणि अस्पृश्यांसह सहभोजन असे कार्यक्रम मोहीम म्हणून घेण्यात आले. त्या काळात महाराष्ट्रात नाही तरी संपूर्ण देशामध्ये इतक्या प्रमाणात अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचे आम गावातल्या सर्व स्पृश्य जातींमधल्या

आम जनतेने गावजेवणात अस्पृश्यांमधील आण जनतेबरोबर मिळून-मिसळून सहभोजन करण्याचे कार्यक्रम कुठेच झाले नसतील. महात्मा फुले आणि महात्मा गांधी यांच्या संयुक्त प्रेरणेतून आणि स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून हे कार्यक्रम झाले. महात्मा जोतीबा फुल्यांच्या 'एकमय लोक' या 'राष्ट्र' कल्पनेतली 'एकमय' जनता उभी करण्याचा उपक्रम राबवणे हे प्रतिसरकारचे खास वैशिष्ट्य होते. क्रांतिसिंह नाना पाटील हे या सर्व कार्यक्रमांमागची मुख्य प्रेरणा होते. कारण त्यांनी सत्यशोधक चळवळीत काम करता करताच महात्मा गांधींचे वेगळे नेतृत्व काँग्रेसला प्राप्त झाल्यावरच काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. प्रतिसरकारविषयी असलेली जनतेतील प्रेमाची आणि आदराची भावनाच जनतेच्या मनात काही हजार वर्षे वसलेल्या ब्राह्मण्यवादी जातीय भेदांच्या विचारसरणीवर मात करू शकली. या जनतेला प्रतिसरकार म्हणजे स्वत:चा जीव की प्राण वाटत होते म्हणूनच मनातले कंगोरे बाजूला ठेवणे जनतेला शक्य झाले. हीच जनता सत्यशोधक तमाशांच्या संस्कारातून गेलेल्या जुन्या पिढीच्या पोटी जन्मली होती म्हणूनही हे शक्य झाले. महाराष्ट्रातल्या इतर जनतेला या व्यवहारापर्यंत यायला १९७० च्या दशकातली डॉ. बाबा आढावांनी पुढाकार घेतलेली 'एक गाव-एक पाणवठा' चळवळ व्हावी लागली हे या ठिकाणी आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९४२ च्या आधी 'सत्यशोधक लग्न' पद्धतीने आणि नंतर 'गांधी लग्न' पद्धतीने लग्ने लावण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवला होता. हा कार्यक्रम 'गांधी लग्न पद्धती' सार्वत्रिक करण्याच्या रीतीने प्रतिसरकारने राबवला. त्या वेळच्या काही लग्नपत्रिकांमध्ये अशा लग्नाचे वर्णन 'सुधारक पद्धतीने लग्न समारंभ होणार आहे' असे केलेले आढळते. अनेक लग्नपत्रिकांवर कुलदैवतांच्या नावाऐवजी 'भारत माता की जय' किंवा 'वंदे मातरम्' असेही लिहिलेले दिसते. काहींवर महात्मा गांधींचे फोटो छापलेले आहेत. या लग्नांची मंगलाष्टके म्हणजे स्वातंत्र्य चळवळीची गाणीच होती. हाताने कातलेल्या सुताच्या लड्याच हार म्हणून नवरा-नवरी एकमेकांना घालीत. हुंडा आणि इतर देण्या-घेण्याचा खर्च आणि अहेर यांना यात पूर्ण बंदी असे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अशी लग्ने लावली गेली. प्रतिसरकारच्या सशस्त्र असण्याची झलकसुद्धा यावेळी दिसत असे. लग्न लागल्यावर औट वगैरे उडवण्याच्या ऐवजी बंदुकांचे बार काढण्याचीसुद्धा रीत काही लग्नात अमलात आणली गेली होती! विशेष म्हणजे प्रतिसरकारच्या जवळ जवळ सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची स्वत:ची लग्ने सर्व अंधश्रद्धा, अनाठायी खर्च, पुरोहित वगैरेंना

फाटा देऊनच झाली. याची मुद्दाम नोंद घेतली पाहिजे. क्रांतिसिंहांची चळवळ 'बोले तैसा चाले' या प्रकारची होती. केवळ उपदेश करणारी नव्हती हे लक्षात घेतले पाहिजे.

साधारण अशा प्रकारचे कार्यक्रम प्रतिसरकारने राबवले. या कार्यक्रमांमुळे समाजातील काही घटक प्रतिसरकारला, त्याच्या प्रमुख कार्यकर्त्यांना आणि क्रांतिसिंहांना शत्रू मानू लागले. गुंड, दरोडेखोर, स्त्रियांवर अत्याचार आणि दडपशाही करणारे जमीनदार, सावकार, ब्राह्मण्यवादी, सनातनी, जातीयवादी, नोकरशहा, बडे व्यापारी आणि या सदरात मोडणारे काँग्रेसचे काही बुरसटलेले पुढारी आणि नेते असे हे घटक होते. शंकरराव देवांसारखे महाराष्ट्रातले काँग्रेस नेते हे मोरारजी देसाई यांच्या बरोबरीनेच प्रतिसरकारला शत्रू मानणाऱ्यांमध्ये होते. महात्मा गांधींच्या नंतर १९४५ साली तुरुंगातून सुटलेल्या पंडित नेहरूंनीसुद्धा प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांना सांगितले की त्यांचे कार्य काँग्रेसच्या चळवळीमध्ये बसते. मुंबईला करमकर आर्ट स्टुडिओमध्ये ही भेट अच्युतराव पटवर्धनांनी घडवून आणली. म. गांधी आणि पं. नेहरू या दोन प्रमुख नेत्यांची भूमिका प्रतिसरकारला पोषक असूनही महाराष्ट्रातील काँग्रेसचे पुढारीपण मात्र प्रतिसरकारच्या विरुद्ध होते. देव-देवगिरीकरांच्या काँग्रेसला प्रतिसरकार आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नेतृत्व सततच बोचत राहिले.

१९४६ साली प्रतिसरकारच्या सर्वच भूमिगतांची वॉरंटे सरकारने एका आदेशाने मागे घेतली. संपूर्ण प्रतिसरकार उघड्यावर 'प्रकट' झाले. पाण्यामध्ये मासे राहतात आणि त्यांचे जीवन त्या पाण्याशी एकरूप असते तसे क्रांतिसिंह नाना पाटील १९३० ते १९४२ पर्यंत जनतारूपी पाण्यामधे संचार करीत होते. प्रतिसरकारची जोखीम शिरावर घेतल्यानंतर त्यांचा हा संचार जवळ जवळ बंद झाला होता. दुसऱ्या अर्थाने ते जनतेत प्रत्यक्ष दिसत नसूनही जनतेच्या हृदयामध्ये सततच होते. प्रतिसरकारच्या संपूर्ण यंत्रणेच्या रूपाने त्यांचा संचार जनतेत होता. पण व्यक्तिगत पातळीवर क्रांतिसिंहांना पूर्णपणे अंधारात राहावे लागले. प्रतिसरकारलाच मजबूत ठेवण्यासाठी जनतेतला व्यक्तिगत संचार बंद करावा लागला. १९४६ साली पुन्हा नाना पाटील जनतेत उघडपणे संचार करू लागले. जनतेचा मांत्रिक पुन्हा नवे मंतरलेले दिवस निर्माण करायला शड्डू ठोकून विचारमंचावर भाषणे गाजवू लागला. नाना पाटलांचे प्रचंड मोठे सत्कार होऊ लागले.

२६ मे १९४६ रोजी सातारा जिल्हा राष्ट्रीय संघाच्या वतीने शिवाजी पार्क

मैदानावर सातारा जिल्ह्याच्या प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांचा भव्य सत्कार आयोजित केला गेला. क्रांतिसिंह नाना पाटील सर्वांचे नेते म्हणून या सत्काराला उपस्थित होते. पुणे नगरपालिकेने ७ नोव्हेंबर १९४६ रोजी क्रांतिसिंहांना मानपत्र दिले. ९ नोव्हेंबर १९४६ रोजी पुणे जिल्हा लोकलबोर्डाने त्यांना मानपत्र देऊन सन्मानित केले. ४ जानेवारी १९४७ रोजी सासवड नगरपालिकेने मानपत्र अर्पण केले.

जिल्ह्याजिल्ह्यांच्या खेड्यापाड्यांत तर क्रांतिसिंहांचे असंख्य सत्कार कार्यक्रम झाले. या सर्व सत्कारांनी जनतेच्या हृदयामध्ये क्रांतिसिंहांचे स्थान अढळ स्वरूपात तयार झाले होते हेच सिद्ध होत होते. अनेक मंत्र्यांना आणि मुख्य मंत्र्यांना जनता विसरेल पण या क्रांतिकारी फकिराला ती विसरणार नाही हे त्याच वेळी जनतेने दाखवून दिले. अशाही काळात जे क्रांतिसिंहांवर आणि प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांवर चिखलफेक करीत होते. त्यांना पुणे जिल्हा लोकलबोर्डाने क्रांतिसिंहांना दिलेल्या मानपत्रात सडेतोड उत्तर दिले आहे, "क्रांतिवीर, काही दिवसांपूर्वी आपल्या क्रांतिकार्याचे तोंड भरून वर्णन करणारी पुढारी मंडळी आता आपल्याला 'हिंसक' व 'दहशतवादी' म्हणू लागल्याचे ऐकू येते. काही अधिकारी मंडळी तर 'गुन्हेगार' म्हणूनही आपले वर्णन करू लागलेले क्वचित दिसतात. शिवाजीमहाराजांनाही काही इंग्रज इतिहासकारांनी 'दरोडेखोर' म्हणून संबोधले आहे. बहुजनविरोधी मुठभर लोकांनी स्वत:च्या निष्क्रिय पांडित्याच्या अभिमानाने फुगून आपणाकडे तुच्छतेने पाहण्याचे प्रयत्न कितीही केले तरी आपल्या पराक्रमामुळे व आपण अतुल त्यागाने केलेल्या देशसेवेमुळे बहुसंख्य शेतकरी व कामकरी समाजाच्या अंत:करणात आपणास मिळालेल मानाचे स्थान ध्रुव ताऱ्याप्रमाणे तेजस्वी व अढळ राहील, असा आम्हा सर्वांना पुर्ण विश्वास आहे."

●

# उष:काल होता होता... काळरात्र झाली!

१५ ऑगस्ट १९४७ रोजी या देशाची सत्ता ब्रिटिश साम्राज्यवादी भांडवलदारांच्या हातातून स्वातंत्र्य चळवळीच्या नेतृत्वात असलेल्या काँग्रेसच्या हातात आली. ७-८ ऑगस्ट १९४२ च्या काँग्रेसच्या ठरावाप्रमाणे 'कामगार-शेतकऱ्यांचे प्रजाराज्य' मात्र आले नाही. 'या गरिबांनो या, झेंडा हाती घ्या। काँग्रेसची हाक तुम्हा हाय हो ॥' या गाण्यातले ध्येय गाठले गेले नाही. ज्या ध्येयाने हुतात्मांनी प्राण अर्पण केले त्यांचे ध्येय, त्यांची स्वप्ने यांची परिपूर्ती झाली नाही. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली ज्या प्रतिसरकारने संघर्ष केला त्याच्या बहुसंख्य प्रमुख कार्यकर्त्यांना आणि खुद्द क्रांतिसिंहांना १५ ऑगस्ट १९४७ रोजीचे 'स्वातंत्र्य' हे भांडवलदारांच्या हातात गेल्याचेच दिसले. बहुजन-कष्टकरी जनतेचे खरेखुरे स्वातंत्र्य दूरच राहिल्याचा अनुभव त्यांना १५ ऑगस्ट १९४७च्या आधीपासून आणि त्यानंतर ताबडतोबीने आला.

"आपण स्वतंत्र झालो. आता राज्य आपल्या मालकीचे. शेतकरी-कामकरी यांचे. त्यांच्या सोईप्रमाणे कायदा होणार. आम्ही आमचे जेवण स्वत:च्या हाताने खाणार असे वाटले. पण सगळीच निराशा. आपल्या देशात असे कुठपर्यंत चालणार याचा शोध लागेल काय? मला वाटते शेतकरी व कामकरी या शब्दांवरून दुसराच अर्थ ठरला असावा..." स्वातंत्र्य चळवळीतील एक विद्यार्थी कार्यकर्त्यांचे त्या काळचे १९४२ चे एक भूमिगत पुढारी बाबूजी पाटणकर यांना १९४७ साली आलेले हे पत्र. क्रांतिसिंह नाना पाटलांशी तर यापेक्षाही जास्त कार्यकर्त्यांनी अशाच तऱ्हेचा संवाद केला. १९४७ पर्यंत भ्रमनिरास करणारा अनुभव अनेक प्रसंगांतून येत गेला. न्यायदान मंडळे बेकायदा ठरवणे, गरीब, कष्टकरी शेतकऱ्यांकडून सक्तीने लेव्ही वसूल करणे, कामगारविरोधी धोरणे राबवणे, प्रतिसरकारच्या पुढारी कार्यकर्त्यांनासुद्धा जेलमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करणे, असे हे प्रसंग होते. त्यामुळेच त्या काळापर्यंत काँग्रेसमध्ये असलेल्या समाजवादी गटाला काँग्रेसच्या बाहेर पडावे लागले. समाजवादी पार्टी तयार झाली. प्रतिसरकारची काही पुढारी मंडळी या पार्टीत सामील झाली.

क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी, कामगार गटात सामील झाले. शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक तुळशीदास जाधव आपल्या लेखात म्हणतात, "१९४७ साली मी, भाऊसाहेब राऊत, शंकरराव मोरे, ज्ञानोबा जाधव, भाई कडू आदी ४०-५० पुरोगामी विचाराच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना आळंदी येथे केली. काही काळानंतर नाना पाटीलही शे. का. पक्षात आमच्याबरोबर आले. पक्ष स्थापन होण्यापूर्वी व स्थापनेनंतर मी, नाना पाटील आदी बहुजन समाजातील पुढाऱ्यांनी महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात दौरे सुरू केले होते. या दौऱ्यांचा परिणाम होऊन शेतकरी कामगार पक्षाची ताकद खूपच वाढली... नाना पाटलांच्या व माझ्या सर्वत्र होत असलेल्या सभांमुळे बाळासाहेब खेर, शंकरराव देव, देवगिरीकर आदी पांढरपेशा वर्गातले पुढारी आपल्या स्वत:च्या राजकीय अस्तित्वाविषयी साशंक बनले होते. नाना पाटलांच्या सभा महाराष्ट्रात होऊ नयेत व सर्वसामान्य जनता जागृत केली जाऊ नये असाही प्रयत्न काही दुष्ट मनोवृत्तीच्या पुढाऱ्यांनी केला. तथापि या विरोधाला न जुमानता नाना पाटलांचे दौरे सर्व महाराष्ट्रभर आम्ही लोकांनी यशस्वी केले."

१९४७ पासून झालेल्या या दौऱ्यांच्या पार्श्वभूमीवर १९४८ साली सोलापूरला शेतकरी कामगार पक्षाचे पहिले अधिवेशन झाले. त्या काळात प्रामुख्याने ब्राह्मणेतर समाजाचा आणि त्या प्रकारच्या जुन्या चळवळीच्या परंपरा मानणारा पक्ष म्हणून शे. का. पक्ष पुढे आला. केशवराव जेधेंसारखा जुन्या पिढीचा लढवय्या सत्यशोधक काँग्रेस पक्षाचा त्याग करून शेतकरी कामगार पक्षात आला. १९३०च्या दरम्यान ब्राह्मणेत्तर पक्ष बरखास्त करून केशवराव जेधे गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये सामील झाले होते. १९४७-१९४८ पर्यंत त्यांच्यासारख्या संयमी नेत्याचासुद्धा भ्रमनिरास झाला. स्वत:च्या ऐन तारुण्यात सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक तमाशांच्या संस्कारात क्रांतिसिंह वाढले होते. शेतकरी-बलुतेदारांच्या उठावाचे ते साक्षीदार होते. या सत्यशोधकी परंपराना घेऊनच ते म. गांधींच्या काँग्रेसमध्ये सामील झाले होते. १९४७ साली सत्तेवर येणारी काँग्रेस वेगळीच आहे हे त्यांच्या ध्यानात आले. काँग्रेसवरचे ब्राह्मण्यवादी प्रभुत्व, जातीयवादी विचारसरणीचा वरचष्मा आणि काँग्रेसच्या आर्थिक धोरणांवर दिसणारे भांडवलदारांचे पक्के नियंत्रण याचा अनुभव त्यांना आला. त्यांच्यातला सत्यशोधक आणि राबणारा शेतकरी जागा झाला. शेतात भागत नाही म्हणून मुंबईला जाऊन टाटा-बिर्लांची गुलामी करणारा शेतकऱ्याचा भाऊ—कामगार—जागा झाला. प्रतिसरकारला मदत करण्यासाठी ज्यांनी सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ स्थापन केला त्या कामगारांना नव्या राज्याचे आलेले कटू अनुभव त्यांना

अस्वस्थ करू लागले. म्हणून त्यांची स्वातंत्र्याची स्वप्नपूर्ती आता काँग्रेस पक्ष संघटनेतून होईल असे त्यांना वाटेनासे झाले. त्यांनी शेतकरी कामगार पक्ष स्वीकारला.

१९४६ साली शिवाजी पार्कवर सत्कार होताना, चौपाटीवर सत्कार होताना ७-८ ऑगस्ट १९४२ च्या काँग्रेस अधिवेशनातील ठरावाप्रमाणे राज्य येणार असे अजूनही त्यांना वाटत होते. उष:काल होण्याची आस त्यांना लागली होती. पण १९४७ सालापर्यंत कामगार, शेतमजूर आणि राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात पुन्हा नवी काळरात्र सुरू झाल्याचे त्यांना दिसले. बहुजन जातिजमातींची गुलामी अजूनही संपणार नाही असे दिसले. पुन्हा त्यांनी नव्या क्रांतीची तयारी चालू केली. क्रांतिकारी फकीर पुन्हा गावोगाव शङ्ख ठोकत फिरू लागला!

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींचा खून नथुराम गोडसे नावाच्या जातीयवाद्याने, धर्मांधाने केला. हा माणूस हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याशी संबंधित होता. मुस्लिम वेश मुद्दाम धारण करून त्याने हे कृत्य केले. देशात हिंदू-मुस्लिम दंगली पेटाव्यात असा स्पष्ट डाव यामागे होता. गांधींच्या खुनाची बातमी महाराष्ट्रात पसरताच गावागावांत आगडोंब उसळला. नथुराम गोडसे ब्राह्मण असल्यामुळे आणि महाराष्ट्रात पेशवाईच्या काळापासून जमीनदारांमध्ये मराठ्यांबरोबरच जास्त संख्येने ब्राह्मण होते, त्यामुळे कुळ शेतकऱ्यांची पिढ्या न् पिढ्या पिळवणूक झाली होती यामुळे लोकांनी त्यांचा राग सर्वच ब्राह्मणांवर काढला. गावोगावी ब्राह्मणांची घरे जाळण्याचे प्रकार घडले. अशा प्रकारे, ब्राह्मण जातीत जन्माला आलेल्या सर्वांना 'शिक्षा' होणे योग्य नव्हते. १९४२ च्या सर्व प्रतिसरकारी क्रांतिकारकांनी त्यांना शक्य झाले तेवढ्या ठिकाणी हा प्रकार थांबवला. जाळपोळीला आळा घातला. नाना पाटील आणि नाथाजी लाड वगैरे काही कार्यकर्ते पुण्याहून औंधला निघाले असता वाटेत रहिमतपूरजवळ ही बातमी त्यांना समजली. क्रांतिसिंहांनी त्यांच्या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन आटपाडी भागात फिरून जाळपोळ थांबण्याची मोहीम राबवली. ब्राह्मणांच्या घरातून पळवलेल्या वस्तू चावडीसमोर जमा करायला लावून त्या ज्यांच्या त्यांना देऊन टाकण्याचाही उपक्रम राबवला.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी पोलिसांकरवी अण्णांना बोलावून घेतले. नाना पाटील आणि नाथाजी लाड असे दोघे मोरारजींना भेटायला मुंबईला गेले. नाथाजी लाड म्हणतात, "भेटीत नाना पाटलांना पाहताच मोरारजीभाई उसळून म्हणाले, 'पाटील तुम्ही हे काय

चालवले आहे? ब्राह्मणांची घरे-दारे जाळायला लागला आहात काय?' नानांनी शांतपणे उत्तर दिले, 'आपण गृहमंत्री आहात, तुमचे पोलिसी रिपोर्ट काय सांगतात? नाना पाटलाने ब्राह्मणांची घरे जाळली की जळणारी वाचवली?'

"नाना पाटलांच्या सभांचे वृत्तान्त पोलिसांनी वरपर्यंत धाडले होते. तेव्हा बाजू अंगावर येत आहे हे पाहताच मोरारजी म्हणाले, 'रिपोर्ट काहीही असोत. पण तुम्ही ३० सालापासून महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ केलीत. त्याचा परिपाक म्हणून ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांची घरे जाळली. तुमच्या ब्राह्मणेतर चळवळीचे प्रायश्चित ब्राह्मणांना घ्यावे लागत आहे!'

"मोरारजीभाईंच्या या वक्तव्यावर नाना पाटील संतापून गेले अन् म्हणाले, 'मी ३० सालापासून ब्राह्मणेतर चळवळ केली आणि त्याचा परिपाक म्हणून ब्राह्मणांची घरे जळाली असे आपण म्हणत असाल, तर आणखी एक गोष्ट ध्यानात घ्या. ३० सालापासून ४५ सालापर्यंत स्वातंत्र्याचीही चळवळ केली, देश स्वतंत्र केला आणि या सर्वांचा परिपाक म्हणून तुम्ही सत्तेच्या खुर्चीवर बसलात! ब्राह्मणेतर चळवळीच्या परिपाकाप्रमाणे हाही परिपाक वाईट आहे असे समजून तुम्ही सत्तेच्या खुर्चीतून खाली उतरा!' असा शब्दावरून शब्द वाढत गेला. शेवटी मोरारजीभाई उद्‌गारले, 'आम्हाला माहीत आहे एक दिवस आम्हालासुद्धा तुम्ही गोळ्या घालाल!' तेव्हा नाना पाटील म्हणाले, 'तुम्हाला गोळ्या कशाला घातल्या पाहिजेत? लोकशाहीत तुम्हाला गोळ्या घालून कशाला काढायला पाहिजे? लोकांनी मते दिली नाहीत की तुम्ही आपोआप सत्तेवरून जाल! गोळ्या घालणारे आम्ही नाही. आम्ही गांधीवादी आहोत. आम्ही पूर्वीपासून स्वातंत्र्य चळवळीत आहोत. तुमच्यासारखी इंग्रजांची सेवाचाकरी करून धन्यता मानणारे आम्ही कधीच नव्हतो. गृहमंत्री पदावर असणाऱ्या व्यक्तीने असे आरोप करताना जबाबदारीने केले पाहिजेत.' क्रांतिसिंहांवर आलेला हा प्रसंग म्हणजे एका नव्या युगाच्या संघर्षाची सुरुवात होती. अखंड क्रांतिकारकाची क्रांती खंडित न होता पुढेच जाण्याची गरज परिस्थितीतच तयार झाली होती.

जातीय उतरंड कायम ठेवून भांडवलशाही वाढवण्याचे धोरण भारतीय राज्यकर्त्यांनी चालू ठेवले. जातीव्यवस्था मोडण्याचे आणि वर्गीय शोषण संपवून कामगार, मजूर, कष्टकरी-शेतकरीवर्गांना शोषणातून मुक्त करण्याचे धोरण क्रांतिसिंहांना पाहिजे होते. सत्यशोधक चळवळ, गांधीवाद आणि कष्टकरीवर्गामधून आल्यामुळे स्वत:चेच अनुभव या आधारावर क्रांतिसिंहांच्या भूमिकेची घडण झाली होती. या घडणीला प्रतिसरकार काळात राबवलेल्या धोरणांमुळे आणि

प्रचितीमुळे पक्केपणा आला होता. सत्यशोधक भूमिका न सोडता स्वीकारलेली मार्क्सवादी विचारसरणीच यासाठी पोषक होती. म्हणून ब्राह्मणेतर चळवळीच्या कुशीतून आलेल्या, सत्यशोधक विचारांचा प्रभाव असलेल्या पुढाऱ्यांनी मार्क्सवाद स्वीकारून स्थापन केलेला 'शेतकरी कामगार पक्ष' नाना पाटलांना आपलासा वाटला आणि त्यांनी या पक्षाच्या प्रचारात स्वतःला झोकून दिले.

पण जसजशी या पक्षाची संघटनात्मक घडण होत गेली तसतसे काही विसंगत अनुभव अण्णांना येऊ लागले. पक्षाची संघटनात्मक प्रमुख पदे, तालुका, जिल्हा पातळीपासूनच मराठा-कुणबी समाजातील पांढरपेशांकडे, विशेषतः वकिलांकडे जाऊ लागली. यापैकी बरेच पुढारी स्वाभिमानाने स्वतःला कुणबी-मराठा म्हणून घेण्यापेक्षा तथाकथित 'शहाण्णव कुळी', 'घरंदाज मराठे' म्हणवून घेत असत. एकंदरीने पक्षाच्या मराठा कार्यकर्त्यांमध्ये मराठा दुरभिमान आणि त्याला लागून येणारी इतर बहुजन जातिजमातींना कमी लेखणारी भावना असल्याचा अनुभव येऊ लागला. पुढारीपण या विचार-व्यवहारांना आळा घालीत नाही असेही प्रत्ययाला येऊ लागले.

विद्रोही संत तुकारामांनी आपल्या गाथेत एका अभंगात म्हटले आहे,

"बरा कुणबी केलो। नाही तर दंभेचि असतो मेलो ॥१॥
भले केले देवराया। नाचे तुका लागे पाया ॥
विद्या असती कांही। तरी पडलो अपायी ॥२॥
सेवा चुकतो संताची। नागवण हे फुकाची ॥३॥
गर्व होता ताठा। जातो यम पंथे वाटा ॥४॥
तुका म्हणे थोरपण। नरक होती अभिमाने ॥५॥ ॥ध्रु॥

क्रांतिसिंह नाना पाटलांना त्यांच्या घरातून वारकरी पंथाची 'दीक्षा' परंपरेनेच मिळाली होती. लहानपणापासून गळ्यात घातलेली तुळशीची माळ आयुष्याच्या अखेरपर्यंत गळ्यात वागवली. आयुष्यभर त्यांनी या माळेच्या साक्षीनेच अंधश्रद्धांवर घणाघाती हल्ला केला. देव-देवस्कीचा बुरखा त्यांच्याइतक्या कुशलतेने कुणीच फाडला नाही. 'तुका सांगे मूढ जना। देही देव कां पाहा ना ॥५॥' असे सांगणाऱ्या तुकारामाचा विचार घेऊन त्यांनी माणसांमध्ये देव पाहिला आणि तुकारामांप्रमाणेच त्यांनी 'कुणबी' असल्याचे समाधान मानले, अभिमान मिरवला. जाती-अभिमान त्यांनी मिरवला नाही. शेतात राबून प्रामाणिकपणे जगणाऱ्या जनतेचा अभिमान मिरवला. जातिव्यवस्था मोडण्यासाठी जमेल तेथे घाव घातले. त्यामुळेच त्या काळातल्या शेतकरी कामगार पक्षात

पुढारी म्हणून पुढे आणल्या जाणाऱ्या मंडळींची प्रवृत्ती त्यांना रुचली नाही.

नाना पाटलांनी ज्या सहकाऱ्यांबरोबर स्वातंत्र्य चळवळीत काम केले ते सर्व कष्टकरीवर्गामधून आणि बहुजन जातिजमातींमधून आले होते. त्यांनी ज्या तरुणांचे १९४२ साली नेतृत्व केले ते अल्पशिक्षित पण बुद्धिमान आणि कुणबावा करणाऱ्या शेतमजूर, कष्टकरी-शेतकरी थरातून स्पृश्य-अस्पृश्य बलुतेदार जातींमधून आले होते. आपण फार मोठे शिकलेले असल्यामुळे आपण श्रेष्ठ आहोत असा 'अपायी' पाडणारा 'ताठा' त्यांच्यापैकी कुणाकडे नव्हता. ते स्वातंत्र्य चळवळीसाठी, राबणाऱ्या जनतेसाठी जीवावर उदार होऊन लढलेले होते. त्यामुळे शे.का.पक्षाच्या संघटनेचा नवा परिसर अण्णांना आपलासा वाटणे शक्य नव्हते. या पार्श्वभूमीवर त्यांची अस्वस्थता वाढत होती. अशा काळातच शेतकरी कामगार पक्ष आणि 'नव जीवन संघटना' म्हणून जो कम्युनिस्ट गट त्या काळात महाराष्ट्रात निर्माण झाला होता त्यांची एकाच पक्षात समाविष्ट होण्याची बोलणी सुरू झाली. या चर्चांमधून अण्णांसमोर कम्युनिस्ट विचारांचे जग फार मोठ्या प्रमाणावर उलगडू लागले. जागतिक पातळीवर राबणाऱ्या स्त्री-पुरुष जनतेची चळवळ, रशिया आणि चीनमधील 'कम्युनिस्ट' क्रांत्या यांचा जास्त व्यापक आणि सखोल परिचय त्यांना होऊ लागला.

'नव जीवन संघटना' ही कम्युनिस्ट पक्षातून काही मतभेदांमुळे बाहेर पडलेल्या काही कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने तयार झालेली कम्युनिस्ट संघटना होती. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या काळात कम्युनिस्ट पक्षाने घेतलेली भूमिका मान्य नसल्यामुळे सुरुवातीला हे कार्यकर्ते बाहेर पडले होते. त्यावेळी देशात एकच कम्युनिस्ट पक्ष होता. सोविएत रशियावर हिटलरने हल्ला केल्यानंतर सोविएत कम्युनिस्ट पक्ष आणि सोविएत सरकारने दुसरे महायुद्ध हे 'लोकयुद्ध' आहे अशी भूमिका घेतली. हिटलर वगैरे फॅसिस्ट शक्तींच्या विरोधी फळीमध्ये इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे साम्राज्यवादी भांडवली देश होते. या फळीमध्ये सोविएत युनियन सामील झाला. या क्षणापर्यंत सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाप्रमाणे दुसरे महायुद्ध हे 'साम्राज्यवादी युद्ध' होते. जगाच्या वाटणीसाठी साम्राज्यावाद्यांमध्ये चाललेला रक्तरंजित संघर्ष होता. त्यामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षानेही हीच भूमिका उचलून धरली होती. तो पक्ष एकंदर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाला होता. पण सोविएत युनियन, इंग्लंड वगैरे दोस्त राष्ट्रांच्या आघाडीत सामील झाल्याबरोबर भारतीय कम्युनिस्ट पक्षानेसुद्धा या युद्धाला 'लोकयुद्ध' म्हणून घोषित केले. स्वातंत्र्यलढा तात्पुरता बाजूला ठेवून ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या युद्ध संघटित करण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा

देण्याचा निर्णय या पक्षाने घेतला. त्यामुळे त्या काळात जनतेने या पक्षाला झिडकारून टाकले. ही भूमिका न पटल्यामुळे एस. के. लिमये यांच्या नेतृत्वाखाली कॉ. यशंवत चव्हाण वगैरे बहुसंस्थेने बहुजन समाजातून आलेली तरुण कार्यकर्ते मंडळी 'नव जीवन संघटना' या गटात संघटित झाली.

दुसऱ्या बाजूला शेतकरी कामगार पक्षाने चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली झालेल्या यशस्वी क्रांतीचा आदर्श घेण्याचा निर्णय घेतला. प्रामुख्याने कष्टकरी-शेतकरी कुळांच्या जमीनदारी विरोधी उठावाच्या आधारावर लाल सैन्य बनवून झालेली ही क्रांती पक्षाला जवळची वाटली. त्याने 'मार्क्सवाद-लेनिनवादा'चा जाहीरपणे स्वीकार केला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चिनी कम्युनिस्ट पक्षाने स्वत:ची चळवळ थांबवून दोस्त राष्ट्रांच्या युद्ध प्रयत्नांना पाठिंबा दिला नव्हता. त्यामुळेही शे.का.पक्षाला त्याचे आकर्षण वाटले. कॉ. प्रभाकर वैद्य यांनी या पक्षाच्या स्वरूपाबाबत म्हटले आहे, "...भारतातील आणि महाराष्ट्रातील मातीमधून स्वाभाविकपणे निर्माण झालेला, स्वातंत्र्यलढ्याच्या कुशीतून साताऱ्यातील क्रांतिकारक प्रतिसरकारच्या मुशीतून घडलेला, म. फुलेप्रणीत सर्वांगीण सामाजिक समतेच्या लढ्याची परंपरा सांगणारा असा हा नवा पक्ष होणार होता." शेतकरी कामगार पक्षाची भूमिका 'दाभाडी प्रबंध' नावाने प्रसिद्धीस आलेल्या पुस्तकात जाहीर केली होती. नवजीवन संघटनेला या भूमिकेचे आर्कषण वाटले. महाराष्ट्रात मोठा जनाधार बरोबर घेऊन जाणाऱ्या अशा पक्षाची भूमिकासुद्धा जर सर्वसाधारणपणे मान्य होणारी असेल तर आपण एकाच पक्षात यावे असे त्यांना वाटले.

एकत्र येण्याच्या या प्रक्रियेत प्रचंड वैचारिक घुसळण झाली. वादविवाद झाले. यातून पक्ष जास्त चांगला होऊन बळकट होण्याऐवजी पक्षात फूट पडली. नवजीवन संघटनेतले कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि क्रांतिसिंह नाना पाटील, दत्ता देशमुख, भाई सथ्या अशी शेतकरी कामगार पक्षातली मंडळी यांनी एकत्र येऊन 'कामगार किसान पक्ष' स्थापन केला. १९५२च्या पाहिल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर ही फूट पडली. या निवडणुकीत भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष आणि कामगार किसान पक्ष व डावा समाजवादी पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) अशा डाव्या पक्षांच्याच तीन आघाड्या रिंगणात उतरल्या. काँग्रेसला विरोध करण्याबरोबरच त्या एकमेकांविरुद्धही उभ्या राहिल्या. क्रांतिसिंह नाना पाटील कामगार किसान पक्षात असल्यामुळे डाव्या समाजवादी पक्षासह संयुक्तपणे ते निवडणुकीत उतरले. जुन्या सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारची अर्धी कार्यकर्त्यांची फळी क्राँग्रेसमध्ये राहिली आणि

अर्धी डाव्या पक्षांमध्ये गेली. पण १९५२ साली डाव्या पक्षांमध्ये गेलेले पुढारी एकमेकांविरुद्ध उभे राहिले. याचा फायदा काँग्रेसला झाला आणि नाना पाटलांसह सर्व डावे पुढारी एकमेकांची मते विभागल्यामुळे सपशेल पराभूत झाले!

सातारा जिल्ह्यात १९५२ च्या निवडणुकांमध्ये प्रतिसरकारमधल्या पुढारी कार्यकर्त्यांचा पराभव झाल्याची घटना सामाजिक-राजकीय दृष्टीने एक दुःखद घटना होती. जनतेने अत्यंत दडपशाहीच्या आणि परकीय सत्तेच्या अवघड काळात मार खाऊन आणि दंड सोसूनसुद्धा प्रतिसरकारी पुढाऱ्यांना हातावरच्या फोडासारखे जपले होते. त्या जनतेचा या निवडणुकीत नाइलाज झाला. स्वातंत्र्यातले पहिलेच सरकार तयार करण्यासाठी ही निवडणुक होती. पहिल्यांदाच २१ वर्षावरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा समान अधिकार या वेळी मिळाला होता. ब्रिटीश सत्ता जरी जनतेच्या चळवळीमुळे सत्ता सोडून गेली होती तरी तिने जाताना काँग्रेस पक्षाकडे सत्ता सोपवली होती. 'स्वातंत्र्याचा पक्ष' म्हणून तो हुशारीने पुढे आला होता. अशावेळी हे स्वातंत्र्य खरेखुरे नाही, राबणाऱ्या जनतेचे आणि शोषित जातिजमातींचे नाही असे म्हणणारे नाना पाटील काँग्रेस विरूद्ध प्रचार करीत होते. सर्वसाधारपणे हेच मत मांडणारे पण वेगळ्या डाव्या पक्षात असणारे त्यांचे जुने शिष्य जर एकत्र असते तर मात्र किमान सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतिसिंहांची फळी विजयी झाली असती. पण तसे घडले नाही. त्यामुळे जनतेमध्ये अनेक प्रकारचे संभ्रम निर्माण झाले. निवडणुकांचा भाग म्हणून या जुन्या आणि क्रांतिकारक सहकाऱ्यांनी एकमेकांवर नको त्या प्रकारेसुद्धा टीका केली. त्यामुळे जनतेत संभ्रमाबरोबरच निराशा आणि उद्विग्नता तयार झाली असेल तर आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. एकँदरीने महाराष्ट्रात डाव्या पक्षांचा मोठाच पराभव झाला. तरीही त्यांची सर्वांची मते एकत्र केली तर त्या वेळी त्यांना १५.३ टक्के मते पडली होती! फूट नसती तर अनेक ठिकाणी त्यांचे बरेच जास्त उमेदवार निवडून आले असते.

या निवडुणकांच्या निकाळामुळे क्रांतिसिंह नाना पाटील बिलकुलच निराश झाले नाहीत. पण शेतकरी कामगार पक्षाचे शिखरावरचे नेते असलेली काही मंडळी मात्र निराश झाली. सर्वात ज्येष्ठ नेते आणि जुने सत्यशोधक केशवराव जेधे यांनी पुन्हा एकदा काँग्रेसच्या दारातून आत प्रवेश केला. त्यांच्याबरोबरच शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, माधवराव बागल अशी शेतकरी कामगार पक्षाची संस्थापक आणि दिग्गज असलेली पुढारी मंडळीसुद्धा काँग्रेसमध्ये गेली. कामगार किसान पक्ष हा अण्णांना बहुजन समाजाचा, क्रांतिकारी राजकीय दिशा असलेला पक्ष होताना दिसत नव्हता. जनतेचा अंगाखांद्यावर वाढत आलेले

क्रांतिसिंह त्या पक्षाच्या 'छोट्याशा जागेत' घुसमटू लागले. त्यांच्या सत्यशोधकी उर्मींनाही तिथे वाव दिसत नव्हता. अशा पार्श्वभूमीवर ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाले. नेते तर ते होतेच. ते स्थान त्यांना जनतेने दिले होते. कम्युनिस्ट पक्षात नाना पाटील गेल्यामुळे त्यांचे 'बहुजन कष्टकरी जनतेचे नेते' हे जे स्थान महाराष्ट्रात होते ते कमी होण्याचा किंवा वाढवण्याचा प्रश्नच नव्हता. उलट त्यांच्या पक्षात प्रवेश करण्यामुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जनतेतले स्थान जास्त उंच झाले. कम्युनिस्ट पक्षाचा पाया कितीतरी जास्त व्यापक झाला.

यानंतर आयुष्याच्या अखेरीपर्यंत क्रांतिसिंहांनी पक्ष बदलला नाही. ते कॉम्रेड क्रांतिसिंह झाले. पण म्हणून त्यांनी त्यांचा सत्यशोधकी बाणा सोडला असे झाले नाही. त्यांची तुळशीची माळही शेवटपर्यंत राहिली. पण ते हाडाचे, पूर्णवेळ पक्ष कार्याला जीवन देणारे क्रांतिकारक कम्युनिस्ट म्हणूनच जगले. जेलच्या वाऱ्याच त्यांनी आषाढी-कार्तिकी वाऱ्या मानल्या. आणि राबणाऱ्या स्त्री-पुरुष जनतेत, दलितांमधे, बहुजन समाजामध्येच त्यांनी आपले श्रद्धास्थान कायम केले. त्यांच्यासारखा स्वतःचे घरच नसलेला कम्युनिस्ट विरळा आहे. कम्युनिस्ट पक्षात पुढे अनेक मत-मतांतरे झाली. फुटी झाल्या. चढ-उतार झाले. पण अण्णा भारतीय कम्युनिस्ट पक्षात राहिले. त्यांच्या स्वतंत्र मतांना आणि काही वेगळ्या मतांनासुद्धा वावरायला थोडी जास्त सोगळी जागा आवश्यक होती. बहुतेक ती त्यांना इतर, नव्याने फुटून तयार झालेल्या कम्युनिस्ट पक्षात मिळाली नसती. म्हणूनसुद्धा ते याच पक्षात शेवटपर्यंत रहात गेले. अखेरीच्या काळात पक्षाची आणि त्यांची भेट कमीच होती होत तरी ते त्याच पक्षात होते.

क्रांतिसिंहांचा १९४७ नंतरचा इतिहास त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांमधून पुढे आणला जात नाही. किंवा जी पुस्तके हा इतिहास पुढे आणतात त्यांच्यातसुद्धा त्या इतिहासासाठी फारच कमी जागा ठेवलेली असते. खरे म्हणजे १५ ऑगस्ट १९४७च्या आधी १७-१८ वर्षे क्रांतिसिंह सार्वजनिक जीवनात होते. आणि त्यानंतर किमान २५-२६ वर्षे ते कृतिशीलपणे कम्युनिस्ट पक्षाचे काम करीत होते. प्रतिसरकारच्या कामामध्ये जे रोमांचकारी अंग होते ते जरी त्यानंतरच्या काळात नसले तरी त्यांनी या काळात महत्त्वाच्या ऐतिहासिक लढ्यांचे नेतृत्व केले. त्यामध्येसुद्धा वेगळ्या प्रकारचे, सशस्त्र आणि चमत्कार वाटण्यासारखे नसलेले एक रोमांचकारी अंग होतेच.

बऱ्याच प्रमाणात अनेकांना क्रांतिसिंहांचा १५ ऑगस्ट १९४७ नंतरचा

इतिहास पुढे येणे हे गैरसोईचेसुद्धा आहे. स्वातंत्र्यापूर्वीचे नाना पाटीलसुद्धा काही विभागांना गैरसोईचे होतेच. पण त्या वेळचे नाना पाटील ब्रिटिशांच्या परकीय सत्तेविरुद्ध लढणारे स्वातंत्र्यसेनानी होते. व्यापक अर्थाने सर्वच भारतीयांच्या स्वातंत्र्यासाठी ते लढत होते. त्यामुळे ते सर्वांना सोईचे 'करून घेता येतात' पण स्वातंत्र्यानंतर मात्र देशी सत्तेविरुद्ध लढणारेच नाना पाटील स्पष्टपणे पुढे येतात. तशा स्वरूपात त्यांना स्वीकारण्याचा प्रश्न उभा राहतो. हे क्रांतिसिंह, कॉम्रेड क्रांतिसिंह असतात. भांडवलशाहीविरुद्ध, जमिनदारीविरुद्ध, कामगारांच्या मुक्तीसाठी, कूळ शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी, दलितांच्या मुक्तीसाठी, जातिव्यवस्था मोडण्यासाठी संघर्ष करणारे नाना पाटील असतात. भांडवलशाहीला संपवण्यासाठी ज्या भांडवलदारांच्या विरुद्ध लढायचे ते प्रामुख्याने याच देशातले असतात. जमीनदार याच देशातल्या खेड्यापाड्यातले असतात. जातीयवादी गावागावातल्याच अगदी पलीकडल्या गल्लीतले असतात. स्त्रियांवर होणारा अन्याय प्रामुख्याने जरी उच्च जातीय आणि वरच्या वर्गातल्या लोकांनी केलेला असला तरी कष्टकरी जनतेतल्या पुरुषांबरोबरही या संदर्भात एक वेगळा संघर्ष द्यावाच लागतो. या सर्व बाबतीत 'सर्व भारतीय' एक नसतात. एक भाग पिळणूक करणाऱ्यांचा असतो तर दुसरा भाग पिळले जाणाऱ्यांचा असतो. दोन्ही भाग भारतीयच असतात. पण पिळणूक नसलेला समृद्ध भारत उभारायचा असेल तर पिळवणूक संपवावी लागते. पिळवणूक करणाऱ्या माणसांनी पिळणूक करणे बंद करावे लागते. तसे त्यांनी केले नाही तर त्यांच्याशी संघर्ष होतो. या विचाराने ज्यावेळी क्रांतिसिंह शड्डू ठोकून उभे राहतात त्या वेळी ते भांडवलशाहीची बाजू घेणाऱ्यांना, प्रस्थापिताला उचलून धरणाऱ्यांना गैरसोईचे वाटतात.

नाना पाटलांच्या १९४२ मधल्या काही सहकाऱ्यांनी प्रस्थापितांबरोबर राहणे पसंत केले. भांडवलशाहीचे राज्य चालवणे पसंत केले. सत्तेची खुर्ची त्यांना प्यारी वाटली. ही सत्तेची खुर्ची भांडवलशाहीच्या राज्याची आहे, धनदांडग्यांच्या हितासाठी आहे, जातिव्यवस्था पोटात सामावून घेऊन जाणारी आहे हे या सहकाऱ्यांना माहीत होते. तरीही ते सत्तेच्या अशा खुर्चीकडे वळले. क्रांतिसिंह नाना पाटीलसुद्धा १९५२च्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या बाजूने उभे राहिले असते तर मुख्यमंत्रीसुद्धा झाले असते. पण त्यांनी अशी तडजोड नाकारली. प्रतिसरकारच्या काळात आणि त्या आधीच्या सत्यशोधक चळवळीच्या काळात त्यांनी पाहिलेले खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचे स्वप्न भंग पावले होते. अशा स्वातंत्र्याची झलक त्यांच्या प्रतिसरकारने १९४२ ते १९४६ पर्यंत दाखवली होती. परकीय ब्रिटिश सत्तेशी सशस्त्र संघर्ष करता करता पर्यायी सामाजिक व्यवहार, न्यायाचा

व्यवहार उभा करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. हाच व्यवहार ब्रिटिश सत्ता हटवल्यावर विस्तारणार अशी स्वप्ने त्यांनी पाहिली होती. पण तो विस्तारण्याऐवजी नव्या सरकारने त्याला दडपशाहीने बंद केले. हे अपुरे राहिलेले 'कामगार-शेतकऱ्यांच्या प्रजाराज्याचे' स्वप्न त्यांना प्रत्यक्षात आणायचे होते. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा नव्या क्रांतीचा नांगर घालून जनमानसाची जमीन उभी-आडवी नांगरायला सुरुवात केली. आयुष्याच्या अखेरपर्यंत या क्रांतीच्या नांगराचा मिट्टा त्यांनी हातातून सोडला नाही.

अशा प्रकारे काम करीत असाताना आणि पुन्हा नव्या चळवळीला सुरुवात करीत असताना क्रांतिसिंहांची आर्थिक परिस्थिती कायमच नाजूक राहिली. पण तशाही परिस्थितीत त्यांच्या कामात कधीही खंड पडला नाही. नाशिक रोड सेंट्रल जेलमधून १९५६ साली श्री. रामचंद्र पाटील, मास्तर यांना पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात, "आपले ता. ८ चे पत्र पोहोचले. मी दक्षिण साताऱ्यातर्फे लोकसभेला उभे रहावे, असे एकंदरीत मंडळींचे मत दिसते. पण निवडणुकांमध्ये खर्चाचा प्रश्न हा लोकप्रियतेपेक्षाही महत्त्वाचा असतो. त्यामुळे निवडणुकांचा बोजा मी उचलू शकत नाही. आर्थिकदृष्टीने मी निर्धन माणूस आहे. माझी आर्थिक स्थिती आपण १९३० सालापासून पाहात आहात. शिवाय माझा पराभव करण्यासाठी काँग्रेसवाल्यांजवळ पैशाशिवाय दुसरे भांडवल नाही. त्यामुळे त्यांनी पैसा भरपूर खर्च केल्यास त्या मानाने आपली आर्थिक स्थिती दर्या मे खसखस ठरणार आहे. म्हणूनच निवडणुकीस उभे राहण्याचा मी विचार करू शकत नाही.

"पैशाच्या मदतीच्या आश्वासनावर माझा मुळीच विश्वास नाही. मी एकदा आजारी असताना माझ्याजवळ औषधालाही पैसा नव्हता, हे तुम्हाला ठाऊक आहे. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून सुरुवात तशी डिपॉझिटपासून सुरुवात करावी लागणार आहे. आणि डिपॉझिट गोळा होईपर्यंत निवडणुका संपूनही जातील. तरी निवडणुकीस उभे राहू नये, असे माझे प्रामाणिक मत आहे. आपल्या सहकाऱ्यांना सप्रेम नमस्कार, कळावे."

पुढे क्रांतिसिंहांना १९५७च्या निवडणुकांमध्ये जनतेने कम्युनिस्ट पक्ष आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून सातारा लोकसभा मतदारसंघात उभे केले आणि प्रचंड बहुमताने निवडून आणले. अण्णांना तशा अर्थाने पैशाची 'अडचण' आली नाही कारण जनतेची, प्रेमाची संपत्ती त्यांच्याकडे भरपूर होती.

# संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि लोकसभेत प्रवेश

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय जीवनातली एक अत्यंत अव्वल दर्जाची आणि आजवरच्या इतिहासातली सर्वात मोठी चळवळ होती. महाराष्ट्रातली जवळ जवळ ९० टक्के कामगार, कष्टकरी-शेतकरी, शेतमजूर जनता या चळवळीत अत्यंत चिवटपणे लढली. एवढी मजबूत एकजूट आणि घराघरांतल्या लहान मुलांपर्यंतसुद्धा पोहोचणारे लढाऊ भावनात्मक उधाण महाराष्ट्राने यानंतर पाहिलेले नाही. क्रांतिसिंह नाना पाटलांनी या चळवळीत महाराष्ट्राचे एक प्रमुख लोकप्रिय नेते म्हणून फार मोठे कार्य केले. झंझावती दौरे करून महाराष्ट्रातल्या जनतेला खवळलेल्या समुद्राप्रमाणे उभे करण्यात त्यांचा सर्वात मोठा वाटा होता.

आचार्य प्र. के. अत्रे यांनी अण्णांच्या योगदानाविषयी म्हटले आहे, "पंचावन्न सालापासून नाना पाटलांच्या जीवनात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा तिसरा खंड सुरू झाला आहे. या चार वर्षांत (१९५५ ते १९५९-६०, ले.) नाना पाटलांनी आपल्या सिंहगर्जनेने महाराष्ट्रातले गावन्‌गाव हलविले आहे! एक दिवसाची विश्रांतीसुद्धा कधी त्यांनी घेतली नाही. साऱ्या महाराष्ट्रातून झंझावती दौरा काढून हजारो प्रचाराच्या सभा त्यांनी घेतल्या आहेत. 'मुंबईसह महाराष्ट्र राज्य' आपण मिळविले म्हणून काँग्रेसवाल्यांनी आपले 'पटके' कितीही आभाळात उडविले तरी त्या श्रेयात नाना पाटील यांचा फार मोठा भाग आहे. हे एखादा आंधळासुद्धा सांगू शकेल. अजूनही संयुक्त महाराष्ट्राचा लढा कुठे संपलाय? बेळगाव-कारवारसाठी समितीने सत्याग्रहाची घोषणा केलीच आहे. आणि सत्याग्रहाच्या आघाडीवर आपण दंड थोपटून उभे राहणार असल्याची नाना पाटलांनीही गर्जना केली आहे. 'समाजवादी भारतात, समाजवादी महाराष्ट्र निर्माण झाल्याचे सुवर्णदृश्य माझ्या डोळ्यांनी मला पाहू द्या!' अशी तळमळीची इच्छा नाना पाटलांनी आपल्या एकसष्टीच्या समारंभाच्या वेळी परवा व्यक्त केली!" आचार्य अत्रेसुद्धा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या प्रमुख नेत्यांपैकी आणि वक्त्यांपैकी एक

होते. त्यांनी क्रांतिसिंहांचे केलेले हे वर्णन १९६० सालचे आहे. अण्णांच्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतल्या सहभागाविषयी एवढे नेमके वर्णन फारच कमी ठिकाणी मिळेल.

१९४६ साली प्रकट झाल्यानंतर त्यांचे महाराष्ट्रभर अभूतपूर्व सत्कार झाले होते. त्या काळात हैद्राबाद संस्थानात असलेल्या मराठवाड्यात आणि मध्य प्रदेशात असलेल्या विदर्भातसुद्धा हे दौरे झाले होते. बेळगाव-कारवार-धारवाड भागातही त्यांचे सत्कार झाले होते. यातून ते पुढे होणाऱ्या महाराष्ट्राच्या जनतेला चांगलेच परिचित झाले होते. १९५३ साली त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केल्यावर १९५४ सालीच त्यांची किसान सभेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढे संघटित करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर संचार केला होता. १९५४ सालीच ते किसान सभेचे भारतीय पातळीवरचे उपाध्यक्ष झाले आणि १९५५ साली त्यांना किसान सभेचे भारतीय पातळीवरचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. १९५५ सालीच त्यांचा, किसान सभेचे प्रतिनिधी म्हणून, सोविएत युनियनचा आणि पूर्व युरोपातील 'समाजवादी' देशांचा दौराही झाला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत क्रांतिसिंहांनी एक नेते म्हणून पुढाकार घेण्याच्या काळापर्यंत क्रांतिसिंहांची राजकीय-सामाजिक उंची १९४२-४६ च्या कालखंडापेक्षासुद्धा जास्त वाढली होती. ते या काळात फक्त स्वातंत्र्य चळवळीतले सशस्त्र प्रतिसरकारचे नेते नव्हते तर आम ग्रामीण कष्टकरी जनतेचे नेते होते. सातारा जिल्हा राष्ट्रीय संघाच्या १९४२-४६च्या कामामुळे त्यांची मुंबईच्या गिरणीकामगारांमध्ये चांगलीच लोकप्रियता होती. लोखंडी जथ्याच्या सातारी कामगारांची संघटना तर त्यांच्या पुढाकारानेच झाली होती. त्यामुळे शेतकरी समाजाबरोबरच, त्यांच्याच घराघरांतून येऊन मुंबईला चाकरी करणाऱ्या, कामगारांमध्येसुद्धा नाना पाटलांचे पुढारी म्हणून एक खास स्थान निर्माण झाले होते. त्यामुळे क्रांतिसिंह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतले प्रमुख नेते बनणे ही 'नैसर्गिक' बाबच होती. शहरात आणि खेड्यात अशा दोन्ही ठिकाणी जनमनाची पकड घेणारे ते समितीचे एकमेव नेते होते.

भाषावर प्रांत रचनेचा प्रश्न स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेस पक्षामध्ये चर्चीला जाणारा प्रश्न होता. १५ ऑगस्ट १९४७ नंतर या प्रश्नावर जास्त धारदारपणे चर्चा होऊ लागल्या. काँग्रेसअंतर्गत मागण्या वाढू लागल्या. यामुळे पंडित नेहरू आणि वल्लभभाई पटेल यांच्यावर दबाव आलाच. यातूनच एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली लिंग्विस्टिक प्रॉव्हिंसेस कमिशन (भाषावर प्रदेशांसाठी मंडळ) तयार केले गेले. १७ जून १९४८ रोजी तयार झालेल्या या कमिशनध्ये

पन्नालाल आणि जगत नारायण लाल असे अन्य सदस्य होते. या कमिशनला मदत करण्यासाठी नऊ सहयोगी सदस्यसुद्धा नेमण्यात आले होते. ते महाराष्ट्र, मध्य प्रांत, बेरार, महाकोशल, कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू, केरळ यांचे प्रतिनिधित्व करीत होते. १३ डिसेंबर १९४८ रोजी या कमिशनचा रिपोर्ट सादर झाला. १,००० लेखी निवेदने या कमिशनकडे आली होती आणि त्यांनी ७०० साक्षीदारांच्या मुलाखती घेतल्या होत्या.

भाषावर प्रांत रचनेच्या बाजूने असणारी मंडळी या कमिशनच्या रिपोर्टमुळे मोठ्या प्रमाणात खवळली. कारण, भाषेच्या पायावर किंवा प्रामुख्याने भाषेचा विचार करून प्रांत रचना करणे हे देशाच्या व्यापक हितात बसणारे नाही आणि त्यामुळे त्या आधारावर काही कार्यवाही करू नये असा अहवाल या कमिशनने दिला होता. या अहवालामुळे काँग्रेस पक्षात जो असंतोष तयार झाला त्यामुळे जयपूरला झालेल्या अधिवेशनात भाषावर प्रांत रचनेच्या मागणीचा फेरविचार करण्यासाठी एक उप-समिती नेमण्यात आली. यात पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या अशा तीन वजनदार व्यक्तींचा समावेश होता. या उप-समितीचा रिपोर्ट ६ एप्रिल १९४९ रोजी प्रसारित करण्यात आला. या अहवालात भाषावर प्रांत रचनेचा प्रयत्न केल्यास जे दूरगामी परिणाम होतील त्याविरुद्ध इशारा दिला गेला होता. मद्रास शहराची मागणी सोडून देण्याच्या अटीवर या समितीने आंध्र प्रदेशाचे राज्य निर्माण होण्यासाठीची मागणी मान्य करणारा विचार मांडला होता. पण इतर सर्व मागण्या फेटाळून लावल्या होत्या.

भाषावर प्रांत रचनेचा प्रश्न यामुळे तीव्रच बनत गेला. आंध्र प्रदेशच्या मागणीसाठी स्वामी सीताराम या प्रसिद्ध गांधीवादी नेत्याने ३५ दिवसांचे आमरण उपोषण केले आणि विनोबा भावेंच्या आग्रहाखातर सोडले. पण त्या पाठोपाठ एक वर्षाने दुसरे गांधीवादी नेते पोट्टी श्रीरामुलू यांनी आमरण उपोषण सुरू केले. त्यांच्या ५८ दिवसांच्या उपोषणाच्या शेवटी १५ डिसेंबर १९५२ रोजी त्यांचा उपोषणातच मृत्यू झाला. यामुळे आंध्र प्रदेश मुलखात मोठ्या प्रमाणात अभूतपूर्व असे हिंसक आंदोलन झाले. परिणामी १९ डिसेंबर १९५२ रोजी पंतप्रधानांनी आंध्र प्रदेशचे स्वतंत्र राज्य केल्याचे जाहीर केले.

या घटनांचे परिणाम महाराष्ट्रातील जनता आणि नेते यांच्यावरही झाले. भाषिकांच्या मागण्याही जास्त तीव्रपणे होऊ लागल्या. या पार्श्वभूमीवर एस्. फाझल अली यांच्या अध्यक्षतेखाली एच. एन. कुंझरू आणि के. एम. पणिकर

सदस्य असलेले राज्य पुनर्रचना कमिशन २२ डिसेंबर १९५३ रोजी जाहीर झाले. १० ऑक्टोबर १९५५ रोजी या कमिशनचा अहवाल जाहीर झाला. या काळात आजच्या भाजपचा पूर्वीचा अवतार असलेल्या जनसंघाने राज्य पुनर्रचना कमिशनला दिलेल्या निवेदनात गुजरात आणि महाराष्ट्र यांचे मिळून द्विभाषिक मुंबई राज्य करावे असा प्रस्ताव मांडला होता. १९४६ पासून संयुक्त महाराष्ट्र समिती (जुनी), संयुक्त महाराष्ट्र सभा, संयुक्त महाराष्ट्र परिषद अशा अनेक उपक्रमांमधून गेल्यावर काँग्रेस वगळून इतर विरोधी पक्षांची संयुक्त महाराष्ट्र समिती (लढ्याचे नेतृत्व केलेली) ६ फेब्रुवारी १९५६ रोजी तयार झाली.

१८ नोव्हेंबर १९५५ रोजी पोलिसांचा बंदीहुंकूम मोडून संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईला मोर्चा काढला. यावेळी ५०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. इथूनच काँग्रेसमधील प्रतिनिधींबरोबर पूर्ण फारकत होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लढाऊ पर्वाला सुरुवात झाली. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईमध्ये समितीच्या वतीने हरताळ जाहीर करण्यात आला. हजारो लोक विधान भवनाच्या दिशेने मोर्च्याने निघाले. पोलिसांच्या लाठीमारालाही त्यांनी दाद दिली नाही. मोरारजी देसाई आणि सदोबा पाटलांच्या संयुक्त महाराष्ट्राला असलेल्या उर्मट विरोधामुळे लोक चिडले होते. सदोबा पाटील तर म्हणाले होते की पाच हजार वर्षे उलटली तरी मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही. यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारी कामगार जनता खवळली होती. लोक अश्रूधुरालाही जुमानत नव्हते. अशा या खवळलेल्या समुद्रावर पोलिसांनी गोळीबार केला. १५ हुतात्मे झाले. ३०० लोक जखमी झाले. या घटनेनंतर काँग्रेसच्या ११६ आमदारांनी आमदारकीचे राजीनामे दिले. एकंदरीने २२ जानेवारी १९५६ पर्यंत १०५ लोक हुतात्मे झाले. इतके तीव्र आंदोलन नोव्हेंबर १९५५ पासून झाले. या आंदोलनात धारातीर्थी पडलेल्या १०५ हुतात्म्यांच्या स्मरणार्थच फ्लोरा फाउंटनचा 'हुतात्मा चौक' बनला.

जानेवारी १९५६च्या काळात बहुसंख्य लोक गोळीबारात मारले गेले. याचे कारण १६ जानेवारी १९५६ रोजी नेहरूंचा निर्णय आकाशवाणीवर जाहीर झाला आणि खवळलेल्या जनतेने शहरात अनेक प्रकारे आपला राग व्यक्त केला. हा निर्णय जाहीर होण्याआधी १५ जानेवारी १९५६ रोजी काँग्रेसमधल्या संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा देणाऱ्या पुढाऱ्यांनी चौपाटीला सभा घेतली. त्याच दिवशी समितीचे १२ नेते आणि इतर ४३५ कार्यकर्ते प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या नियमाने पकडून जेलमध्ये टाकले गेले. कारण मुंबई महाराष्ट्राला न देण्याचा निर्णय होणार हे मोरारजींना माहीत होते आणि त्यामुळे जनता हल्ले करणार

हाही अंदाज होता. नेत्यांना पकडल्यावर जनतेचा असंतोष कमी राहील असा त्यांचा होरा होता. अटक केलेल्या १२ नेत्यांमध्ये अर्थातच क्रांतिसिंह नाना पाटील होते. त्यांच्याबरोबरच एस. जी. सरदेसाई, जोगळेकर, प्रबोधनकार ठाकरे, लालजी पेंडसे, कृष्णा देसाई, के. एस. भट, रसिक भट, पी. के. कुरणे, जी. एल. रेड्डी, व्ही. व्ही. चौधरी, गुलाबराव गणाचार्य यांचा समावेश होता. स्वातंत्र्यातल्या जेलवाऱ्या क्रांतीच्या वारकऱ्याला सुरू झाल्या!

१६ जानेवारी ते २२ जानेवारी या काळात समितीच्या नेत्यांनी दिलेल्या माहितीवरून ८१ लोक मारले गेले. मोरारजी देसाईंनी मुंबई विधानसभेत दिलेल्या उत्तरानुसार बेळगावच्या गोळीबारात बळी पडलेले ५ लोक धरून ७६ लोक मारले गेले. ज्या क्रांतिसिंहांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीच्या सुरुवातीला वडूज आणि इस्लामपूरच्या मोर्च्यांवर ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबारात लोक हुतात्मा होताना पाहिले त्यांना आता स्वातंत्र्याच्या सरकारच्या गोळ्यांनी शंभरच्यावर लोक मरताना पाहावे लागले. पारंतत्र्याच्या काळात एवढे लोक एवढ्या थोड्या काळात मारल्याचे एकच उदाहरण होते. ते म्हणजे जालियनवाला बागेत ब्रिटिशांनी केलेल्या गोळीबाराचे. मोरारजींनी मुंबईला जालियनवाला बागेचीच पुनरावृत्ती केली. क्रांतिसिंहांच्या काळजाला या घटनेने किती घरे पडली असतील त्याची कल्पनासुद्धा करता येणार नाही. याच साठी त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवावर उदार होऊन स्वातंत्र्यलढा केला काय असा जीवघेणा सवाल अण्णांच्या मनात या घटनेमुळे उभा राहिला नसेल तरच नवल.

क्रांतिसिंहांना पकडून जेलमध्ये ठेवल्यानंतर त्यांनी नाशिक रोड जेलमधून १४ मार्च, १९५६ रोजी त्यांच्या सहकाऱ्याला पत्र लिहिले आहे. पत्रात ते म्हणतात,"...आपले सर्वांचे आशीर्वादिकरून नाशिक सेंट्रल जेलमध्ये सुखरूप आहे. काही काळजी नसावी. माझी प्रकृती उत्तम आहे. माझे जेलमध्ये पाच (५) पौंड वजन वाढले. सकाळी व्यायाम थोडासा करतो. बाकी दिवसभर वाचन करतो. मुंबई येथे तारीख १६-१-५६ रोजी पहाटे ३ वाजता भायखळा ऑफिसवर मला अटक केली. आणखी दोन दिवसांनी पुरे २ महिने होतील. मला अंदाजे १ वर्ष राहावे लागेल असे वाटले."

जेलमध्ये जाणे अण्णांच्या दृष्टीने नवीन नव्हते. त्यांनी चक्की पिसण्याची सक्तमजुरीची शिक्षासुद्धा पारतंत्र्याच्या काळात भोगली होती. पण स्वातंत्र्याच्या सरकारने भाषावर प्रांत रचनेच्या स्वातंत्र्यासाठी जीवावर उदार होऊन लढणाऱ्या

क्रांतिसिंहांना अटक करणे त्यांना नवीन होते. पुढाऱ्यांना जेलमध्ये डांबून बाहेर जनतेला गोळ्या घालून मारणारे स्वातंत्र्यातले सरकार असणे हे त्यांना पिळवटून टाकणारे होते. खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी हा क्रांतिकारी फकीर पुन्हा सरकारी दडपशाहीच्या झळा सोसू लागला होता.

१६ जानेवारी रोजी मुंबई केंद्रशासित राहणार असल्याची घोषणा पंतप्रधान नेहरूंनी केल्यावर चळवळ तीव्र होऊन २२ जानेवारीपर्यंत १०५ लोक मारले गेले. पुढाऱ्यांना अटका झाल्या. परिणामी त्या वेळी केंद्र सरकारमध्ये मंत्री असलेल्या ना. सी. डी. देशमुखांनी २३ जानेवारी १९५६ रोजी मंत्रिमंडळाचा राजीनामा पंडित नेहरूंकडे पाठवला. १२ एप्रिल १९५६ रोजी हैद्राबाद विधानसभेने मुंबई महाराष्ट्राला देण्याच्या मागणीला पाठिंबा दिला. २५ जुलै १९५६ रोजी सी. डी. देशमुखांचा राजीनामा स्वीकारला गेल्यानंतर त्यांनी लोकसभेत घणाघाती भाषण केले. २७ जुलै १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने दिल्लीला जोरदार निदर्शने केली. ७ ऑगस्ट १९५६ रोजी लोकसभेने मुंबई राज्य हे मोठे द्विभाषिक म्हणून निर्माण करण्याचा निर्णय घेतला. ३० ऑगस्ट रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने या निर्णयाला पाठिंबा दिला. काँग्रेसने महाराष्ट्रीय जनतेच्या आशा-आकांक्षाशी गद्दारी केली.

२९ आणि ३० सप्टेंबर १९५६ असे दोन दिवस मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर द्विभाषिकाविरुद्ध परिषद झाली. या पाठोपाठ महाराष्ट्राच्या जनतेला फसवण्यासाठी कट शिजू लागला. या कटाचा भाग म्हणून १६ ऑक्टोबर १९५६ रोजी श्री. यशवंतराव चव्हाण यांना विधिमंडळ काँग्रेसचे नेते म्हणून निवडण्यात आले आणि १ नोव्हेंबर १९५६ रोजी महाद्विभाषिक मुंबई राज्य तयार केले गेले. या महाद्विभाषिकाचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होण्यातून मराठी माणसांना फसवता येईल अशी शक्तींची जुळणी केली गेली. पण मराठी जनता यामुळे फसणार नव्हती हे पुढच्या सर्व घटनांवरून स्पष्ट झालेच.

स्वातंत्र्य चळवळीत सनदशीर मार्गाने सहभागी झालेले आणि प्रतिसरकारची चळवळ चिरडली जाईल म्हणून मागे घ्यावी असे मत त्या काळात मांडणारे श्री. यशवंतराव चव्हाण महाद्विभाषिकाचे मुख्यमंत्री झाले. जानेवारीच्या १६ तारखेपासून ते १६ ऑक्टोबर १९५६ पर्यंत क्रांतिसिंह नाना पाटील नाशिक रोड सेंट्रल जेलमध्ये होते. याच काळात यशवंतरावांना मुख्यमंत्री बनविण्यासाठी लागणाऱ्या सर्व घडामोडी झाल्या. सशस्त्र प्रतिसरकारचा स्वातंत्र्यवीर, १९३० सालापासून पायाला भिंगरी बांधून स्वातंत्र्याची काँग्रेस ज्याने तळागाळांत

पोहोचवली तो क्रांतिसिंह बंदिवान करूनच मराठी जनतेविरुद्ध या कारवाया झाल्या. विशेष म्हणजे ज्या दिवशी यशवंतरावांना काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बनवले गेले त्याच १६ ऑक्टोबरला क्रांतिसिंहांनी नाशिक रोड सेंट्रल जेलमधून आपल्या मित्राला एक पत्र पाठवले. १९५७च्या येऊ घातलेल्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याचे आवाहन, 'डिपॉझिटसाठीसुद्धा पैसे नसल्यामुळे,' मी स्वीकारू शकत नाही असे या पत्रात त्यांनी म्हटले आहे! त्या काळातल्या मराठी समाजाच्या जीवनातला हा एक भयंकर विदारक योगायोग होता असेच या संदर्भात म्हणावे लागेल.

डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'क्रांतिसिंह नाना पाटील' या स्मृती ग्रंथाला शुभेच्छा देताना श्री. यशवंतराव चव्हाण म्हणतात, "...श्री. नाना पाटील हे सातारा जिल्ह्याने स्वातंत्र्य चळवळीत केलेल्या मोठ्या कामाचे प्रतीक आहेत. सातारा येथील चळवळीचे नाव देशात सर्व ठिकाणी पोहोचले ते नाना पाटील यांच्यामुळे. मला माझ्या विद्यार्थीदशेपासून त्यांच्याशी साहचर्य लाभले होते आणि तसेच साहचर्य पुढेही लाभत गेले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य झाले आणि त्याच निष्ठेने त्यांनी शेवटपर्यंत काम केले. त्यांचा पक्ष जरी बदलला असला तरी त्यांच्या माझ्या संबंधात बदल झाला नाही. कारण सामान्य माणसाच्या जीवनात प्रकाश यावा, त्याची बौद्धिक, सामाजिक व सांस्कृतीक उंची वाढवावी हाच त्यांचा ध्यास होता. या ध्येयासाठी त्यांनी आपले सर्व आयुष्य वेचले. आपण एका थोर, कर्तृत्ववान क्रांतिकारक नेत्याच्या स्मृतीस उजाळा देण्याचे काम करीत आहात हे वाचून आनंद वाटला..."

असे जरी असले तरी या दोन नेत्यांचे मार्ग १५ ऑगस्ट १९४७ च्या आधीपासूनच वेगळे झाले होते. १५ ऑगस्टनंतर तर त्यांची राजकीय दिशा एकमेकांविरुद्ध राहिली. यशवंतरावांचा घरोबा सत्तेशी जास्त राहिला तर क्रांतिसिंहांचा घरोबा जनतेच्या बाजूने सत्तेशी लढणाऱ्यांशी राहिला. त्यामुळे क्रांतिसिंह कायमच भणंग राहिले. क्रांतिसिंहांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या लेखात (सकाळ, १२ डिसेंबर १९७६) कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात, "चार पाच वर्षांपूर्वी त्यांची माझी गाठ एस. टी. बसमध्ये पडली. मी माझ्या गावाकडे निघालो होतो. ते आपल्या लेकीच्या गावाला हणमंत वडिये येथे निघाले होते." वयाच्या ७१-७२ वर्षांपर्यंत क्रांतिसिंह एस. टी.नेच प्रवास करीत होते असा याचा स्पष्ट अर्थ आहे. त्यांचा स्वत: होऊन केलेला प्रवास जवळ जवळ शेवटपर्यंत असाच राहिला. जनतेचा माणूस जनतेचेच जीवन जगत गेला. यशवंतराव १९४६ नंतर जे सत्तेत गेले ते शेवटपर्यंत सत्तेच्याच गल्लीत राहिले.

त्यांना पुन्हा जनतेच्या पद्धतीने जीवन जगण्याचा प्रश्नच आला नाही. महाराष्ट्राला घडवण्यात ज्या दोन जुन्या पुढाऱ्यांचा महत्त्वाचा वाटा, ऐतिहासिक वाटा आहे त्यांचे 'साहचर्य' हे असे दोन ध्रुवांचे साहचर्य होते असेच म्हणावे लागेल.

क्रांतिसिंह नाशिक जेलमधून बाहेर आले तोवर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकांचे ढोल वाजू लागले होते. ३० नोव्हेंबर १९५६ रोजीच शेडुल्ड कास्ट फेडरेशनने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र समितीत प्रवेश करीत असल्याचे जाहीर केले होते. त्यांनी पाच अटींवर हा पाठिंबा दिला होता. सर्व राखीव जागांवर शे. का. फे.चे उमेदवार उभे केले पाहिजेत. याशिवाय काही सर्वसाधारण खुल्या जागांवरही काही उमेदवार उभे करावेत. शे. का. फे. एक स्वतंत्र पक्ष म्हणून स्वत:ची ओळख कायम ठेवील. समितीने परिणामकारक काँग्रेस विरोधी आघाडी म्हणून काम केले पाहिजे आणि दलितांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी त्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विकासासाठी समितीने अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. अशा या अटी होत्या.

निवडणुकीला सामोरे जात असताना समितीमध्ये अकरा पक्ष होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, शे. का. पक्ष, संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस गट, मजदूर किसान पार्टी, लाल निशाण गट, शे. का. फेडरेशन, हिंदू महासभा, जनसंघ, क्रांतिकारी समाजवादी पक्ष, बोल्शेविक पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष असे हे पक्ष होते. सर्वसाधारण खुल्या जागांवरसुद्धा दलित उमेदवारांना उभे करणे हे या निवडणुकीचे वैशिष्ट्ये होते. या निवडणुकीत क्रांतिसिंह नाना पाटील सातारा लोकसभा मतदारसंघातून समितीचे आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले.

संयुक्त महाराष्ट्र समितीला या निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. याच निवडणुकीने क्रांतिसिंह नाना पाटलांना देशाच्या लोकसभेत खासदार म्हणून पाठविले. बी. सी. कांबळे, भाऊसाहेब गायकवाड, साळुंखे गुरुजी हे शेडुल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार लोकसभेच्या खुल्या जागांवर निवडून आले. आर. डी. भंडारे विधानसभेवर खुल्या जागेवरून निवडून गेले. या निवडणुकी पुरता तरी जातीयवाद गाडला गेला. समितीच्या यशामधला हा सर्वात मोठा मानाचा तुरा होता.

काँग्रेसचे या निवडणुकीत पानिपत झाले. काही जिल्ह्यांमध्ये तर काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून आला नाही. १९५२च्या निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्र

आणि मुंबई शहरात मिळून विधानसभेच्या १७० जागांपैकी १३९ जागा आणि लोकसभेच्या २२ पैकी १९ जागा जिंकल्या होत्या. पण १९५७च्या निवडणुकीत विधानसभेच्या महाराष्ट्रातील १३६ जागांपैकी फक्त ३३ जागा आणि लोकसभेच्या २२ पैकी फक्त दोनच जागा काँग्रेसला जिंकता आल्या. जनतेने काँग्रेसला लाथाडण्याचे या निकालातून उघड झाले. समितीच्या विजयात आणि काँग्रेसच्या दारुण पराभवात क्रांतिसिंहांचा फारच मोठा वाटा होता. आपला दैदिप्यमान इतिहास आणि कार्याची पत घेऊन ते संपूर्ण महाराष्ट्रभर आपल्या अमोघ वक्तृत्वाची मोहिनी घालत प्रचार करीत फिरले. स्वत:च्या यशाबरोबरच त्यांनी समितीचे यश कमावण्यासाठी अथक परिश्रम केले.

खासदार झाल्यानंतर नाना पाटलांनी लोकसभेतील पहिलेच मराठी भाषेतले भाषण केले. हे भाषण संयुक्त महाराष्ट्राच्या मागणी विषयीच होते. संपूर्ण देशात ते गाजले. महाराष्ट्रातील जनतेने या भाषणाचे मुक्त कंठाने कौतुक केले. या भाषणात क्रांतिसिंह म्हणतात, "...मराठी भाषिक लोकांच्यावर त्याचप्रमाणे गुजराथी भाषिक लोकांच्यावर सरकारने जो घोर अन्याय केला व जनतेची लोकशाही मागणी दडपून टाकण्याकरिता जी घोर दडपशाही केली, त्याचा निषेध करण्याकरिता मी बोलणार आहे.

"भाषावर प्रांत रचनेच्या प्रश्नाचा इतिहास थोडक्यात मी प्रथम देतो. काँग्रेसने १९२० सालीच भाषावर प्रांत रचनेचे तत्त्व मान्य केले. १९२४ साली बेळगावला अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष पूज्य महात्मा गांधी होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली भाषावर प्रांत रचनेचा ठराव एकमताने पास झाला.

"१९२८ साली कलकत्त्याला अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष पूज्य पंडित मोतीलाल नेहरू होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली भाषावर प्रांत रचनेचा ठराव एकमताने पास झाला. नंतर १९३५चा घटना कायदा करताना ओरिसा, सिंध व वायव्य सरहद्द प्रांत याच धोरणाने प्रांत बनवण्यात आले.

"१९४५च्या काँग्रेसच्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यातही भाषावर प्रांत रचना करू असे जनतेला आश्वासन देण्यात आले आहे. हे आश्वासन पुरे करण्यास सरकारला अवघड वाटण्याचे काहीच कारण नाही. आज भारतात भाषावर प्रांत रचनेच्या तत्त्वावर राज्यांची पुनर्घटना झालेली आहे. बंगाली भाषेचा बंगाल, हिंदी भाषेचा उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश, उरिया भाषेचा ओरिसा, आसामी

भाषेचा आसाम, तेलगू भाषेचा आंध्र, मल्याळी भाषेचा केरळ, कानडी भाषेचा कर्नाटक वगैरे भाषावर प्रांत झालेले आहेत. आता प्रश्न राहिलेला आहे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा व महागुजराथचा. त्या बाबतीत मध्यवर्ती सरकार एवढे अडून का बसले आहे, समजत नाही! माझ्या मते मराठी भाषेचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होण्याच्या बाबतीत मुंबई आड येते. याच कारण १३ डिसेंबर १९४८ रोजी दार कमिशनचे इतिवृत्त प्रसिद्ध झाले. त्याने मुंबई शहर महाराष्ट्रात समाविष्ट करू नये असा अभिप्राय व्यक्त केला. पुढे जयपूर काँग्रेसने डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पं. नेहरू, सरदार पटेल आणि त्यावेळचे काँग्रेसच अध्यक्ष डॉ. पट्टाभी सीतारामय्या या श्रेष्ठ त्रयींची जी समिती नेमली, तिने आपला 'जे. व्ही. पी. रिपोर्ट' या नावाने प्रसिद्ध असलेला निर्णय ५ एप्रिल १९४९ रोजी जाहीर केला व मुंबईशिवाय महाराष्ट्र प्रांत बनवण्यात यावा, असा अभिप्राय दिला. मुंबई महाराष्ट्रात नसती तर केव्हाच संयुक्त महाराष्ट्र व महागुजराथ झाला असता. भारतामधील सर्व भाषिकांना भाषिक राज्ये द्यावयाची आणि एकट्या मराठी भाषिकांना मात्र द्विभाषिक राज्यात दडपून टाकायचे हा कुठला न्याय?

"काँग्रेसने ३० वर्षे भाषावर प्रांत रचनेची आश्वासने दिली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देऊ, म्हणून सांगितले. आम्ही त्याची वाट पाहात राहिलो. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसने टोपी फिरविली. तीन वेळा कमिशन व समिती नेमली. शेवटी दिले मात्र काहीच नाही. भारतात सर्वांना भाषावर प्रांत दिले. मग मराठी भाषेच्या महाराष्ट्रावरच असा अन्याय कशाकरिता? महाराष्ट्राने मुंबईसह संयुक्त-महाराष्ट्र मिळावा, म्हणून लोकशाहीच्या मार्गाने व शांततेने चळवळ सुरू केली."

अत्यंत अभ्यासपूर्ण आणि बिनतोड युक्तिवादाच्या पद्धतीने अण्णांनी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न लोकसभेतील सर्व खासदारांसमोर मांडला आहे. अगदी गुजराथच्या जनतेची भाषावार स्वतंत्र प्रांताची मागणी सुरुवातीलाच मांडून आपला विचार व्यापक असल्याचे त्यांनी मुद्दाम निदर्शनाला आणले आहे. ऐतिहासिक पुरावे अत्यंत सुसंगतपणे आधाराला घेतले आहेत. पण त्याचबरोबर पुढे त्यांनी सरकारच्या अमानुष दडपशाहीवर आसुडाचे जोरदार फटकेही मारले आहेत.

ते म्हणतात, "ती चळवळ चालू असतानाच तारीख १६ जानेवारी १९५६ रोजी मुंबई केंद्रशासित केल्याची नेहरूंनी दिल्लीच्या नभोवाणीवरून घोषणा

केली. ती घोषण करण्यापूर्वी काही लोकांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली पकडून तुरुंगात घातले! (यात क्रांतिसिंहांचाही समावेश होता—लेखक). संयुक्त महाराष्ट्राची चळवळ नष्ट करण्याकरिता सरकारने हे केले. पण झाले भलतेच. त्यामुळे चळवळ अधिक फोफावली. नंतर हजारो लोकांना तुरुंगात घातले! त्यानेही सरकारचे समाधान होईना. म्हणून निरपराध जनतेवर गोळीबार केला. १७ ते २३ जानेवारी १९५६ या सात दिवसांत जे गोळीबार करण्यात आले, ते गोळीबार करण्यामागचे हेतूच अत्यंत नीच, सैतानी स्वरूपाचे होते! मराठी माणसाचा स्वाभिमान मोडून काढावा, त्यांना लाचार बनवावे, मराठी माणसांनी कोणत्याही परिस्थितीत डोके वर काढू नये, कसल्याही अन्यायाविरुद्ध साधी ओरड करण्याचेसुद्धा धैर्य त्यांच्यात राहू नये, मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून जी चळवळ चालू आहे तिचे कंबरडे मोडले पाहिजे, हे ते हेतू होते. महाराष्ट्राविषयीच्या द्वेशाने प्रेरित होऊन सूडबुद्धीने त्यांनी हे घोर अनन्वित अत्याचार केले. निरपराध जनतेवर गोळीबार करून जी माणसे मारली व जखमी केली त्या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. ही आमची तातडीची मागणी आहे!'' अत्यंत संयमाने पण तेवढ्याच सत्यशोधकी कठोरपणाने त्यांनी सरकारला उघडे पाडले आहे. धारेवर धरले आहे. या भाषणाच्या शेवटी त्यांनी केंद्र सरकारला इशारा दिला आहे. संघर्षाची घोषणा केली आहे,''...म्हणून आम्ही पुन्हा एकवार काँग्रेस सरकारकडे मागणी मागतो की आमचा आम्हाला मराठी भाषेचा मुंबई, बेळगाव, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र द्या, नाही तर इच्छा नसताना नाइलाज म्हणून आम्हाला लोकशाहीच्या मार्गाने व शांततेने लढा करावा लागेल. मुंबई-बेळगावसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा, म्हणून महाराष्ट्राने आपले रक्त सांडले आहे, आपल्या आवडत्या पुत्रांचे बलिदान केले आहे. जोपर्यंत आमच्या जीवात जीव आहे, तोपर्यंत ह्या महाद्विभाषिक राज्याला आम्ही कधीही मान्यता देणार नाही! मुंबई, बेळगाव, कारवारसह मराठी भाषेचा संयुक्त महाराष्ट्र मिळविल्याशिवाय राहणार नाही, असा आमचा निर्धार आहे.''

या भाषणात व्यक्त केलेल्या निर्धाराप्रमाणेच पुढे क्रांतिसिंहानी चळवळीत राबणूक केली. खासदार असताना पुन्हा आंदोलन केल्यामुळे सरकारने पुन्हा त्यांना जेलमध्ये डांबले. ८ डिसेंबर १९५८ रोजी शिमोगा लॉकप जेल, म्हैसूर राज्य इथून त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात, ''...आपले सर्वांचे आशीर्वादिवरून शिमोगा लॉकप जेलमध्ये सुखरूप आहे. तरी काही काळजी नसावी. तारीख १ नोव्हेंबर १९५८ रोजी आम्ही १२

सत्याग्रहींनी कारवार येथे सत्याग्रह केला. आमची तारीख ४ नोव्हेंबर १९५८ रोजी केस चालून आम्हा प्रत्येकास दोन महिने सात दिवसांची साधी सजा झाली. सुरुवातीस कारवार जेलमध्ये ठेवण्यात आले. पुढे कारवार जेलमध्ये पुष्कळ सत्याग्रही आल्यामुळे त्यापैकी ५० सत्याग्रहींची एक तुकडी वेल्हारी जेलमध्ये हालवण्यात आली. नंतर थोड्याच दिवसांनी आमची १० सत्याग्रहींची एक तुकडी काढली... येथे कानडी भाषा चालते. जेलचे अधिकारी इंग्रजीतून व कानडीतून बोलतात व जेलमार्फत इंग्रजी व कानडी पेपर मिळतो. त्यामुळे सीमासत्याग्रहासंबंधाने काहीच समजत नाही...'' अण्णांचे जेलमध्ये जाणे म्हणजे वारकऱ्याने नियमाने पंढरीच्या वाऱ्या करण्यासारखेच होते. फक्त अण्णांचा विठ्ठल राबणाऱ्या माणसांमध्ये होता. त्यामुळे त्या 'विठ्ठलाच्या' मुक्तीसाठी प्रत्येक टप्प्याला ते लढत होते. त्यासाठीच वारंवार तुरुंगात जात होते. कोणतेही कष्ट सोसायला मागेपुढे पाहात नव्हते.

क्रांतिसिंहांच्या आणि त्यांच्या अन्य सहकारी पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली मराठी जनतेने जी अभूर्तपूर्व चळवळ केली, बलिदान दिले त्याचा परिणाम राज्यकर्त्यांवर होणे अपरिहार्य होते. जनतेने काँग्रेसला पूर्ण नाकारून १९५७ साली केलेल्या मतदानामुळे सत्तेच्या खुर्चीलाच धक्का बसला. संसदीय लढाई जिंकल्यावरसुद्धा निवडून आलेले पुढारी आणि जनता लढतच राहिली. सत्तेच्या मुळांवर घाव घालत राहिली. त्यामुळे अपुरा का होईना पण मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र देण्याचे केंद्र सरकारला मान्य करावे लागले. माणसे गोळ्या घालून मारणाऱ्या मोरारजी देसाईंचा आणि पाच काय हजार वर्षेसुद्धा महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही म्हणणाऱ्या सदोबा पाटील यांच्यासारख्या प्रवृत्तींचा पराभव झाला. जनता जीवावर उदार होऊन संयुक्त महाराष्ट्राची लढाई लढत असताना ज्या मराठी राजकारण्यांनी महाद्विभाषिकाची सत्ता भोगली त्यांचाही पराभव झाला. जनतेने पूर्ण नाही तरी मोठा ऐतिहासिक विजय मिळवला.

१ मे १९६० रोजी बेळगाव, कारवार, डांग, उंबरगाव, भालकी, संतपूर वगळून संयुक्त महाराष्ट्र केल्याची औपचारिक घोषणा झाली. लढ्याचा एक मोठा टप्पा गाठला गेला. या पाठोपाठ क्रांतिसिंहांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होण्याच्या प्रसंगी त्यांचा भव्य सत्कार मुंबई येथे झाला. त्या वेळी सत्काराला उत्तर म्हणून केलेल्या भाषणात अण्णांनी त्यांच्या मनात असलेला लढ्याचा पुढचा टप्पा मांडला. ३ ऑगस्ट १९६० चे हे भाषण ४ ऑगस्ट १९६०च्या दैनिक 'मराठा'मध्ये आले. क्रांतिसिंह म्हणतात, "अजून संयुक्त महाराष्ट्राची पुरती 'मळणी' झाली नाही. मुंबई ही 'पहिली रास' मिळाली. अजून बेळगाव,

कारवार, डांग, उंबरगाव, गोवा ही 'रास' राहिली आहे. अजून लई दाणे मागे उरले हायती. ते झोडपून काढल्याबिगर हा 'तिवडा' उचकटायचा न्हाई. माझा सारा जल्म शेतकऱ्यांत गेला आहे. त्या शेतकऱ्यांना आज काँग्रेसच्या राज्यात जगणे कठीण झाले आहे. आता मला साठ वर्षे पुरी झाली आहेत. म्हंजे मी पेनशनीत निघायला हवे, पण अजून भरपूर ताकद आहे. मी रान उठवणारा गडी आहे. तुम्ही माळ्यावर रायफली घेऊन बसा. तुमच्यासमोर जनावरांचे फरे पिटाळून आणतो. मग मारा एकेकाला गोळ्या. समाजवादी महाराष्ट्र होईपर्यंत' आपला हा लढा थांबत नाही. मी कम्युनिस्ट पक्षाचा आहे म्हणूनच काहीजण टीका करतात. पण लक्षात ठेवा, मी कम्युनिस्ट म्हणूनच जगेन आणि कम्युनिस्ट म्हणूनच मरेन! पण त्याचा अर्थ हा की मी जनतेचा आहे. गरिबांचे संसार सुखाचे झालेले डोळ्यांनी बघावेत एवढीच माझी इच्छा! नवबौद्धांवर अन्याय होता कामा नये! माझा सत्कार हा माझा सत्कार नाही. सातारा जिल्ह्याची सारी शक्ती माझ्या मागे उभी आहे. म्हणून मी हा सातारा जिल्ह्याचा सत्कार समजतो.''

अत्यंत थोडक्या शब्दातसुद्धा त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा पुढचा टप्पा नेमक्या पद्धतीने जनतेसमोर मांडला. हा टप्पा मांडत असताना त्यांच्यातला सत्यशोधक जागा होता. म्हणूनच जातीयवादाला विरोध करण्याचा मुद्दा त्यांनी आवर्जून आपल्या भाषणात मांडला. नुकत्याच झालेल्या आणि त्या पाठोपाठ भागाभागांत होणाऱ्या धर्मांतराच्या पार्श्वभूमीवर या मुद्द्याला फारच मोठा अर्थ होता. जातीयव्यवस्थेच्या अंताची गरज त्यांना आतून वाटत होती. त्याचेही हे निदर्शक होते. त्याचबरोबर थोड्याच काळात ते जो भूमिहीनांचा लढा आयु. दादासाहेब गायकवाडांच्या सहनेतृत्वात लढणार होते त्याची ही जणू नांदीच होती.

●

# भूमिहीनांचा लढा, दुसऱ्यांदा लोकसभेत आणि निर्वाण

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात क्रांतिसिंहांचे शेडुल्ड कास्ट फेडरेशनशी जास्त जवळचे संबंध आले. हाडाचे सत्यशोधक असलेल्या अण्णांची दोस्ती शे. का. फेडरेशनचे नेते आयु. दादासाहेब गायकवाड यांच्याबरोबर जुळली. यातूनच महाराष्ट्राच्या इतिहासात १५ ऑगस्ट १९४७ पासून पुढच्या काळात दलित आणि सवर्ण भूमिहीनांच्या एकजुटीच्या पायावर झालेल्या अभूतपूर्व लढ्यात क्रांतिसिंहांचा पुढाकाराने सहभाग राहिला. अशा प्रकारचा आणि एवढा मोठा लढा महाराष्ट्रात अजूनही झालेला नाही. रिपब्लिकन पक्ष आणि किसान सभेच्या संयुक्त पुढाकाराने या लढ्याची आखणी झाली होती. आयु. दादासाहेब गायकवाड आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली हा लढा सुरू झाला.

क्रांतिसिंहांनी पुन्हा एकदा आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या भाषणांनी महाराष्ट्रभर रान उठवायला सुरुवात केली. ज्या जमिनींवर सत्याग्रह करून जमीन बळकाव मोहीम करायची त्या सर्व जमिनी ब्राह्मण किंवा मराठा-कुणबी जमीनदारांच्या किंवा मोठ्या शेतमालकांच्या होत्या. अशा परिस्थितीत प्रत्यक्ष जमीन ताब्यात घेऊन कसण्यापर्यंत जाणे तर दूरच पण त्या सत्याग्रही म्हणून ताब्यात घेऊन अटक होण्यापर्यंत जाणेसुद्धा जातीयवादी स्वरूपाचा हल्ला ओढवून घेणेच होते. जरी सवर्ण-दलितांची ही संयुक्त चळवळ असणार होती तरी सवर्ण मराठा-कुणबी शेतकरी; माळी, धनगर शेतकरी आणि सवर्ण बलुतेदार यांचा सहभाग मिळवणे सोपे नव्हते. गावागावांतल्याच प्रस्थापित ब्राह्मण किंवा मराठा शेतमालकाच्या, जमीनदाराच्या शेतावर ते 'ताब्यात घेणार' म्हणून जाणे या विभागांना सोपे नव्हते. दलितांना तर ते त्यापेक्षाही अवघड होते. त्यांच्यावर जीवघेणे हल्लेच होण्याची भीती होती.

अशा परिस्थितीत गावागावांतल्या गरीब शेतकरी, बलुतेदार जनतेला लढ्यात मोठ्या प्रमाणात सामील करून घेण्याची अवघड कामगिरी क्रांतिसिंह नाना

पाटलांनी केली. त्यामुळे दलित समाजाला निर्धास्त होऊन या लढ्यात मोठ्या संख्येने उतरण्याची वाट मोकळी झाली. तसे वातावरण तयार झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्याच निर्णयाप्रमाणे शे. का. फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भाग घेतला. जातींचे भेद ओलांडून राखीव जागांबरोबरच सर्वसाधारण खुल्या जागांवर दलित उमेदवार चांगल्या प्रकारे विजयी झाले. याच वातावरणाची वाट चोखाळत दलित-सवर्ण कष्टकरी जनतेच्या एकजुटीची चळवळ पुढच्या टप्प्यावर गेली. बाबासाहेबांच्या अपेक्षेप्रमाणे स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयु. दादासाहेब गायकवाडांनीही एक मोठी झेप घेतली. समाजपरिवर्तनाचा लढा जमिनीसारख्या पायाभूत उत्पादनाच्या साधनांवर हक्क सांगण्याकडे वळवला. सत्यशोधकी परंपरेतून प्रतिसरकार आणि मग कम्युनिस्ट पक्ष अशी वाटचाल केलेल्या क्रांतिसिंहांना यात झोकून द्यावेसे वाटले यात नवल नाही. क्रांतिसिंहांच्या या झोकून देण्यामुळे या लढ्याच्या यशाची खात्रीच निर्माण झाली. कॉ. प्रभाकर वैद्य याविषयी म्हणतात, "संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्पष्ट आदेशानुसार नवबौद्ध समाज आणि रिपब्लिकन पक्ष समितीत सामील झाला; लवकरच मराठी समाजाच्या एकजुटीचा तो खंबीर आधारस्तंभ बनला. या लढ्याच्या क्रमात खुद्द बौद्धजनांच्या आणि इतर मराठी जनतेच्या जाणिवेत व परस्परसंबंधात मूलगामी बदल होत गेले. या बदलांचे वास्तव व स्थायिस्वरूप नाना पाटलांना अत्यंत उत्कटतेने जाणवले होते. परिणामी बौद्ध जनतेचे मन ते फार आत्मीयतेने ओळखू शकले. गाढ सहानुभूतीने ते त्यांच्याशी समरस होऊ शकले. नवबौद्ध समाज व इतर श्रमिक मराठी जनता यांच्यामधील परस्पर सहकार्यात व एकजुटीतच महाराष्ट्राच्या भवितव्याची गुरुकिल्ली आहे, याची जाणीव त्यांना झाली. दिल्लीला लोकसभेच्या निमित्ताने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचा निकट सहवास नाना पाटलांना लाभल्याने या दोन थोर नेत्यांमध्ये अत्यंत विश्वासाचे व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. भूमिहीनांच्या लढ्याच्या निमित्ताने आणि नंतरही या दोघानी महाराष्ट्रभर अनेक जिल्ह्यांत संयुक्त दौरे काढले. नाशिकला किसान सभेच्या निमित्ताने किसानलढ्यांचा, वर्गसंघटनांचा विचार त्यांनी केला. या सर्वातून महाराष्ट्रात एक महान शक्ती अवतरत होती."

पण पुढच्या काळात प्रत्यक्षात तसे घडले नाही. रिपब्लिकन पक्षातील अन्य पुढारीपणाने कर्मवीर दादासाहेब गायकवाडांवर टीका करायला सुरुवात केली. बाबासाहेबांची धोरणे बदलत असल्याचा आणि कम्युनिस्ट धार्जिणेपणाचा आरोप

त्यांच्यावर केला. या सर्व गदारोळातून पुढे वेगळीच दिशा लागली आणि काँग्रेसच्या चतुर पुढारीपणाने या परिस्थितीचा पुरेपूर फायदा उठवला. दुसऱ्या बाजूला भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पुढारीपणाने या प्रक्रियेला दुर्लक्षित केले. तिचे ऐतिहासिक महत्त्व ओळखले नाही. कारण जातिव्यवस्थेचा अंत करण्याचा संघर्ष त्यांच्या पायाभूत धोरणाचा भाग नव्हता. जातिव्यवस्था त्यांच्या दृष्टीने फक्त एक सांस्कृतिक इमल्यातले वास्तव होते. त्यामुळे त्यांना फक्त वर्गलढाच समजत होता. वर्गलढ्यात जातिव्यवस्थेचा शेवट करणारी प्रक्रिया सुरू करण्याचे महत्त्व क्रांतिसिंहांप्रमाणे त्यांच्या पक्षाला दिसत नव्हते. या दुसऱ्या टोकाच्या भूमिकेचाही विपरित परिणाम झाला. भारताच्या इतिहासाला वळण देऊ शकणारा हा भूमिहीनांचा आगळा लढा त्या काळापुरताच राहिला. तो विकसित झाला नाही.

क्रांतिसिंहांच्या आयुष्यात मात्र त्यांना कारकिर्दीच्या शिखरावर नेणारा हा लढा होता. त्यांच्या सत्यशोधक जाणिवा आणि कम्युनिस्ट जाणिवा यांचे क्रांतिकारक मिश्रण या लढ्याच्या निमित्ताने अण्णांच्या धोरणात विकसित होत होते. म्हणूनच त्यांनी या लढ्यात जीव ओतला. संयुक्त महाराष्ट्राच्या उधाणानंतर समाजवादी आणि जातिविहीन समाज आणण्याच्या ध्येयाने त्यांनी मराठी समाजची मानसिकता पुन्हा एकदा कसदार केली. पुन्हा एकदा पायाला भिंगरी लावून महाराष्ट्रात झंझावती दौरे केले. पुन्हा जेलच्या वाऱ्या केल्या!

२ ऑक्टोबर १९६४ रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाडांची रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली १९६३ पासून पक्षाने भूमिहीनांना जमीन मिळण्याचा संघर्ष चालवला होता. ६ डिसेंबर १९६४ पासून या लढ्याला धार आणण्याचा निर्णय झाला. सत्याग्रहाची सुरुवात झाली. हा सत्याग्रह सलगपणे ६० दिवस चालला. ३ फेब्रुवारी १९६५ पर्यंत तो चालू राहिला. दोन लाखांच्यावर सत्याग्रहींनी यात भाग घेतला. या सत्याग्रहात दलित जनतेबरोबर दलितेतर जनतेनेही सत्याग्रहात भाग घेतला. यामुळेच भूमिहीनांना गायरान आणि पडीक जमिनीतली जमीन देण्याचे काही निर्णय घेणे महाराष्ट्र सरकारला भाग पडले.

१९६५ साली भारतीय अर्थव्यवस्था अरिष्टात जायला सुरुवात झाली होती. महागाई आणि टंचाईने जनता बेजार व्हायला सुरुवात झाली होती. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्षासह सर्व डाव्या पक्षांनी महागाईविरोधी चळवळ सुरू केली. क्रांतिसिंहांनी या चळवळीतही पुढाकाराने सहभाग घेतला.

पुन्हा महाराष्ट्रातील जनतेला जागे केले. या लढ्यातील सहभागामुळे त्यांना एरवडा जेलमध्ये स्थानबद्ध करण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यापासून ते भूमिहीनांच्या सत्याग्रहातील सहभागापर्यंत आणि महागाईविरोधी आंदोलनापर्यंत क्रांतिसिंह नाना पाटील महाराष्ट्राच्या गावोगावच्या जनतेच्या गळ्यातले ताईत बनले होते. ते आता फक्त सातारा जिल्ह्याचे राहिलेलेच नव्हते. उत्तर सातारा जिल्हा लोकलबोर्डाने त्यांना १९५८ साली अर्पण केलेल्या मानपत्रात म्हटले आहे, "...१९५७च्या सार्वत्रिक निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला विजयी करण्यात आपण अविरत परिश्रम घेतलेत. उत्तर सातारा पार्लमेंट मतदारसंघातून १ लक्ष २७ हजार मते देऊन जनतेने आपणास सहर्ष विजयी केले. लोकसभेत प्रथमच संतज्ञानेश्वर व तुकारामाच्या मराठी मायबोलीत संयुक्त महाराष्ट्राचा आवाज उठविण्याचा पहिला मान आपण मिळविलात. आपल्या प्रचारामुळेच मराठ्यातील निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समिती विजयी झाली व आपल्या वाणीने शेतकरी जागा व संघटित झाला आहे..." १९५८ पेक्षा १९६७ साली क्रांतिसिंहांची झेप आणखीनच पुढे गेली होती. यामुळेच १९६७ साली पक्षाने आणि समितीने त्यांना बीड मतदारसंघातून लोकसभेसाठी उभे केले. या निवडणुकीत ते विजयी झाले आणि पुन्हा एकदा खासदार झाले.

१९६८ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाने 'अखिल भारतीय शेतमजूर युनियन'ची स्थापना केली. या संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली. सातारचा हा सिंह किसान सभेचा अध्यक्ष होण्यातून भारतीय पातळीवरचा नेता बनला होताच. दुसऱ्यांदा खासदार होण्याआधी भूमिहीनांच्या सत्याग्रह लढ्यात जीव ओतून काम करणारा हा सिंहच शेतमजुरांच्या पहिल्या 'अखिल भारतीय संघटने'चा पहिला अध्यक्ष बनणे हे ओघानेच आले होते. तळागाळांतल्या जनतेबरोबर राहून क्रांतिकारक दृष्टेपणाने चळवळी उभारणारे नाना पाटील एक सत्यशोधक आणि कम्युनिस्ट म्हणून या सन्मानाला योग्य असेच होते. त्यांचा तो ऐतिहासिक अधिकार होता.

क्रांतिसिंह वयाने थकत चालले होते. पण त्यांचे काम अविरत चालू होते. कोणत्याही प्रकारे आराम देणाऱ्या साधनांशिवाय त्यांची भ्रमंती जनतेच्या साधनांमधून चालू होती. जग बदलत चालले होते. भारतीय राजकारणात मोठ्या प्रमाणात उलथापालथी होत होत्या. १९६२च्या भारत-चीन युद्धानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षात फूट पडून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तयार झाला होता.

क्रांतिसिंह भारतीय कम्युनिस्ट पक्षातच राहिले होते. कम्युनिस्ट असलेल्या चीनने भारतावर युद्ध लादणे ही गोष्ट त्यांना पटली नव्हती. चिनी आक्रमणाचा धिक्कार करण्याची भूमिका कॉ. डांगे आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी घेतली. या भूमिकेच्या समर्थनात क्रांतिसिंह ठामपणे उभे राहिले. या काळात पक्षाची एकजूट टिकवण्यात त्यांचा वाटा महाराष्ट्रापुरता तरी फारच महत्त्वाचा होता. संयुक्त महाराष्ट्र समितीची एकजूट टिकवण्यातही त्यांचा या काळात मोठा वाट होता.

नाना पाटील १९६७ साली दुसऱ्यांदा लोकसभेत गेले आणि पुन्हा एकदा कम्युनिस्ट फळीत फूट पडली. प. बंगालमध्ये नक्षलबारीला मजूर-शेतकऱ्यांचा उठाव झाला. ताबडतोबीने सशस्त्र संघर्ष करण्याचा विचार आणि व्यवहार सुरू करणारी 'नक्षलवादी' म्हणून ओळखली जाणारी नवी कम्युनिस्ट फळी उदयाला आली. समाजवादी समाजाचा पाया म्हणून ज्या सोविएत युनियनला क्रांतिसिंहांच्या नेतृत्त्वाखाली शिष्टमंडळ भेट घ्यायला गेले त्या सोविएत युनियनला हा मार्क्सवादी-लेनिनवादी कम्युनिस्ट प्रवाह 'सामाजिक साम्राज्यवादी' म्हणून संबोधू लागला. १९६७ रोजीच अनेक राज्यांमध्ये काँग्रेसची सरकारे गडगडली आणि आघाडीची सरकारे आली. भारतीय अर्थव्यवस्थेचे अरिष्ट याच काळात आणखी तीव्र झाले. महागाई, टंचाई, बेरोजगारी वाढू लागली. १९७१ साली या सर्व अरिष्टाच्या आणि असंतोषाच्या पार्श्वभूमीवर बँका, खाणी आणि तेल उद्योग यांचे राष्ट्रीयकरण केले. काँग्रेसने समाजवादी चेहरा दाखवण्याचा प्रयत्न केला. तरीही परिस्थिती दिवसेंदिवस चिघळतच गेली. १९७१-७२ साली महाराष्ट्रात सार्वत्रिक महादुष्काळ पडला. १९७३ पर्यंत तो चालूच राहिला. देशभर नवी नवी आंदोलने चालू राहिली. महाराष्ट्रात १९७३-७४ साली आंदोलने सर्वात जास्त प्रमाणात वाढली. दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त आणि कामगार-कर्मचारी यांच्या आंदोलनांची एकजूट पुढे येऊ लागली. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्त्वाखाली तरुणांचे वादळी आंदोलन बिहार-गुजरातमध्ये उभे राहिले. याचे परिणाम सत्ताधारी काँग्रेसचे आसन डळमळीत होण्यात झाले. प्रतिगामी शक्ती वाढत आहेत आणि गरिबांचे हितसंबंध सांभाळायचे आहेत या नावाखाली त्या काळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. लोकशाही हक्कांची गळचेपी सुरू झाली. निवडणुका बेमुदत पुढे ढकलून काँग्रेसची सत्ता कायम ठेवली गेली. कामगारांचे लढे चिरडले गेले. १९७५ पासून पुढे १९७६-७७ पर्यंत ही आणीबाणी चालू राहिली.

१९७२ साली मधुमेहाच्या आजारात क्रांतिसिंहांच्या पायाला जखम झाली आणि ती बरी होईना. आजार वाढला आणि शेवटी गँग्रीन झाल्यामुळे डॉक्टरांना

त्यांचा पाय पिंढरीपासून काढावा लागला. वृद्धापकाळात ते आणखीनच अधू झाले. ते बराच काळ पंढपूर येथील, पुरोगामी मंडळींना मदत करणाऱ्या, बाबाजींकडे राहायला लागले. त्यांच्या चळवळीतल्या इतिहासाला आणि त्यांच्या वृत्तीला ते फारसे मानवणारे होते असे नाही. पण शेवटी मार्ग निघाला. त्यांचे १९४०-४२ पासूनचे अव्वल शिष्य आणि १९३० साली प्राथमिक शाळेत असल्यापासून ज्यांच्यावर त्यांचा प्रभाव होता त्या क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या व्यवस्थेत ते वाळवे येथे राहायला आले. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना निघण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना आणि संघर्षाला सुरुवात होताना क्रांतिसिंह मार्गदर्शन करायला होतेच. त्यांना भविष्याचा वेध घेण्याची कुवत होती. त्यातून त्यांनी स्वत:ची क्रांतिकारी परंपरा वाळव्याच्या जनतेला, नागनाथ नायकवडींसारख्या त्यांच्या शिष्याला दिली.

याच काळात त्यांचे मोराळे ता. तासगाव, जि. सांगली येथे २१ सप्टेंबर १९७६ रोजी प्रदीर्घ भाषण झाले. ते त्यांचे टेपरेकॉर्ड झालेले एकमेव उपलब्ध भाषण आहे. शरीर विकलांग झालेले असतानाही नेहमीच्या खणखणीत शैलीत हे भाषण झाले आहे. शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण त्या वेळी अण्णांच्या हस्ते झाले. अध्यक्ष वसंतदादा पाटील होते. मृत्यूपूर्वी अडीच महिने झालेले हे भाषण त्यांचे शेवटचेच प्रदीर्घ भाषण आहे. या काळात क्रांतिसिंहांच्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आणीबाणीला पाठिंबा दिला होता. पण अण्णांना असा पाठिंबा देणं मान्य नव्हतं. ते आपल्या भाषणात म्हणतात, "आता आणीबाणी हाय! दुकानदार पाट्या लावत्याती पाट्या! सरकारनं हुकूम सोडलाय, 'प्रत्येक जिनसाचा दर लावला पाहिजे.' ही दर लावत्याती. पाटी तिथं ठेवत्याती. पण त्या दरात इकीत न्हायती. अडीच रुपयाचा दर लावायचा पाटीवर, इकताना तीन रुपये दर! कुणी इच्चारलं, 'अवो अडीच रुपयं पाटीवर अन् तुमी तीन कसं घेता?' तर त्यो म्हणतो, 'तुला घ्यायचं आसंल तर घे, न्हाय तर जा निघुनश्यांनी!' अरं, जा निघूनश्यांनी? म्हंजे काय आमी कुटनं परगावाचं आलुया काय? (हशा).

"आता दसरा जवळ आलाय. माणसांना त्याल पाहिजे. तर त्याल झालं गडप! आता त्याल कुटनं काढायचं सांगा! आमाला सांगत्याती, अवंदा श्यांग पिकली न्हाय! अन् त्याल लांबनं येतंय लांबनं! (हशा). लांबनं म्हंजे कुटनं? लांबनं म्हणजे गावंदरीतनं? (हशा) का लांबनं म्हंजे नळाखालनं? कुटनं येतंय ते सांगा ना! काय चाललंय हे? चेष्टा चालली आहे ही! म्हणून मला आपणाला सांगायचंय की सरकारनं जर याचा विचार केला नाही, तर मग नाइलाजानं

तुमच्या मागं आम्हाला लागावं लागेल. नाही तर काय करायचे? ते नको असेल तर हे करून टाका.

"आता आम्हाला सांगत्याती, सरकारने एक पत्रक काढलंय. त्याच्यात सांगितलंय, 'दर उतरलं पायजेती.' असं दर उतरल्यात काय? तुमच्या लिखाणानं? हे दर तसं उतरणार नाहीत... आता लोक सांगत्यात, 'कमी दर केल्याती. बेतानं बोला.' अरं कमी म्हणजे किती? बारा रुपयाचं नऊ रुपयं केल्याती. अरं, पण माल घेता कसा? साडेतीन रुपयानं! इकतात कसं? नऊ रुपयानं! ही दर कमी केलीती काय? आणि प्रत्यक्षात आता त्यो दर तेरा-चौदा रुपयापर्यंत जाईल. आणि गंमत बघा! पुना त्येला वळ लावायची! वळ लावायची! कां? आणीबाणी हाय! आणीबाणी हाय! वळीशिवाय चालायचं न्हाय. अरं, तुमाला वळ लागली का?... आणि पुना एकच किलो! एकच किलो! का? जास्ती का न्हाय? का आग लागली का त्येला? (आवाज चढवून) अरं, खाऊं दे की आमाला. अरं, आमच्या स्वराज्यात तरी खाऊ द्या! तुम्ही परक्या राज्यात आम्हाला खाऊ दिलं नाही. स्वराज्यात तरी खाऊ द्या! पण हे तसे देणारे नाहीत..."

हे सर्व बोलत असताना त्यांना आपल्या विकलांगतेची, सक्रिय चळवळीतून गेली काही वर्षं बाजूला झाल्याची जाणीव होतीच. तरीही त्यांचा मूळ पीळ कायमच होता. लढाऊवृत्ती ताजीच होती. ते म्हणतात, "बांधवांनो! आपणही खंबीरपणे उभं राहिलं पाहिजे. आता तुम्हाला सांगतो, कुठला परमेश्वर खाली येऊन शेतकऱ्यांचे कल्याण करील हे विसरून जावा... तुम्ही जरा खंबीरपणं उभा राहिलं पाहिजे.

"मी आता जवळ जवळ सहा सर्वांनी भाषण करायला लागलोय. मी बंद केलंतं सगळं!... आणीबाणी हाय! आणीबाणी हाय! म्हटलं नको ही खटपट. दीड पायानं जाऊनश्यांनी हे आणीबाणीचं जमायचं न्हाय. (हशा). आपलं गप बसूया. पण काय, लोकांनी सांगितलं, बोला की आता! आता आणीबाणी काय करतीया? काय झालं तर झालं. न्हायतर राहिलं! तवा इच्चार केला, दादा आपलं अध्यक्ष हायती. आपल्या दादाच्या अध्यक्षतेखालीच सुरू करावं! (वसंतदादा पाटील हे कॉंग्रेसचे नेते सभेचे अध्यक्ष होते—ले.) काय सरकारला सवय लागली तर लागली! (हशा). म्हणून हे सुरू केलं."

नाना पाटील विकलांग झालेले असताना, एक पाय कापून टाकावा लागल्यानंतर, मृत्यूच्या उंबरठ्यावर, मृत्यूच्या आधी फक्त अडीच महिनेसुद्धा

आपला क्रांतिकारक बाणा कायम ठेवून बोलत होते. शासनाच्या आणीबाणीला न भिता उघड टीका करीत होते. शड्डू ठोकूनच आव्हान देत होते. म्हणूनच ते क्रांतिसिंह होते. त्यांची जिद्द मरेपर्यंत संपणारी नव्हती. त्यांची क्रांतिकारक भूमिका मरेपर्यंत पातळ होणार नव्हती. मोराळे येथील भाषणात शेवटी ते म्हणतात, "मी आता बराचसा मोकळा झालोय. आणखी बरं वाटलं तर आणखी अधिक सभा घेईन... आणि हे आता कसं झालंय... बैलाच्या मानंवर क्यास असत्याती तंवर शिवाळ जाचती! पण एकदा घट्टा पडला की, बेलाशीक का डोळं झाकून औत हाणावं! (हशा). असं हाय माझं काम!

"असो. जास्ती वेळ न घेता आता बोलावं बाकीच्यांनी. अध्यक्षांनी त्यांना बोलायला सांगावं... आन् मोराळकरांना ज्या ज्या येळंला तल्लफ हुईल त्या येळंला ह्या नाना पाटलाला बोलवा, हा गडी हज्जर न्हाय राहिला तर मला इच्चारा! (टाळ्या). हेच काम हाय माझं! हेच काम माझं! हेच काम करीत आलोय... (टाळ्या)."

अण्णांच्या या भाषणानंतर दुसरे कुणी बोलण्याचा प्रश्नच नव्हता. अध्यक्ष असलेले वसंतदादा बोलले असतील तेवढेच. या प्रदीर्घ भाषणात अण्णांनी सामाजिक वास्तवाच्या सर्व विदारक अंगांना स्पर्श केला आहे. लोकांना हसवत हसवत त्यांच्याच दु:खांची आणि दु:खांना संपवण्याच्या उपायांची जाणीव दिली आहे. आणि या शेवटच्या भागात जनतेच्या आदेशाने, जनतेच्या कामात, जनतेत सततपणे राहणं, प्रबोधन करणं, लोकांची उठावणी करणं हेच काम आयुष्यभर करीत आल्याचा दाखला दिला आहे. पुढे करीतच राहण्याचे अभिवचन वयाच्या ७६ व्या वर्षी शरीराने विकलांग झाल्यावरही दिले आहे.

क्रांतिसिंहांनी हे अभिवचन तंतोतंत पाळले. शेवटच्या घटका जवळ आल्या असताना ते २३ नोव्हेंबर १९७६ रोजी विटा येथे त्यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याला गेले. भाषणाला उभे राहिले. एकाच घणाघाती वाक्यात आणीबाणीवर टीका करणारं बरंच काही सांगून गेले. आणि कोसळले. ते पुन्हा परतलेच नाहीत. त्यांचे निर्वाण त्याच बेशुद्ध अवस्थेत झाले. कॉ. दत्ता देशमुख या प्रसंगाबाबत लिहितात, "नाना पाटील बोलावयास उठले. नेहमीच्या पद्धतीने नाना पाटलांनी जनतेला आवाहनात्मक प्रणाम केला. व "कान असून ऐकायचे नाही, डोळे असून पाहावयाचे नाही आणि तोंड असून बोलायचे नाही" हे वाक्य तीन वेळा घोळले. भाषणाची गाडी पुढे जाऊ शकली नाही. हे जे वाक्य त्यांच्या तोंडात घोळत राहिले होते त्यातून त्यांच्या मनातील जिवंत कल्लोळ व्यक्त होत होता. केवळ स्वत:च्या इच्छाशक्तीच्या जोरावर ते सभेला

आले होते. निसर्गाचे आक्रमण जोरात सुरू होते आणि माझ्या मनात पाल चुकचुकली...''

कॉ. दत्ता देशमुख पुढे म्हणतात, ''नाना पाटील गेले आणि एक विचार मनाला चटका लावून गेला की इतिहास एका प्रचंड सामर्थ्याचा पुरेपूर उपयोग करू शकला नाही.'' कॉ. दत्ता देशमुखही आज आपल्यात नाहीत. मार्क्सवादी-लेनिनवादी विचारप्रणालीला वाहून घेतलेल्या आणि अनेक महत्त्वाच्या लढ्यांमधे महाराष्ट्राच्या प्रमुख पुढाऱ्यांपैकी एक अशा दत्तांनी क्रांतिसिंहांविषयी जे म्हटले आहे ते फारच सार्थ आहे. मराठी कष्टकरी जनतेने स्वत:च्या मुक्तीसाठी क्रांतिसिंहांच्या सामर्थ्याच्या पुरेपूर उपयोग करून घ्यायला पाहिजे होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण सामर्थ्य ओळखायला पाहिजे होते. खुद्द क्रांतिसिंह अण्णांनी स्वत:ला जनतेला आणि पक्षाला समर्पित केले होते. जनतेच्या क्रांतीची शिवाळ खांद्यावर घेऊन चळवळीचा नांगर ओढायला त्यांनी आपली ताकद पूर्णपणे दिली होती. पण जनताच कमी पडली, पक्षच कमी पडला. क्रांतिसिंह शेवटपर्यंत सर्वांना पुरून उरले.

अखेरच्या काळात क्रांतिसिंह वाळवे येथे क्रांतिवीर नागनाथ नायकवडी या आपल्या शिष्याच्या सहवासात विसावले होते. २५ फेब्रुवारी १९७१ रोजी हुतात्मा किसन अहिर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण झाले त्या वेळी क्रांतिसिंहांनी अध्यक्षस्थान भूषवले होते. त्याचवेळी वाळवे येथील चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या वतीने नागनाथ नायकवडी यांनी त्यांना वाळवे येथेच मुक्काम करण्याचे आवाहन केले होते. पण त्या वेळी नाना पाटील थांबले नाहीत. ते पंढरपूरला बाबाजींच्या जवळ उपचारासाठी थांबले होते तिकडेच गेले. पण वाळव्याच्या जनतेने त्यांच्यावरच्या प्रेमाचा वर्षाव पंढपूरला भेटी देऊन वरवचेवर केलाच. त्यांच्या आवडीच्या गोष्टी ते सतत घेऊन जात असत. हुरड्याला आलेल्या गव्हाच्या लोंब्या, शाळवाची कणसे, मक्याची कणसे, हरभऱ्याच्या पाल्याची भाजी करण्यासाठी खुडा अशा भेटी चालू राहिल्या. मग क्रांतिसिंह वाळवे येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या तालमीच्या इमारतीत स्वतंत्र खोलीत राहावयास आले. मधून मधून ते पंढरपूरला जात असत. पण आता त्यांचा जीव हुतात्म्यांच्या भूमीत आणि प्रतिसरकारच्या व वर्तमानकाळातही क्रांतिकारक परिवर्तनाचा ध्यास घेणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अड्ड्यात रमू लागला होता. वाळव्यातल्या प्रसिद्ध साराबंदीच्या चळवळीला भर आणीबाणीतसुद्धा त्यांनी आशीर्वाद दिले. प्रोत्साहन दिले. राबणाऱ्या जनतेच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची लढाई पुन्हा उमेदीने जिवंत होताना त्यांनी

समाधानाचे चार शब्द इथेच काढले. शड्डू ठोकल्याशिवाय भाषण सुरू न करणारे क्रांतिसिंह, हुतात्मा होण्यासाठी पेटलेल्या मनांना घडवणारे क्रांतिसिंह नव्या सामाजिक क्रांतीच्या 'पैलवानांना' घडवण्याच्या तालमीजवळ आणि हुतात्म्यांच्या मनीषा पूर्ण करण्याऱ्या जिगरबाज कार्यकर्त्यांच्या पाठीवर थाप मारण्यासाठी वाळवे येथेच रमले. वाळव्याने त्यांचे वारसदार होणे त्यांना सर्वार्थाने योग्य वाटले.

१९७२ साली क्रांतिसिंहांच्या अंगठ्याला साधीच जखम झाली. जखम मधुमेहामुळे बरीच होईना. गँग्रीन झाले. आणि पाय कापून टाकण्याशिवाय डॉक्टरांसमोर पर्याय उरला नाही. क्रांतिसिंह विकलांग झाले. वाळव्याने त्यांची सेवा केली. त्यांना 'घर'पणाचा सहवास दिला. क्रांतिकारी फकीर नाइलाजाने ठाणबंद झाला. पण संधी मिळताच मोराळ्याच्या सभेमध्ये शड्डू देऊन या फकिराने सत्तेला, आणीबाणीला, भांडवलशाहीला आव्हान दिले. शरीराने साथ दिली असती तर त्यांनी जसे ब्रिटिश सत्तेच्या काळात प्रतिसरकारचे नेतृत्व केले तसेच नवे प्रतिसरकार केवळ सातारा जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रभर आणीबाणीविरुद्ध उभे केले असते. याही प्रतिसरकारचा पराभव आणीबाणीच्या अखेरीपर्यंत केंद्रसरकारला करता आला नसता. पण महाराष्ट्राची जनता ते अक्रीत, ती अपूर्वाई अनुभवू शकली नाही. त्याआधीच मिरजेच्या मिशन हॉस्पिटमध्ये क्रांतिसिंहांचे निर्वाण झाले. त्यांच्या पार्थिवाच्या दहनाचे ठिकाण कोणते असावे यावरूनही थोडी चर्चा, विवाद उभा राहण्याचा प्रसंग आला. पण जनतेची क्रांतिकारक शक्ती यशस्वी झाली. क्रांतिसिंह नाना पाटलांनी आपले अखेरचे दिवस ज्या ठिकाणी व्यतीत करायचे ठरवले आणि इतर ठिकाणांना नकार दिला त्या वाळव्याच्या हुतात्मा भूमीवर त्यांचे दहन झाले. एक क्रांतिकारी वादळ नव्या क्रांतिकारी वादळांना जन्म देण्याचे कार्य करूनच शांत झाले. एक क्रांतिकारी युग संपले पण त्या युगाने आपला वारसा नव्या युगाला दिला. या क्रांतिकारकाजवळ देण्यासारखे दुसरे काही नव्हतेच. अण्णा जसे घर सोडून चळवळीत आले तसेच शेवटपर्यंत सर्वहारा राहिले. ना कोणती मालमत्ता, ना कोणती कमाई, ना घर, ना घरवाले. पण क्रांतिकारी विचारांची आणि व्यवहारांची अमर्याद 'संपत्ती' त्यांच्याकडे होती. कधीही न संपणारी आणि सातत्याने वाढणारी ही 'संपत्ती' पुढच्या पिढ्यांसाठी देऊन क्रांतिसिंह गेले. अनेक मुख्यमंत्र्यांची, मंत्र्यांची, राज्यपालांची आठवण जनता विसरूनही गेली पण मराठी माणसांच्या मनात क्रांतिसिंह कायमचे वसती करून राहिले. पिढ्यात न् पिढ्या राहतील.

# संदर्भ सूची


१. जागृत सातारा, पु. पां. गोखले.
२. क्रांतिसिंह नाना पाटील, प्रमुख संपादक : डॉ. जयसिंगराव पवार.
३. Cultural revolt in colonial society, Gail Omvelt.
४. Nehru : A political biography, Michael Brecher.
५. सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती, ल. ग. कुलकर्णी
६. Memories of His Highness Shri Shahu Chhatrapati, A. B. Latthe
७. जिद्दी झुंजार (बर्डे गुरुजींचे चरित्र), अजीत सगरे.
८. कर्मयोगी : ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी डी. जी. देशपांडे, संपादक : डॉ. दीपा देशपांडे, प्रा. दिलीप नलगे
९. क्रांतिसिंह नाना पाटील स्मरणिका, संपादक : ॲड. सुभाष पाटील.
१०. सातारचे पहिले लोकराज्य 'प्रतिसरकार', स्वा. सैनिक, ॲड. जी. एम. पाटील
११. माझ्या आठवणी, पांडुरंग चिमणाजी पाटील
१२. क्रांतिपर्व, डॉ. उत्तमराव पाटील.
१३. Politics and Language, Y. D. Phadke
१४. The Process of Opposition in india, Robert W. Stern
१५. The Satara Prati Sarkar in The Indian Nation in 1942, Gail Omvelt
१६. गाथा, संत तुकाराम
१७. महात्मा फुले वाङ्मय
१८. सत्याग्रही महाराष्ट्र, प्रेमा कंटक
१९. भारतीय लोकशाही : स्वातंत्र्याचा जमाखर्च, भारत पाटणकर
२०. सातारा जिल्हा : बॉम्बे प्रेसिडेंसी गॅझेट, १८८३



**डॉ. भारत पाटणकर** यांनी जवळ जवळ तीस वर्षे कामगार, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, दलित आणि बहुजन यांच्यासाठी काम केले आहे.

डॉ. भारत पाटणकर विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे सरचिटणीस आहेत. सध्या ते धरणग्रस्तांचे लढे आणि कृष्णा खोऱ्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या लढ्यांचे नेतृत्व करीत आहेत. ते श्रमिक मुक्तिदलाचे संस्थापक-सदस्य आहेत. त्यांनी अनेक इंग्लिश व मराठी पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यात त्यांच्या १९ इंग्लिश व २३ मराठी पुस्तकांचा समावेश आहे.

मुंबईतील गिरणी कामगारांत, ठाणे-बेलापूरमध्ये व इतर औद्योगिक कामगारांमध्ये आणीबाणीत अटक टाळून भूमिगत राहून संप घडवून आणून राजकीय काम करीत कॉ. पाटणकरांनी आपला ठसा तेथील चळवळीवर उमटला. गिरणी कामगारांच्या प्रदीर्घ ऐतिहासिक संपलढ्यातील अनेक कामगार उपजीविकेसाठी खेड्यात परतले. त्यांना खेड्यात मजूर म्हणून संघटित करण्यासाठी व या संपलढ्याला शेतकऱ्यांकडून मदत मिळविण्यासाठी कॉ. पाटणकर कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात आले. तेव्हापासून ते ग्रामीण कष्टकऱ्यांच्या चळवळीशी एकरूप झाले आहेत. १९८३ साली खानापूर तालुक्यात मुक्ती-संघर्ष चळवळ स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

"मुद्दा आहे जग बदलण्याचा"(१९८९), "मुक्त अर्थव्यवस्था आणि वर्गीय, जातीय, लैंगिक शोषण" (१९९६), "महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष" (१९९१-१९९८) "हिंदु की सिंधु हे संघपरिवारांच्या रक्तपिपासू-हिंदुत्वावादाला बुरखा फाड उत्तरे" (१९९३), "पर्यायी विकास नीती" (१९९१) ही त्यांची पुस्तके विशेष उल्लेखनीय आहेत.